# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त // (ऑनलाईन ॲपद्वारे)

**सभा क्रं. - २०** **दि.१२/०८/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. १२/०८/२०२० बुधवार रोजी सकाळी .११.३० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.सोनवणे भारती कैलास यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या ऑनलाईन महासभेचे कार्यवृत्त.

सदर ऑनलाईन सभेकरीता खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.सोनवणे भारती कैलास, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| सोनवणे अश्विन शांताराम | कापसे प्रतिभा चंद्रकांत | खडके विश्वनाथ सुरेश |
| जोहरे प्रिया मधुकर | देशमुख प्रतिभा गजानन | भंगाळे विष्णु रामदास |
| नेरकर सरिता अनंत | पाटील विजय पुंडलिक | सोनवणे राखी शामकांत |
| पोकळे दिलीप बबनराव | सोनवणे सुरेश माणिक | लढढा नितीन बालमुकुंद |
| खान रुकसानाबी गबलु | शेख हसीनाबी शरिफ | बरडे नितीन मनोहर |
| सोनवणे कांचन विकास | पाटील कुलभुषण विरभान | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | भिल पार्वताबाई दामु | महाजन सुनिल सुपडू |
| शिंदे गायत्री उत्तम | कोल्हे सिंधु विजय | महाजन जयश्री सुनिल |
| कोळी दत्तात्रय देवराम | कोल्हे ललित विजय | शेख शबानाबी सादीक |
| सपकाळे रंजना भरत | बेंडाळे उज्वला मोहन | नाईक प्रशांत सुरेश |
| कोल्हे प्रविण रामदास | राणे गायत्री इंद्रजित | पटेल इब्राहिम मुसा |
| सनकत चेतन गणेश | तायडे सुरेखा नितीन | सोनवणे निता मंगलसिंग |
| चौधरी चेतना किशोर | चव्हाण ज्योती बाळासाहेब | सोनवणे विक्रम किसन |
| सोनवणे मुकुंदा भागवत | मराठे जितेंद्र भगवान | भापसे जिजाबाई अण्णासाहेब |
| काळे अमित पांडुरंग | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| चौधरी मंगला संजय | पाटील रेखा चुडामण | देशमुख सुन्नाबी राजु |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | सोनवणे सुरेखा सुदाम | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे धिरज मुरलीधर | ढेकळे सदाशिव गणपत | **स्विकृत सदस्य** |
| काळे दिपमाला मनोज | पाटील राजेंद्र झिपरु | सोनवणे कैलास नारायण |
| पाटील सचिन भिमराव | बालाणी भगतराम रावलमल | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| भोईटे लताबाई रणजीत | काळे रेश्मा कुंदन | मराठे राजेंद्र नारायण |
| पाटील प्रतिभा सुधीर | पाटील मिनाक्षी गोकुळ | चौधरी महेश रतन |
| पाटील चंद्रशेखर शिवाजी | सोनार रंजना विजय | जैन भागचंद मोतीलाल |
| कापसे मयुर चंद्रकांत | खडके सुनिल वामनराव | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिष कुलकर्णी , उपायुक्त श्री.कपिल पवार , उपायुक्त श्री.संतोष वाहुळे, उपायुक्त श्री. किरण देशमुख व नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्या सौ.बारी शोभा दिनकर, श्री.आहुजा मनोज नारायणदास, श्री. बाविस्कर किशोर रमेश यांचे रजेचे अर्ज प्राप्त झालेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

त्यानंतर येथे मा.महापौर महोदया येथे श्रध्दांजलीचा प्रस्ताव मांडतील श्रध्दांजलीचा प्रस्ताव मांडल्यानंतर आपण सर्वांनी दोन मिनिटं उभे राहून श्रध्दांजली अर्पण करायची आहे.

**नगरसचिव :-** कृपया सर्वांनी उभे राहायचे आहे आपण सर्व श्रध्दांजली अर्पण करू.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २६५ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सोनवणे भारती कैलास, मा.महापौर | माजी खासदार कै.हरीभाऊ जावळे, माजी नगरसेवक कै.शांताराम चिंधु सपकाळे, माजी नगरसेवक कै.राजुभाऊ भालेराव, कै.रुखसानाबी सालार तसेच जळगांव शहरातील ज्या नागरीकांचे कोरोना काळात निधन झाले त्यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| २. | महाजन सुनिल सुपडू मा.विरोधी पक्षनेता | मेहरुण, पाटील वाडा येथिल रहिवासी स्वर्गीय सुहास प्रकाश कोल्हे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ३. | भंगाळे विष्णू रामदास | माजी नगरसेविका कै.संगिता राणे व त्यांचे पती कै.मोहनदास राणे यांचे दु:खद निधनाबद्दल |
| ४ | सोनवणे कैलास नारायण | भारत चिन सिमेवर शहीद झालेल्या भारतीय सैनिकांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ४. | पटेल इब्राहीम मुसा | प्रसिध्द शायर कै.डॉ.राहत इंदोरी यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ५. | सपकाळे रंजना भारत | माजी सन्मा.सदस्य, स्व.शांताराम चिंधू सपकाळे तसेच कोविड १९ काळात कर्तव्य बजावित असतांना बाधित होवुन मनपा कर्मचारी स्व.ज्ञानेश्वर विश्राम सोनवणे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ६. | पाटील राजेंद्र झिपरु | मेहरुण येथिल रहिवासी कै.सौ.प्रमिला नाना पाटील (वाघ) यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ७. | मराठे राजेंद्र नारायण | शिवाजी नगर परिसरातील रहिवासी तसेच सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवक स्व.राजेंद्र विश्वासराव भालेराव यांचे दु:खद निधनाबाद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २६६ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | १) सोनवणे भारती कैलास मा.महापौर<br>२) मराठे राजेंद्र नारायण | मा.पंतप्रधान, श्री.नरेंद्रजी मोदी व सर्व कारसेवक यांच्या हस्ते दि.०५/०८/२०२० रोजी आयोध्या येथे श्रीराम मंदीर भुमीपुजन समारंभ पार पाडल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| २ | लढ्ढा नितीन बालमुकूंद | मा.पंतप्रधान, श्री.नरेंद्रजी मोदी यांनी आयोध्या येथे श्रीराम मंदीराचे भूमीपूजन केलेबद्दल. तसेच कोराना संकटकाळी मा.महापौर, सौ.भारतीताई सोनवणे, मा.जिल्हाधिकारी, श्री.अभिजीत राऊत, मा.आयुक्त, श्री.सतिष कुळकणी, प्रमुख वैदयकीय अधिकारी,डॉ. रामरावलानी, ठुसे मॅडम, सर्व डॉक्टर, नर्स, सफाई कामगार तसेच |

| | | |
|---|---|---|
| | | मलेरिया फवारणी कर्मचारी तसेच सन्मा.सदस्य श्री.कैलास आप्पा सोनवणे, हे गेल्या सहा महिन्यापासून सकाळपासून संध्याकाळपर्यंत कोराना संसर्ग झालेल्या नागरीकांना भेटणे तसेच त्यांना आवश्यक ती मदत करणेचे काम करीत आहेत त्याचप्रमाणे संपूर्ण जळगांव शहराला सॅनिटाईज करुन दिलेबद्दल शहरातील उदयोगपती, श्री.अशोक जैन व या कठिण काळात शेतकरी तसेच ज्या काही असंख्य हातांनी लोकांनी मदत केली त्या सर्वांचे हार्दीक अभिनंदन. |
| ३ | त्रिपाठी विशाल राधेश्याम | राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे कार्यकर्ते तसेच बजरंग दलाचे कार्यकर्ते, मा.आ.राजुमामा भोळे यांनी कोराना काळात नागरीकांना केलेल्या मदतीबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ४ | पाटील सचिन भिमराव | कोराना काळात नागरीकांना सन्मा.सदस्य श्री.कैलास आप्पा सोनवणे व मा.आ.श्री.राजुमामा भोळे यांनी मदत केलेबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ५ | बालाणी भगतराम रावलमल | जळगांव शहरात नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा अंतर्गत करावयाच्या कामांसाठी शिफारस केलेबद्दल मा.ना.श्री.गुलाबराव पाटील यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ६ | ॲड हाडा शुचिता अतुलसिंह<br>महाजन सुनिल सुपडू | सौ.भारती कैलास सोनवणे,मा.महापौर यांनी प्रथमच ऑनलाईन सभा यशस्वीरित्या आयोजित करुन चालविलेबद्दल व सदर सभा आयोजित करणे कामी व सभा यशस्वीपणे पार पाडलेबद्दल नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे तसेच त्यांचे नगरसचिव विभागातील सर्व कर्मचारी यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ७ | भंगाळे विष्णू रामदास | १) सध्यास्थितीत कोरोना रुग्णांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे तसेच रुग्ण बरे होण्याचे प्रमाण सुध्दा वाढले आहे अश्या या महामारीच्या काळात कोरोनाचा प्रार्दुभाव कमी करण्यासाठी जळगांव मनपा चांगल्या प्रकारे काम करीत आहे त्याबद्दल मा.महापौर, आयुक्त सो., सर्व अधिकारी वर्ग, आरोग्य विभागाचे डॉक्टर, नर्स, कंपाऊंडर, सर्व चालक कर्मचारी, तसेच सर्व साफसफाई कर्मचारी व त्यांच्या टिमचे हार्दीक अभिनंदन.<br>२) तसेच आज ऑनलाईन महासभेचे नियोजन नगरसचिव व त्यांचे सहकारी तसेच मा.महापौर व मा.उपमहापौर यांनी चांगल्या प्रकारे केलेबद्दल हार्दीक अभिनंदन.<br>३) श्री.सुनिल भोळे, श्री.सुभाष मराठे, श्री.एच.एस.खान, श्री.सुनिल काळे, व इतर सर्व मनपा अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत त्यांनी आजवर केलेल्या चांगल्या सेवेबद्दल त्यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ८ | पाटील राजेंद्र झिपरु | १) सन्मा.सदस्य श्री.प्रशांत सुरेश नाईक यांची वंजारी सेवा संघ (असो.)च्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |

| | | |
|---|---|---|
| | | २) सन्मा.सदस्य तथा माजी महापौर श्री.सदाशिवराव ढेकळे व माजी नगरसेविका सौ.चिंधाबाई सदाशिवराव ढेकळे यांची कन्या व डॉ.श्री.संदिप बाबुराव मार्कंड यांची पत्नी डॉ.उमा ढेकळे यांची तहसिलदार पदी नियुक्ती झालेबद्दल हार्दीक अभिनंदन.<br>३) इयत्ता १० वी चे परिक्षेत उत्तीर्ण सर्व विदयार्थी व विदयार्थीनीचे हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

**शासकीय व विविध विभागांकडून आलेल्या पत्रांचे वाचन**

**नगरसचिव :-** महाराष्ट्र शासनाकडुन आलेले पत्रांचे वाचन,शासकीय आणि विविध आलेल्या पत्रांची प्रति सन्मा.पदाधिकारी यांना संपुर्ण पत्रांची प्रती देण्यात आलेल्या आहेत. ते पत्र पुढील प्रमाणे आहेत. **१)** मा.उपायुक्त, म.न.पा. जळगांव यांचे परिपत्रक क्र./जमपा/आस्था/२२१८/२०२० दि.२४ फेब्रुवारी २०२० रोजीचे पत्र आहे जळगांव शहर महानगरपालिकेच्या कार्यालयासाठी पाच दिवसांचा आठवडा लागु करण्याबाबत. **२)** मा.आयुक्त,म.न.पा. जळगांव यांचे परिपत्रक क्र./जमपा/आस्था/२३५४/२०२० दि.२३/०३/२०२० रोजीचे पत्र आहे. कोरोना विषाणु प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत. **३)** प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन क्र.करोना/२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५, दि.१८/०३/२०२० सार्वजनिक आरोग्य विभाग - राज्यात कोरोना विषाणु (कोविड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत(वातानुकुलीत यंत्रणांचा वापर कमी करणेबाबतच्या मार्गदर्शक सुचना). **४)** मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन क्र.कोरोना-२०२० /प्र.क्र.७६, न.वि.-१४, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई दि.२७/०३/२०२० चे पत्र - कोविड-१९, कोरोना विषाणुचे संक्रमणाच्या पार्श्वभुमीवर महानगरपालिका / नगरपालिका /नगरपंचायत यांच्या स्थायी समिती / विषय समितीच्या निवडणुका / सदस्य निवडणुका स्थगित करणेबाबत. **५)** कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन क्र.कोरोना-२०२०/ प्र.क्र.७६,न.वि-१४, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि.३ एप्रिल २०२० चे पत्र - कोविड-१९ कोरोना विषाणुचे संक्रमणाच्या पार्श्वभुमीवर महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत यांच्या स्थायी समिती / विषय समितीच्या निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या कालावधीबाबत **६)** मा.उपायुक्त यांचेकडील जा.क्र./आस्था/१२/२०२० दि.०७/०४/२०२० चे आदेश - कोरोना आपत्तीवर मात करण्यासाठी राज्य शासनाच्या शासन परिपत्रकानुसार जळगांव शहर महानगरपालिकेतील लोकप्रतिनिधी व गट अ,ब,क, ड च्या अधिकारी कर्मचारी यांचे वेतन दोन टप्यात अदा करणेबाबत. **७)** मा.उपायुक्त यांचेकडील परिपत्रक/जमपा/आस्था/१६३/२०२० दि.०४/०५/२०२० चे परिपत्रक- जळगांव शहर महानगरपालिकेच्या कार्यालयासाठी कोविड-१९ विषाणुचा संसर्ग / प्रादुर्भाव रोखण्यासाठी कार्यरत असलेल्या विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबतच्या मार्गदर्शक सुचनाबाबत. **८)** मा.उपायुक्त यांचेकडील परिपत्रक/जमपा/आस्था/५६६/२०२० दि.१५/०७/२०२० चे परिपत्रक - महाराष्ट्र राज्यात कोरोना विषाणु प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन लागु करण्यात आलेल्या लॉक डाऊनच्या अनुषंगाने राज्यात शासकीय कामाकाजासाठी ईमेल तसेच व्हॉटसॲपचा वापर ग्राहय धरण्याबाबत. **९)** मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, मंत्रालय, मुंबई दि.०४/०५/२०२० - कोविड -१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजना करण्याबाबतचे पत्र आहे. तसेच स्थायी समितीमध्ये त्याचे वाचन झालेले आहे.

**सदरच्या पत्रांचे वाचन करण्यात आले.**

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब ते सर्व पत्र सर्वांनी वाचलेले आहेत ते सर्व पटलावर घेण्यात यावे.पुढील कार्यवाही सुरू करण्यात यावी.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे**

**मा.महापौर :-** नगरसचिव यांनी प्रश्नोत्तरास सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** नंतर आता प्रश्नोत्तराचा तास

**मा.महापौर :-** विष्णू भाऊ माईक बंद करा.

**मा.उपमहापौर :-** विष्णू भाऊ , नवनाथ दारकुंडे , प्रशांत नाईक यांनी आपला माईक बंद करावा.

**नगरसचिव :-** आजच्या महासभेमध्ये अधिनियमातील कलम 44 अन्वये असलेले प्रश्न क्रं.१) देशमुख सुन्ना बी राजु

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| वॉटर ग्रेस कंपनीला दिलेल्या एकमुस्त मक्त्या संदर्भातील खालील प्रमाणे कागदपत्रांच्या प्रती पुरविण्याबाबत<br>१) करारनामा | १) सन्मा.सदस्या सौ.देशमुख यांना करारनाम्याची प्रत देण्यात आली आहे. |
| २) सर्व कामगारांचे पी.एफ.भरल्याचे चलन | २) सदर कंपनीने कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरणा केली जात असल्याची माहिती इकडेस सादर केलेली नाही. याबाबत कंपनीस पत्र देण्यात आलेले असून सादर केल्यानंतर आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| ३) सर्व कामगारांना विमा पॉलिसी संदर्भातील कागद | ३) सदर कंपनीने कर्मचाऱ्यांना विमा पॉलिसी संदर्भातील माहिती इकडेस सादर केलेली नाही. याबाबत कंपनीस पत्र देण्यात आलेले असून सादर केल्यानंतर आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| ४) मक्तेदार किमान वेतन प्रमाणे वेतन देत आहे यांचे पुरावे. | ४) सदर कंपनीने कर्मचाऱ्यांना किमान वेतन प्रमाणे वेतन देत आहे याची माहिती इकडेस सादर केलेली नाही. याबाबत कंपनीस पत्र देण्यात आलेले असून सादर केल्यानंतर आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| ५) मक्तेदार वेतन कामगारांना धनादेशव्दारे देत असल्याचे पुरावे. | ५) सदर कंपनीने कर्मचाऱ्यांना वेतन दिल्याबाबतची माहिती इकडेस सादर केलेली नाही. याबाबत कंपनीस पत्र देण्यात आलेले असून सादर केल्यानंतर आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल. |

**देशमुख सुन्ना बी राजु :-** प्रशासनाकडून प्राप्त उत्तर समाधानकारक आहे.

**नगरसचिव :-** प्रश्न क्रं.२) श्री.भंगाळे विष्णु रामदास

| | |
|---|---|
| १) आपल्या जळगांव म.न.पा.ने साफ सफाईचे मक्ता कधीपासून दिला व कामास सुरुवात कधी पासून झाली ? सदर कामाची आजची स्थिती काय आहे ? | १) दि.१४/०८/२०१९ चे कार्यादेशानुसार दि.१६/०८/२०१९ पासून १० वार्ड व दि.२१/०८/२०१९ पासून संपुर्ण वार्डांची सध्यस्थितीत काम सुरु आहे. |
| २) म.न.पा.महासभेत वेळोवेळी प्रश्न उपस्थित करुन व तक्रारी करुन सुध्दा कामात सुधारणा कां होत नाही ? | २) मक्ता सुरु झाला तेव्हा पावसाचे दिवस सुरु होते व मक्तेदाराला यंत्र सामुग्री व कामगारांची जमवा जमवी करणेसाठी वेळ कमी मिळाल्यामुळे सुरुवातीला तक्रारींचे प्रमाण वाढले होते. तदनंतर सदय परिस्थितीत त्यांचे कामामध्ये काही |

| | |
|---|---|
| | प्रमाणात सुधारणा झालेली आहे व प्रभागातील कचरा सुध्दा दैनंदिन उचलण्याचे काम सुरु आहे. |
| ३) आपल्याला मनपा ची आज रोजी दिलेली यंत्रणा देण्याची आवश्यकता (गरज) कां पडली ? कधी पासून दिली आहे ? व आता काय ? | ३) सणासुदीचे दिवस असल्यामुळे व शहरात सुरुवातीला मोठया प्रमाणात कचरा साचला असल्यामुळे मनपा यंत्रणा देणेची गरज पडली दि.०१/०९/२०१९ पासून देणेत आली होती. आता सदयस्थितीत मनपाची यंत्रणा बंद आहे. |
| ४) आपल्या मनपाचे वाहन चालक (ड्रायव्हर), डिझेल व वाहनांचे देखभाल दुरुस्ती खर्च हा सदर मक्तेदारांकडून वसूल केला आहे कां ? आता पर्यंत किती वाहन व वाहन चालक दिलेले आहे ? याची यादी दयावी. | ४) रु.२,७४,५२५/- माहे ऑगष्ट ते सप्टेंबर २०१९ चे बिलातून वसूल करण्यात आली आहे. वाहनांची यादी सन्मा.सदस्य श्री.भंगाळे यांना देण्यात आली आहे. |
| ५) आपल्या मनपाचा इतका खर्च झालेला असतांना तो खर्च वसूल न करता सदर मक्तेदारास बिल देण्याची घाई करण्याचे कारण काय ? दंड वसूल करुनच मक्तेदाराचे बिल अदा करण्यात कां येत नाही ? आता पर्यंत किती बिल दिले व दंड किती आकारला व तो कापला कां ? | ५) नोव्हेंबर व ऑक्टोंबर महिन्यात दिवाळी सन असल्याने मक्तेदाराकडे कामगार काम बंद करणार असल्याने मक्तेदार यांनी सांगितले. त्यामुळे जे कामे सुरुवातीपासून करणे शक्य होते. परंतू ते न केल्यामुळे दंड आकारुन उर्वरित रकमेबाबत सुनावणी घेऊन मा.उपायुक्त हे निर्णय घेणार आहे. |
| ६) प्रत्येक प्रभागात आता उपलब्ध आरोग्य मनपा कर्मचारी किती ? व मक्तेदाराचे कर्मचारी किती ? | ६) ९ प्रभागात मनपाचे ४५१ कर्मचारी आहेत व १० प्रभागामध्ये मक्तेदाराकडील ४०० कर्मचारी आहेत. |
| ७) डंम्पर व ट्रॅक्टर मध्ये कचरा न भरता माती व इतर जड मटेरियल भरुन वजन वाढविण्याचा प्रकार सर्रास सुरु आहे. त्यावर उपाय योजना काय करण्यात आल्या ? प्रसार माध्यमे व वृत्तपत्रे या मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले क्लिप व फोटो दाखवित आहे की वजन वाढविण्यासाठी घंटागाडी मध्ये माती भरत आहे त्यावर आपण काय कार्यवाही केली आहे ? का हे सर्व असेच चालू राहील ? व ती माती ही डिव्हायडरची नाही हे लक्षात घ्यावे तसाही व्हिडीओ सर्वदुर उपलब्ध आहे. | ७) याबाबत वार्ड क्रं.८ व वार्ड क्रं.१५ मधील तक्रार आलेली होती. त्यानुसार मक्तेदारास प्रत्येक रु.५०००/- प्रमाणे दंड करणेत आलेला आहे व याबाबत आरोग्य निरिक्षक / युनिट प्रमुख यांना मक्तेदाराने वजन वाढविणेचे असे प्रकार करु नये म्हणुन नियंत्रण ठेवणे बाबत आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहे. |
| ८) आतापर्यंत प्रत्येक गाडी नंबर सही वजन किती आहे ? | ८) सन्मा.सदस्य श्री.भंगाळे यांना माहिती देण्यात आली आहे. |
| ९) घंटागाडी ड्रायव्हर सुटीवर असल्यास किंवा घंटागाडी बंद असल्यास पर्यायी वाहन चालक अथवा घंटागाडी का मिळत नाही ? नियमीत कचरा उचलण्यासाठी वाहन मिळत कां नाही ? | ९) याबाबत कंपनीला पत्र व्यवहार करण्यात येईल. |
| १०) मनपाने मक्तेदारास मक्ता देतांना ज्या अटी व शर्तीनुसार काम करुन घेण्यात येत आहे कां ? | १०) होय |
| ११) मनपाने मक्तेदारास मक्ता देण्या आधि किती खर्च येत होता ? व आता महिना वाईज मक्ता दिला असता किती खर्च येतो ? | ११) जुन्या वार्ड रचनेनुसार २० वार्डात रु.६१,६९,०००/- खर्च येत होता आता नविन मक्त्याला रु.१,१९,००,०००/- इतका खर्च येत आहे. |
| १२) मनपा आरोग्याचे कर्मचारी तथा मक्तेदारांचे कर्मचारी | |

| | |
|---|---|
| यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हात मोजे, नाका व तोंडाला लावणारे मास्क व रबरी बुट या सारखी साधने दण्याचे मक्त्यात आहे कां? व ते मक्तेदाराने उपलब्ध करुन दिले आहे कां ? | १२) होय, मक्तेदाराने त्यांचे कर्मचाऱ्याला वरील साधणे दिलेली असल्याचे त्यांनी कळविलेले आहे व फोटो देखील दिलेले आहे. |
| १३) मनपाने मक्तेदारास वाहने उपलब्ध करुन देण्यात आली आहे तरी सदर वाहनांवर ध्वनी प्रक्षेपाव्दारे मनपा व सदर मक्तेदार यांची संयुक्त रित्या जाहिरात केली का जाते ? किती ध्वनी प्रक्षेपक बंद असतात ? | १३) मक्तेदार कोण आहे हे नागरीकांना माहिती व्हावी म्हणून अशी जाहिरात करण्यात येत आहे. ध्वनी प्रक्षेपक सर्व सुर आहेत जे बंद असतात त्यावेळी अटी शर्तीनुसार दंडात्मक कार्यवाही करणेत येत असते. |

**मा.उपमहापौर :-** विष्णू भाऊ बोलायचे आहे का ?

**श्री.विष्णू भंगाळे :-** अध्यक्ष महोदया , उपमहापौर महोदय आणि आयुक्त साहेब तसेच सन्मा .सभागृह व आज येथे जे उपस्थित आहेत . या संदर्भातील माझे पत्र दि. १३/११/२०१९ या दिवशी मी आपल्याकडे ते दिलेलं होत . त्यावेळेला जळगांव शहरातील परिस्थिती खुप मोठया प्रमाणावर बेकार झालेली होती. साफसफाई चांगल्या प्रकारे होत नव्हती आणि म्हणून त्या माध्यमातुन हा प्रश्न विचारलेला होता. व आपण जे पत्र दिलं होत. परंतू हा प्रश्न का पडला आहे. कारण आजची परिस्थिती वॉटरग्रेस च्या माध्यमातुन सांगु ईच्छितो कि , अध्यक्ष महोदय या वॉटरग्रेस चे जे कामं होत ते समाधानकारक होत नव्हत मागील काळा मध्ये आपण बऱ्याच वेळेस या वॉटरग्रेस च्या माध्यमातुन प्रश्न उपस्थित केले होते आणि या प्रश्नाचे निराकरण होत नव्हतं आणि जळगांव शहरातील हा प्रश्न विविध माध्यमातुन आले होते , परंतू ते पुर्ण निर्णय त्या माध्यमातुन ठरवणार ज्यावेळेस हा विषय सभागृहामध्ये मंजुरीसाठी आला होता. त्यावेळेस नाशिक असेल. धुळे असेल , मालेगांव असेल ईथली उदाहरणे सुध्दा दिलेली होती. वॉटर ग्रेस ला काम का देवु नये . त्यांचे लेबर कामगार असेल त्यांचे गृप असतील या माध्यमातुन मी संपुर्ण माहिती सभागृहास दिली होती. पण तरी त्यावेळेस वॉटरग्रेसला ते काम देण्यात आलं आणि काय घटना घडल्या मागील काळात त्या सर्वांना माहिती आहेत.आपली साफसफाई नियमितपणे होत नाहीये आणि त्यावेळेस हे टेंडर दिलं गेलं अटी , शर्तीमध्ये का म्हणून सोडण्यात आल्या याचा सुध्दा आपला प्रश्न सभागृहाला आहे त्याचा उलगडा आपण करावा जेणेकरून येणाऱ्या काळात जळगांव महानगरपालिकेच हित पाहाता काही अटी , शर्तीमुळे जळगांव महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. हा मुद्या जसा म्हटला गेला जवळजवळ एकमुस्त ठेका देण्यात आला त्यावेळेस अध्यक्ष महोदया हा ठेका देण्यात आला आणि त्यावेळेस आणि आताच्या काळामध्ये अश्या प्रकारच्या तत्वावर आणि आतासुध्दा परत देण्यात आलेला आहे आणि कर्मचाऱ्यांची संख्या पाहाता या विषयावर काम करत असतांना जळगांव महानगरपालिकेचे काम करत असणारे कायम कर्मचारी असतील किंवा ठेकेदाराच्या मार्फत जे कामगार असतील या मध्यमातुन साफसफाईचे काम होत होते. परंतू ते समाधानकारक झाल नाही तसेच ज्या सुविधा आपण त्या ठेकेदाराला दिल्या आहेत. त्या बद्दल माझ एक म्हणण आहे की त्या त्याला का सुरू ठेवल्यात याचा हा एक प्रश्न मी सभागृहात विचारू ईच्छितो .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आपण जे का दिलेले आहे .

**श्री.विष्णू भंगाळे :-** कशाबद्दल

**मा.महापौर :-** कृपया एकावेळी एकाच सदस्याने बोलायचे आहे. नवनाथ भाऊ विष्णूभाऊंचे झाले की तुम्ही बोला.

**श्री.विष्णू भंगाळे :-** अध्यक्ष महोदय , माझा प्रश्न हा होता की हा ठेका ज्यावेळी देण्यात येत होता त्यावेळी मी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. आपण जे काम त्याला दिलेले आहे त्याचे रिटर्न आपल्याला मिळाले नाही त्याने जे काम होते ते योग्य प्रकारे केलेले नाही तसे मी या सभागृहाला आवर्जुन सांगीतले होते की या ठेकेदाराला हा ठेका देण्यात येवू नये परंतू ठेका देण्यात आला व आता पुन्हा आयुक्त साहेबांच्या वतीने त्याला आता पुन्हा त्याला संधी द्यावी लागते आहे हे सुध्दा आपल्या महापालिकेवर एक संकट आहे आणि आता हे काम वॉटर ग्रेस कंपनी करत आहे व चालवते आहे परंतू त्याच्यामध्ये आपल्याकडे चांगल्याप्रकारे काम करण्याची गरज आहे.

**मा.उपमहापौर :-** विष्णू भाऊ तुमचा आवाज ऐकू येत नाहीये.

**श्री.विष्णू भंगाळे :-** मी अध्यक्ष महोदयांच्या लक्षात आणून देवू ईच्छितो की , माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या माईक चा आवाज बंद करावा कारण माझा आवाज बरोबर येत नाहीये तरी माझे बोलणे झाल्यानंतर त्यांनी त्यांचे

म्हणणे मांडावे अशी मी सर्वांना विनंती करतो असे येथे सर्वांना सांगु ईच्छितो. आपण वॉटरग्रेस ला देण्यात आलेला ठेका आपण दिलेला आहे व पुन्हा त्याला देण्यात येवू नये अशी मी विनंती करतो व तो कोर्टात जरी गेला तरी कोर्टाचा निर्णय अंतीम राहील. आता कोर्टात जी भुमिका त्याने मांडलेली आहे.

**मा.उपमहापौर :-** सचिनभाऊ पाटील माईक बंद करा.

**श्री.विष्णू भंगाळे :-** तरी मी सभागृहाला विनंती करतो आहे की मी जो विषय मी सभागृहामध्ये मांडला आहे त्याच्यावर लक्ष द्यायला पाहीजे जर आपण विचार केला तर तेव्हा पासुन नक्कीच आजपर्यंत या साफसफाईच्या दृष्टीने माझी एक सभागृहाला विनंती आहे की येणाऱ्या काळामध्ये या वॉटरग्रेस च्या माध्यमातुन जी काही साफसफाई करण्यात आलेली असेल आपल्या जळगांव शहरामध्ये ती आपण अस मी आता सांगु ईच्छितो कारण की हा जो आपण ठेका दिला मागील काळामध्ये या मध्ये हे काम होत नव्हत या रकमेमध्ये तरी याचा विचार करावा व येणाऱ्या काळामध्ये हा पैसा महापालिका कसा वाचवेल व महापालिका चांगली वाटचाल करेल हे धोरण निश्चित करून याकडे लक्ष वेधले पाहीजे आणि आज आयुक्त महोदयांना या सभागृहात मी विनंती या माध्यमातून करतो हा अर्ज आज जवळजवळ ११ महिने झाले तर मी याच्यावर हे सविस्तर न बोलता हे असे सांगू ईच्छितो की पुढील काळात आपला वॉटरग्रेस ला जा ठेका दिलेला आहे. तर त्याच्याकडून ते काम करून घेवुन पुढील काळात अशी विनंती माझी सभागृहास व म.महापौरांना आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई

**मा.महापौर :-** हो बोला नितीन भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई आता सन्मा.सदस्य श्री. विष्णू भाऊ भंगाळे यांनी ज्या सुचना मांडल्या त्या निश्चितपणे आपल्या साठी योग्य अश्या सुचना आहेत आणि आपल्या माध्यमातुन लक्षात आणुन देतो आणि आपण ज्यावेळेला वॉटरग्रेसला काम दिलं होतं त्यावेळेला सुध्दा आमची अशी सुचना होती .

**मा.महापौर :-** विष्णूभाऊ स्पिकर बंद करा.

**मा.उपमहापौर :-** विष्णूभाऊ तुमचा माईक बंद करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो महापौर ताई.

**मा.उपमहापौर :-** हो बोला .

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौर ताई आपण सांगीतल्या प्रमाणे वॉटरग्रेसला काम देण्याच्या संदर्भाने प्रशासनाने दिलेली केस नव्हती.

**नवनाथ दारकुंडे :-** त्याच्यामध्ये महापौरताई.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नवनाथ भाऊ मी बोलुन झाल्यावर तुम्ही बोला माझी विनंती आहे.

**नवनाथ दारकुंडे :-** माझी बॅटरी डाऊन झालेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जळगांव शहरातील मुख्य रस्ते साफसफाई करायचे किमान ३ लाख चौरस मीटर रस्ते जळगांव शहरात आहे. प्रती कामगार या प्रमाणे गणित करून साधारणत: ९४० गटार कामगार अपेक्षित आहेत आणि ९२१ झाडु कामगार अपेक्षित आहेत. आता प्रशासनाच्या प्रस्तावाप्रमाणे आपले ते १८६१ कामगार हे जळगांव शहर महानगरपालिकेच्या सेवेमध्ये अपेक्षित आहेत परंतू आपली परिस्थिती अशी आहे की साधारणत: आपल्या मनपाच्या आस्थापना सूचिवर असलेले कायम कामगार हे जवळपास ३८५ आहेत , मक्तेदाराकडून ४०० कामगार आपण दरवेळेस घेत असतो आता जवळपास ८०० कामगार मनपाच्या सेवेमध्ये आहेत मनपाच्या सेवेमध्ये आस्थापना सुचीवर असलेले कायम कामगार साधारणत: १० टक्के सुटीवर असतात म्हणजे मनपाचे कायम ३५० कामगार हे कामावर आहेत, म्हणजे एकूण ७५० कामगार हे कार्यरत आहेत.यावेळेला १८६१ कामगारांच्या तुलनेत फक्त ७५० कामगार यांच्याकडून आपण पुर्ण जळगांव शहराच स्वच्छतेचं नियोजन करत आहेत. प्रशासनाकडून असा प्रस्ताव तयार करणे अपेक्षित आहे . ७५० कामगारांकडून काम करून घेणे ही अत्यंत चुकीची बाब आहे. आज आपण बघतो प्रभाग क्र.५ हा संपुर्ण जळगांव शहराचा मध्यवर्ती भाग आहे. येथे रोज २ कायम कर्मचारी काम करीत असतात परंतू कायम कर्मचाऱ्यांची निकड बघता त्यांच्याकडून हे काम एकत्रितपणे होवू शकत नाही ही संपुर्ण वस्ती ही परिस्थिती अत्यंत भयावह आहे जिथे जिथे हे कामगार आहेत. तिथे त्यांची परिस्थिती हीच आहे. कारण कायम कर्मचाऱ्यांची संख्या ही कमी असते. त्यामुळे शहर स्वच्छतेचे काम योग्य पध्दतीने होवू शकत नाही. तर यावर आयुक्तांची भुमिका काय आहे ? त्यांनी त्यांची भुमिका स्पष्ट करावी.

**मा.उपमहापौर :-** बोला आप्पा, बोला आप्पा बोला...

**श्री.कैलास सोनवणे :-** आता जो विषय नितीन भाऊंनी मांडला आहे. आता महत्वाची शहराची साफसफाई आहे. त्याचे वॉर्डवॉईज सफाई चे मक्ते होते त्याप्रमाणे वॉर्डाची सफाई, त्यानंतर आरोग्याची सफाई, त्यानंतर वॉटरग्रेसची साफसफाई

त्यानंतर हे सगळे जे मुद्दे आहेत. त्या वेळेस कामगारांची ही पुर्तता होती तर ते मक्ते जे काढले होते वॉर्डवॉईज मला वाटत ते कमी होते. त्याच्या अनुषंगाने खर्च जास्त होवू नये म्हणून हे प्रकरण त्यांनी एस आय लोकांनी मक्त्याचे काही लोक दिले जातील असे सांगीतले परंतू त्यांनी किती माणस दिले जातील हा विचार केला नाही. याच्यामुळे काय झाल की कामगार कमी कामगारांचे शोषण होणार नाही त्या अनुषंगाने आयुक्त साहेबांनी त्याबाबत आणि येथे असे सांगु शकतो की आयुक्त साहेबांनी त्याच्या डिमांड मागवाव्या की तुमच्या प्रभागामध्ये किती माणस लागतील कारण त्या प्रभागात चांगली साफसफाई ही होवू शकत नाही. हा जो मक्ता आहे त्यामध्ये जळगांव शहराच्या सीमा हया फार मोठया प्रमाणामध्ये विस्तारलेल्या आहेत म्हणून आयुक्त साहेबांनी याच्यामध्ये ठेकेदाराने साफसफाई नाही केली तर त्याची निविदा प्रक्रीया रद्द होणारच आहे असे मला वाटते म्हणून आपणांस नम्र विनंती आहे आयुक्त साहेब .

**श्री. नवनाथ दारकुंडे** :- वॉर्डाच्या चर्तुसिमा पण घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** नवनाथभाऊ मी तुम्हाला हात जोडून विनंती करतो की कोणताही सदस्य बोलत असतांना सांष्टांग नमस्कार करून विनंती करतो की कोणताही सदस्य बोलत असतांना मध्ये बोलू नये सॉरी मी तुमची माफीही मागतो. आजच्या या ऑनलाईन सभेसाठी तुमच्या तोंडाला मास्क नाही आणि हातामध्ये मोबाईल आहे प्रभागांच्या चुर्तुसीमांच्या बाबतीत हे तुम्ही जे सांगता आहेत की वॉर्डाच्या चर्तुसीमेच्या तुम्ही एस.आय ला विचारा की किती माणस लागतील. त्या कामगारांचे शोषण होणार नाही याच्या संबंधात आयुक्त साहेबांनी त्यांची एक बैठक घ्यावी आणि कामाची सोय होईल आणि त्याची तुलना करावी आणि मी आयुक्त साहेबांना विनंती करणार आहे. याच्याबाबत नियोजन कराव आणि महापालिकेमार्फत चांगल्याप्रकारे नियोजन केल्यानंतर जेणेकरून जळगांवची साफसफाई व्यवस्थित होईल.

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर साहेब आपणांस विनंती आहे प्रशासनाने या विषयावर चर्चा करावी की काय आहे.

**श्री.उदय पाटील , आरोग्याधिकारी :-** नमस्कार

**मा.महापौर :-** विष्णूभाऊ माईक बंद करा.

**श्री.उदय पाटील , आरोग्याधिकारी :-** सन्मा.सभागृह आज या ठिकाणी जो आदरणीय नितीनभाऊंनी आणि कैलास आप्पांनी याच्यासंदर्भातील विषय मांडला होता. तर मी वस्तुनिष्ठ माहिती मांडू ईच्छितो , यापुर्वी वॉटरग्रेसला काम देण्या अगोदर जळगांव शहरामध्ये ३८ वार्डामध्ये २२ लाखांची साफसफाई दैनंदिन एकमुस्त पध्दतीने ३ लाख १० हजार प्रती वॉर्ड या पध्दतीने देण्यात आलेली होती . ३८ वॉर्डांची साफसफाई मध्ये १६ वॉर्ड मध्ये मनपाचे आस्थापना सूचिवरील कर्मचारी , आपली वाहन यंत्रणा, डिझेल आणि आपल्या खात्यामार्फत ते काम करत होते . एकंदरीत सरासरी काढली , तर त्यावळेला २२ वॉर्डाची मक्तेदारामार्फत साफसफाई करीता जवळपास ६५ लाख रूपये खर्च येत होता , आणि उर्वरीत जे वॉर्ड होते जेथे मनपामार्फत साफसफाई होत होती. त्यामध्ये मनपा आस्थापना सूचिवरील कामगार, वाहनांची संख्या त्यांना लागणारे डिझेल , व्यस्थापन व दूरूस्ती खर्च असा एकूण हा १ कोटी २० लाखापर्यंत जात होता . नविन टेंडर ज्यावेळेला आपण काढले त्यावेळेला मनपाची आर्थिक परिस्थिती विचारात घेवुन त्यावर होणारा खर्च बघता घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई साठी जो खर्च होता तो १ कोटी २० लाख होता त्या अनुषंगाने आपण त्यावेळेला ४०० कामगारांची तरतूद केली होती, आणि त्यामुळे वॉटरग्रेसला काम दिल्यानंतर १ कोटी २५ लाखापर्यंत खर्च येईल असे आपण नियोजन केलेले होते. जेणेकरून आपला जो खर्च आहे. त्यावेळी आपल्याला खर्चाच्या मर्यादा होत्या तो विचारात घेवुन आपण ते केलेले आहे .

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर ताई मला बोलायचे आहे परवानगी द्यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, प्रशासनाच्या उत्तराने आम्ही सहमत आहे. याबाबत जो खुलासा केला तो खुलासा झाला तो मान्य आहे. परंतु प्रशासनाने निर्णय घेतांना शहराच्या विस्ताराचा विचार करत असतांना शहराच्या संपुर्ण भागात साफसफाई होते आहे कि नाही याबाबतची माहिती घेतली गेली पाहीजे आणि एक दुसऱ्या प्रकरणाच्या कामी आपल्या शहर स्वच्छतेच्या बाबतीत तरतूद करणे मला वाटत कदाचित हे योग्य होणार नाही आणि हे प्रशासनानेही मान्यही केलेले आहे की आपल्या आर्थिक परिस्थितीच्या अनुषंगाने आपण ते केलेले आहे.परंतू आता आपल केंद्र शासन , महाराष्ट्र शासन स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातुन आपल्या या संदर्भामध्ये अनुदान देणार आहे आणि अश्या परिस्थिती मध्ये आपण शहराच्या स्वच्छतेच्या दृष्टीने योग्य नियोजन हे करण अपेक्षित आहे. आणि त्या अनुषंगाने आयुक्तांनी त्यांची भुमिका मांडावी.

**श्री.दिलीप पोकळे :-** मला या विषयाच्या अनुषंगाने सांगायचे आहे की , मागच्या दोन सभेमध्ये मी हा विषय मांडला होता की जळगांव शहरातील गटारींची व रस्त्यांची लांबी रूंदी आपण मोजणी करणार व त्यानंतर आपण त्या आधारावर सफाई कामगांराची नियुक्ती करणार आहे. त्यानंतर ४० लागले तर ४० कामगार देवु याच्याबद्दल बोललो होतो. मागील स्थायी समिती सभेमध्ये गटारींची व रस्त्यांची लांबी रूंदी करणार असे सांगीतले होते व त्याचा अहवाल सादर करणार होते .

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब.

**मा.महापौर :-** हो बोला

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब.

**मा.महापौर :-** हो बोला

**मा.उपमहापौर :-** हो बोला आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब या ठिकाणी नितीनभाऊ लढ्ढा आणि पोकळे साहेबांनी जे विषय मांडले तर या अनुषंगाने ज्यावेळेस ठेके दिले होते त्यावेळेसचे कर्मचारी त्यानंतर वॉटरग्रेस ला मक्ता देण्यापुर्वी जे महानगरपालिकेचे खर्चाचे जे निष्कर्ष पाहीले गेले ते जसे उदय पाटील यांनी सांगीतले त्यानुसार माझ्यामते ते असे पाहीले गेले आहे की मागच्या खर्चाच्या अनुषंगाने या वेळेस हा ठेका देतांना कर्मचाऱ्यांची संख्या जास्त घेतली गेलेली आहे. ॲकच्युअली त्यांनी वॉर्डांच्या चर्तुसीमा व गटारींची संख्या ह्या निश्चित करून त्याकरीता कामगागारांची संख्या किती कामगार लागतील तरी याच्या अनुषंगाने त्यांनी मागच्या खर्चाच्या आधारावर डिपेंड राहून त्यांनी ह्या मक्त्याची सुरूवात केलेली आहे. मुळात तेच चुकीचे आहे वॉर्डांच्या चुर्तुसीमा व गटारींची लांबी रूंदी जर सीमा त्यांनी निश्चित केल्या असत्या. तर हे झाले नसते शहरातील काही भागांची साफसफाई होत नाहीये. आजही आणि आज जो विषय चर्चेला आहे त्याबद्दल वाद नाही माझी आयुक्त साहेबांनी विनंती आहे की त्यांनी एस.आय लोकांची बैठक घ्यावी आणि त्यामध्ये त्यांनी त्यांच्या प्रभागाच्या सीमेवरून वॉर्डाची सीमा ही ठरवावी व त्यानुसार कामगारांची संख्या ठरवावी. तरी आयुक्तांनी याबाबत नियोजन करावे व म.महापौरांना वॉटरग्रेस बद्दल किंवा या ठेक्याच्या अनुषंगाने यानंतर काही नगरसेवक यांनी याच्याबद्दल शंका असेल त्यांनीही बोलावे.

**श्री. चेतन सनकत :-** आप्पासाहेब मी काय म्हणतोय .

**म.उपमहापौर :-** चेतन भाऊ दोन मिनिट थांबा आयुक्त साहेब बोलत आहेत.

**श्री. चेतन सनकत :-** आपले जे सफाई कर्मचारी आहेत मी मागच्या सभेमध्ये बोललो होतो .

**मा.आयुक्त :-** मा.महापौर , मा.सभागृह हा जो आता जळगांव शहराच्या स्वच्छतेच्या बाबतीत चर्चेमध्ये सन्मा. सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत . त्याच्या पाठीमागे एक समानसुत्र एक असे दिसतेय की जी काही कर्मचारी संख्या आपण सद्या ठरविलेली आहे. त्याच्यामध्ये आपण दोन भाग केलेले आहे. एक कचरा उचलण्यासाठी लागणारे कर्मचारी ते घंटागाडी वरील असतील , ट्रॅक्टरवरील असतील किंवा अन्य वाहनांवरील असतील हे कर्मचारी आणि दुसरा गृप म्हणजे गटार आणि रस्ते स्वच्छ करणारे आपले कर्मचारी आता रस्ते व गटार स्वच्छतेसाठी लागणारे जे कर्मचारी आहेत. याची संख्या आपण ४०० ठरविलेली आहे . आता ही जी ४०० कर्मचारी संख्या ठरविलेली आहे. याच्यामध्ये बहुतांश सदस्यांकडून याच्याबाबतीमध्ये सुर येतोय की या ४०० कर्मचाऱ्यांकडून शहराचा वाढता भाग व वाढती लोकसंख्या प्रोटीन पॉप्युलेशन पाहाता , वाढता व्यापार या सगळयांचा जर विचार केला तर हे ४०० कर्मचारी आपल्याला रस्ते व गटार स्वच्छतेसाठी कमी पडत आहेत. आपण सर्वजण सर्व सन्मा. सदस्य आपल्या प्रभागामध्ये दैनंदिन लोकांच्या संपर्कामध्ये असतात.आपले त्या प्रभागावर नियंत्रण आहे त्यामुळे निश्चितच आपल्याकडून जे काही येणारे फिडबॅक आहेत त्याला एक वेगळे महत्व निश्चित आहे. तरी सन्मा. सदस्य म्हणताहेत की आपल्या प्रभागामध्ये कर्मचारी संख्या कमी आहे तर यावर नक्कीच प्रशासन गांर्भीयाने विचार करेल . आता आपण ज्यावेळेला ४०० कर्मचाऱ्यांची संख्या ठरवली मला असे वाटते की त्यावेळेला आपण काहीतरी आपण त्याच्यामध्ये शहराची लोकसंख्या आणि शहराचं एकूण क्षेत्रफळ आणि प्रत्येक प्रभागाची सीमा याचा विचार करून केलेला असेल किंवा आपले जे मागील कर्मचारी केवळ या निष्कर्षावर ठरविलेले नसावेत असा एक माझा अंदाज आहे. परंतु त्यावेळेला हा एकमुस्त ठेका देण्याच्या संदर्भातला हा प्रस्ताव मा.महासभेसमोर ठेवलेला होता. त्यावेळेला ४०० कर्मचारी संख्या कशी निश्चित केली याच्या सदरचा या बाबतीमध्ये आपण फेरआढावा घेवु .निश्चितच बहुतांश सन्मा.सदस्यांकडून कर्मचारी संख्या कमी आहे आणि त्याचा फेरविचार करून वाढविणे गरजेचे आहे तरी प्रशासन निश्चित याबाबती मध्ये मोठया मनाने विचार करेल . परंतू हे करीत असतांना आपल्याला दोन गोष्टींचा विचार केला पाहीजे . केवळ आपल्याला रस्ते , गटारींची लांबी किंवा शहराचे क्षेत्रफळ या संदर्भात विचार करून आपल्याला कर्मचारी संख्या निश्चित करता येणार नाही . सन्मा . नितीनभाऊंनी आता मुद्दा मांडला की ३ हजार स्के. मीटर एवढे क्षेत्रफळ आपण एका कर्मचाऱ्याकडून साफसफाई करतो आणि ३०० रनिंग मीटर एवढे एका गटार स्वच्छेतेचे काम आपण करून घ्यावी. आता हे सर्व निकष ठरवित असतांना एका विशिष्ठ पार्श्वभुमिवर ठरविलेले आहेत.प्रत्येक शहराची पार्श्वभुमि वेगळी आहे. त्याचबरोबरीने सन्मा सदस्यांसमोर मला एक विषय मांडायचा आहे की आपण हा जो ठेका दिलेला आहे आणि याच्या संदर्भातील जे आपले घनकचरा व्यवस्थापन २०१६ संबंधीचे जे नियम आहेत . त्याच्यामध्ये एक बाब आपण प्रामुख्याने लक्षात घेतली पाहीजे आणि त्या पार्श्वभुमिवर आपल्याला कर्मचारी संख्या निश्चित करणे गरजेच आहे . केवळ आपल्याला रस्त्याची लांबी किंवा गटारींची लांबी आणि रुंदी एवढया आपल्याला वैयक्तीक किंवा तांत्रिक पध्दतीने निश्चित करणे योग्य होणार नाही. मुद्दा असा आहे त्याच्यामध्ये कि आपल्या शहरामध्ये जेव्हा आपण हा

एकमुस्त ठेका दिलेला आहे . त्याच्यामध्ये प्रामुख्याने एक अट अशी घातलेली आहे की ज्यावेळेला घनकचरा व्यवस्थापनाच्या नियमामध्ये आहे की प्रत्येक नागरीकाने आपल्या घरामध्ये निर्माण होणारा कचरा पहिले तर थेट आपण घंटागाडी मध्ये टाकणे गरजेचे आहे. म्हणजे हाऊस टु हाऊस कलेक्शन जे आहे रोज दैनंदिन कचरा गोळा करणे हे गरजेच आहे . आपल्याला याचा फायदा असा होणार आहे की आताची परिस्थिती आपण बघितली आपण आरोग्य खात्याचा रेशो बघीतला तर त्याच्यामध्ये साधारणत: ६० ते ७० टक्के कचरा आपला हा थेट घरोघरी जाऊन गोळा होतो म्हणजे थोडक्यात घंटागाडीच्या माध्यमामधुन आणि बाकीचा जो कचरा आहे .

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब .

**मा.महापौर :-** बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब आता साहेब जे म्हणाले ६० ते ७० टक्के कचरा गोळा होतो त्याकरीता आपण १०० टक्के यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करावे .

**मा.आयुक्त :-** बरोबर आहे. सन्मा. कैलास आप्पा यांचे म्हणणे बरोबर आहे . त्यात वॉटरग्रेस च्या करारनाम्याच्या कागदपत्रांमध्ये सुध्दा नमुद केलेल आहे की आपल्याला हे जे कचरा संकलन आहे तो आपल्याला १०० टक्क्यापर्यंत न्यायचा आहे. म्हणजे यात आपल्याला जे घरोघरी जावुन कचरा संकलन करायचे आहे.ते आपल्याला १०० टक्के करायचे आहे.याच्या पाठीमागचा हेतु असा आहे की आता जे मी म्हंटल की साधारण ३० ते ३५ टक्के कचरा घंटागाडीद्वारे जमा होत नाही . काही लोक घंटागाडी मध्ये टाकत नसतील किंवा घंटागाडीचे टायमींग सोईचे नसेल कदाचित काही भागामध्ये तसेच घंटागाडयांची संख्या आपली काहीशी पुरेशी नाहीये . या सगळया बाबींचा एकत्रित विचार करून आपल्याला १०० टक्के गाडयामधला कचरा हा घरोघरी जावुन गोळा करणे हे ज्यावेळेला आपल्याला शक्य होईल .त्यादृष्टीने आपण ९० टक्क्यापर्यंत जावु १०० टक्क्यापर्यंत जावु त्यावेळेला रस्त्यावर पडणारा कचरा जो आहे. आणि गटार मधुन येणारी घाण जी आहे ती कमी होणार आहे आणि अश्या परिस्थितीमध्ये जर रस्त्यावरचा कचरा आपण कमी करू शकलो गटार मधला कचरा जर आपण कमी करू शकलो तर आपल्याला रस्ते आणि गटार सफाई साठी लागणारे कर्मचारी आहेत त्यांची संख्या आपल्याला निश्‍चितपणे यश हे मिळणार आहे. याचा अर्थ फक्त कर्मचारी कमी करायचेत किंवा आपल्याला घनकचऱ्यावरचा खर्च कमी करायचा मात्र शहरामध्ये स्वच्छता राहीली नाही तरी चालेल हे कदापीही आपले धोरण असणार नाही . खरतर आपल्याला कुठल्याही परिस्थतीमध्ये नागरीकांच्या सहकार्याने आपल्याला दैनंदिन स्वच्छता करावी लागेल मग त्याच्यामध्ये कचरा उचलणे असेल , गटारी सफाई करणे असेल किंवा रस्ते स्वच्छता असेल या सगळयांच्या दृष्टीने आपल्याला कमीत कमी कर्मचाऱ्यांमध्ये परंतू आवश्यक तेवढया कर्मचाऱ्यामध्ये आपल्याला कशी साफसफाई करता येईल या दृष्टीने आपण या संबंधी आढावा घेवू याच्यासाठी आपल्याला थोडासा अवधी थांबले पाहीजे तसेच आपण आता नुकतेच १ तारखेपासुन ठेकेदारामार्फत हे काम आपण सुरू केलेले आहे. एवढया सगळया कालावधीमध्ये आपल्याला घरोघर कचरा संकलनाच प्रमाण वाढेल आणि रस्त्यावर पडणारा कचरा कमी होईल.त्या परिस्थितीमध्ये मग आपल्याला रस्ते व किंवा त्या वार्डांचे जे काही भौगोलिक क्षेत्र आहे या सगळयांचा विचार करून स्वच्छतेसाठी किती कामगार लागणार आहेत. किंवा उर्वरीत ज्या सीमा आहेत त्या सगळयांचा आपण विचार करून हे निश्‍चित करूया आणि राहीली कर्मचारी संख्या तर त्या कर्मचारी संख्येच्या बाबत पुन्हा आपण महासभेसमोर मांडूया.

**श्री.कुलभुषण पाटील** :- मला बोलण्याची परवानगी द्यावी.

**म.महापौर :-** हो बोला.

**श्री.कुलभुषण पाटील** :- मा.महापौर , मा.आयुक्त साहेब तसेच सन्मा.सभागृह मला एक सांगा की आता आयुक्त साहेब बोलले की सर्वेक्षण करावे लागेल आता सर्वेक्षण तसेच आर्थिक नियोजनाच्या माध्यमातुन शहराची काळजी घेवुन आणि सर्व ही प्रक्रीया राबवली. परंतू आयुक्त साहेब माझा प्रश्न असा आहे की गेल्या दोन तीन महिन्यांपासुन आपण एस के कॉन्ट्रक्टरला जो ठेका दिला होता. मनुष्यबळ पुरविण्याचा, लेबर पुरविण्याचा परंतू मला असे विचारायचे आहे की कुठल्याही महासभेची परवानगी न घेता आणि स्थायी समिती ची परवानगी न घेता हा ठेका का देण्यात आला होता आणि त्याने काम पण सुरू केलं त्याच्यानंतर महापौर आहे , उपमहापौर आहे सन्मा.सदस्य आहेत तरी सुध्दा मी या विषयावर आपल्याला भेटायला सुध्दा आलो होतो. परंतू आम्हाला शंका अशी आहेकी आपल्याला असे करता येते का ? पुढचा विषय असा आहे की पालिकेचे धोरण आहे की, आपल्याला याच्यामध्ये कोविडच्या संक्रमणाच्या आजारासंदर्भात हालत नुसार आपण त्याला मंजुरी देवुन काम देण्यात आले होते. परंतू कसे आहे साहेब त्याला कार्यपध्दतीनुसार काम देण्यात आलेले नाही. परंतू हे माझ्या माहितीप्रमाणे हे मी सभागृहामध्ये बोललो होतो . तर त्यावेळेला सुध्दा वॉटरग्रेसचे काम बंद झाले होते . त्याअनुषंगाने आपल्याला सफाई करणे गरजेचे आहे. आपला हा जो ठेका देण्यात आलेला आहे. एस. के. कॉन्ट्रक्टरला ४०० माणसे पुरविण्याच टेंडर दिलेले आहे .

त्यावेळी जे असतील नसतील तो भाग वेगळा आहे. परंतू महापौर महोदया त्यावेळेस मी संपुर्ण जळगांव शहर स्वच्छतेच्या बाबतीत साहेबांना बोलवले होते त्यावेळेस मनुष्यबळाची कमतरता जाणवत होती तरी महापौर महोदया मला एक सांगायचे आहे की त्याच्यामध्ये हॅलो हॅलो ....

**मा.उपमहापौर :-** हो बोला

**श्री.चेतन सनकत :-** आवाज येत नाहीये बरोबर

**मा.महापौर :-** कुलभुषण भाऊ बोला तसेच सर्वांनी माईक बंद करावे.

**मा.उपमहापौर :-** जे बोलताहेत त्यांनीच माईक सुरू ठेवावा. बाकी सर्व सदस्यांनी माईक बंद करावे. आप्पा तुमचा माईक बंद करा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** नवनाथ भाऊ बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** मा.महापौर साहेब दोन मिनिटे बोलु द्या महापौर साहेब.

**मा.महापौर :-** आप्पासाहेब बोला.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मी बोलतोय.

**मा.उपमहापौर :-** कुलभुषण भाऊ बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** मा.महापौर साहेब बोलु द्या महापौर साहेब.

**मा.महापौर :-** आप्पासाहेब बोला.

**ॲड . सौ. शुचिता हाडा** :- मलाही बोलायचे आहे महापौरांनी मला परवानगी द्यावी.

**श्री.कुलभुषण पाटील :-** महापौर महोदया मला याच्यामध्ये जी शंका आहे. हॅलो

**मा.उपमहापौर :-** कुलभुषण भाऊ तुमचे बोलुन झाले आहे का.

**नवनाथ दारकुंडे :-** किती वेळ झाला पुढे घ्याना तुम्ही.

**मा.उपमहापौर :-** ठिक आहे. बोला नवनाथ भाऊ बोला बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** कुलभुषण बोलायचे आहे का ?

**ॲड . सौ. शुचिता हाडा** :- याच विषयावर मलाही बोलायचे आहे महापौरांनी मला परवानगी द्यावी.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आवाज येतोय का? महापौर महोदया याच्यामध्ये कचरा सफाई करीता मनुष्यबळ पुरविणेचे एक सेम टेंडर सिक्युरिटी पुरविणेबाबत दिलेले होते आणि जो ठेकेदार होता. त्याच्या पेक्षा म्हणजे आता एस.के. कॉन्ट्रॅक्टर ला दिलेल आहे. त्याच्या पेक्षा त्याचा रेट कमी होता आणि त्याला मनुष्यबळ पुरविण्याचा अनुभव देखील होता . त्यानंतर आयुक्त साहेबांना मी पत्रही दिलेले होते

**मा.उपमहापौर :-** धिरज माईक बंद करा.

**ॲड . सौ. शुचिता हाडा** :- महापौर ताई याच विषयावर मलाही बोलायचे आहे महापौरांनी मला परवानगी द्यावी.

**मा.महापौर :-** शुचितातार्इ बोला.

**मा.महापौर :-** याच विषयावर बोलायचे आहे त्यांना

**मा.उपमहापौर :-** तोच आहे का ?

**मा.महापौर :-** हो.

**मा.उपमहापौर :-** बोला बोला.

**श्री.चेतन सनकत :-** सर्वात आधी कलम ४४ अन्वयेचे प्रश्न कंम्पलीट करा त्यानंतर तुम्ही जे विषय पत्रिकेवर आहेत त्यानंतर तुम्ही बोला सर्वांना हि एकच विनंती आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापौर ताई आवाज येत नाहीये.

**मा.महापौर :-** शुचितातार्इ बोला.

**श्री.दिलीप पोकळे :-** मा.महापौर ताई माझी विनंती आहे की म.आयुक्त साहेबांनी माझ्या प्रश्नाचं उत्तर द्याव एवढी माझी विनंती आहे.

**ॲड . सौ. शुचिता हाडा** :- महापौर ताई मी याच विषयावर बोलु ईच्छिते आहे हा निर्णय चुकीचा होत आहे .

**मा.महापौर :-** चुकीचा निर्णय होणार नाही.

**ॲड . सौ. शुचिता हाडा** :- चुकीचा निर्णय होत आहे सन्मा.महापौर, सन्मा .सभागृह, आयुक्त साहेब माझे याबद्दलचे काही प्रश्न आहेत. तरी मला या विषयावरुन दिलीपभाऊंनी जो आता मुद्दा मांडला आहे वॉटरग्रेसच्या अनुषंगाने एस के कॉन्ट्रॅक्टर जे

आहेत. त्यांना काम देण्यात आलेले आहे.तर प्रशासनाच्या वतीने हि व्यवस्था जी होती ती तात्पुरती व्यवस्था म्हणून उभारण्यात आलेली होती . तर कुलभुषण भाऊंनी आता जे अतिशय चांगल्या प्रकारे सांगीतले आहे. प्रशासनाच्या वतीने लेखी प्रश्नाची जी उत्तरे मागीतलेली आहेत जसे की आपल्या लक्षात आणुन दिलेले आहे की वॉटरग्रेसच काम बंद झाल्यानंतर हि स्वच्छतेकरीता तात्पुरती व्यवस्था म्हणून बांधकाम विभागाच्या मंजुर दरामध्ये एस.के. कॉन्ट्रक्टरला हा ठेका देण्यात आला. तर हे जे केलेले आहे ते कायदेशीर केलेले आहे का किंबहुना याच्यापुढे माझ म्हणण असे आहे की हे जे प्रशासनाने केले तात्पुरती व्यवस्था म्हणून हे आम्ही काही काळासाठी मान्य करू मात्र ही तात्पुरती व्यवस्था जे आहे कि गांर्भीर्याने प्रशासनाच्या वतीने जी सिव्हिलची साईडबॅक आहे तेवढी दक्षता सिव्हिलनेच घ्यायची आहे. त्याच्याप्रमाणे त्याचे सुध्दा नियोजन प्रशासनाने केलेले आहे. जेव्हा एखाद काम मंजुर दरामध्ये असते जो मंजुर निधी असतो. त्याच्या पेक्षा हे काम जास्त याचं नसत ज्यावेळेला जास्त रकमेच असत. त्यावेळेला नविन निविदा काढाव्या लागतात. तर त्या निधीच्या अनुषंगाने मी प्रशासनाला लेखी कळविलेल आहे आणि प्रशासनाने मला याच कोणतेही उत्तर दिलेले नाही की हे काम ५ महिन्यांसाठी चालेल ४ महिने झाले याचा प्रशासनाने विचार केलेला नाही. स्थायी समितीच्या सदस्यांनी माझ्याकडे या संदर्भातील काही प्रश्न माझ्याकडे उपस्थित केलेले होते. ते प्रश्न सुध्दा प्रशासनाला कळविण्यात आलेले आहेत म्हणून आता ते सगळे प्रश्न मी या सभेमध्ये मांडलेले आहेत. तर आयुक्तांनी या सगळया प्रश्नांची उत्तरे या सभेत या ठिकाणी द्यावीत..

**श्री.दिलीप पोकळे :-** महापौर साहेब मला एक विचारायचे होते की असे करता येवु शकते का ?

**ॲड. सौ. शुचिता हाडा** :- मी आपले प्रश्नांचे लेखी पत्र प्रशासनाकडे दिलेले आहे. तरी आयुक्तांनी सभेमध्ये या सगळा प्रश्नांची उत्तर द्यावीत.

**श्री.दिलीप पोकळे :-** महापौर महोदया आपणांस विनंती आहे आयुक्त साहेबांनी या प्रश्नाच उत्तर द्यावं.

**ॲड . सौ. शुचिता हाडा** :- आयुक्त साहंबांनी या सगळया प्रश्नांची उत्तर द्यावीत. तरी त्याचं उत्तर अपेक्षित आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** आयुक्त साहेबांनी या प्रश्नाच उत्तर दिल तर समाधान होईल.

**श्री.उदय पाटील, आरोग्याधिकारी :-** मा.महापौर, सन्मा.सभागृह सन्मा सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या संदर्भात मी खुलासा करू ईच्छितो, सर्वप्रथम घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत सन २०१९ ते सन २०२४ या ५ वर्षाकरीता दरवर्षी १५ कोटी रूपये खर्चाची तरतूद १४ व्या वित्त आयोगाच्या निधितुन करणेस महासभा ठराव क्रं. १४९ दि. ०६/०६/२०१९ अन्वये साफसफाईच्या कामा करीता तरतूद केलेली होती . ज्या मधल्या परिस्थिती मध्ये वॉटरग्रेस कंपनीने दि. ०६/०३/२०२० रोजी काम बंद केल्यामुळे तत्कालीन आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांनी कोरोनाच्या पार्श्वभुमिवर शहरातील कचऱ्याची गंभीर समस्या विचारात घेवुन आता याला पर्यायी व्यवस्था काय तात्काळ हि व्यवस्था निर्माण व्हावी या करीता सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये एस के. कॉन्ट्रॅक्टर यांच्या मंजुर निविदा दरामध्ये ५२० रूपये प्रति मजुर प्रति दिन असे मंजुर होते आणि वॉटरग्रेस कंपनीचे मंजुर दर हे ५४३ रू. होते. प्रति मजुर प्रति दिन तर कमी खर्चामध्ये कमी दराच्या मध्ये तात्काळ आपल्याला सेवा उपलब्ध व्हावी म्हणून आणि मनपाचे आर्थिक हित विचारात घेवुन त्यावेळेला एस.के. कॉन्ट्रॅक्टर यांच्या मंजुर दरात हे काम देण्यात आलेले आहे. हे काम देतांना जो खर्च महिन्याला लागणार होता त्याची तरतूद यापुर्वीच महासभेने केलेली होती. वॉटरग्रेस कंपनीने काम बंद केल्याने अत्यावश्यक सेवा असल्याने तर त्यावेळेस महापौर , उपमहापौर , सभापती , स्थायी समिती व सर्व गटनेत्यांची एकत्रित बैठक घेण्यात आलेली होती. कारण कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे मा.जिल्हाधिकारी यांचेकडील नियम १८८ अन्वये महासभा व स्थायी सभा घेण्यास बंदी असल्यामुळे आपल्याला कुठलाही निर्णय घेता येत नव्हता. दरम्यानच्या कालावधी मध्ये आपण एस के कॉन्ट्रॅक्टरचे पर्यायी मंजुर दर असतांना आपण निविदा प्रक्रीया केली होती. निविदा प्रक्रीयेमध्ये आपल्याला ३ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. परंतू धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आपल्याला महासभेचा ठराव देखील आवश्यक होता . त्यावेळेस सभापती व गटनेत्यांच्या एकत्रित मिटींग मध्ये अस ठरले कि एस के कॉन्ट्रॅक्टर यांच काम चालु ठेवावे जोपर्यंत या निविदा अंतीम होत नाहीत तो पर्यंत एस के कॉन्ट्रॅक्टर यांच काम चालु ठेवावे अस सर्वानुमते सर्वपक्षीय गटनेत्यांच्या उपस्थितीमध्ये ठरलेल होत आणि त्या संदर्भातील माहिती या दरम्यानच्या कालावधी मध्ये जो आपला खर्च झाला हा जो खर्चाची संविदा होती आपण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ ड ची संविदेची माहिती वेळोवेळी स्थायी समितीपुढे सादर केलेली आहे. नंतरचा प्रश्न असा आहे याच्यामध्ये की १४ व्या वित्तीय आयोगाच्या अंतर्गत कामाच्या प्रस्तावांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार महाशय आयुक्तांना आहेत.यामध्ये यापुर्वीच आपल्याला माहिती असेल आपण सर्व मनपाचे सदस्य आहात. महासभेने ठराव क्रं. ५१९ दि. २६/०९/२०१६ अन्वये घनकचऱ्याच्या अंतर्गत साफसफाईच्या कामावर होणारा खर्चास मान्यता प्रदान केलेली आहे. त्यामुळे पुन्हा या खर्चाला मान्यता घेण्याची आवश्यकता भासली नाही . तदनंतरच्या काळामध्ये आपल्याकडे प्रभाग समिती २ , ३ व ४ च्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्या निविदांचा तांत्रिक लिफाफा देखील उघडण्यात आलेला होता.अंतिम लिफाफा उघडत्यावेळेस त्यावेळेला वॉटरग्रेस कंपनीने

प्रशासनाला लिगल नोटीस दिलेली होती. लिगल नोटीस दिल्याच्या दरम्यान सन्मा.महापौर व स्थायी सदस्यांनी देखील सदर प्राप्त झालेल्या निविदा उघडण्यात येवु नये असे पत्र प्रशासनाला दिलेले होते. त्या अनुषंगाने प्रस्तुत निविदा प्रकरणी मनपाचे विधी सल्लागार यांचे अभिप्राय घेण्यासाठी सदरची संपुर्ण नस्ती त्यांच्याकडे सादर करण्यात आलेली होती . मनपाचे विधि सल्लागार यांचे मत पाहाता वॉटरग्रेस प्रॉडक्ट लि. नाशिक यांचा सोबतचा करारनामा अस्तित्वात असतांना पुन्हा त्याच कामासाठी प्रभाग २ , ३ व ४ करीता परत निविदा उघडल्यास वॉटरग्रेस प्रॉडक्ट लि. नाशिक हे मनपा जळगांव यांचे विरूध्द करारनाम्याचा भंग केल्याचा ठपका ठेवुन नुकसान भरपाई साठी मे. उच्च न्यायालयात दावा दाखल करू शकतात व त्यामुळे भविष्यात मनपा जळगांव यांचेवर आर्थिक जबाबदारी निश्चित होवुन मनपा जळगांवचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही . वॉटरग्रेस प्रॉडक्ट लि. नाशिक यांचेशी झालेला करारानामा अस्तित्वात असे पर्यंत म्हणजेच सदरचा करारनामा संपेपर्यंत अथवा कायदेशीर प्रक्रीयेने रद्द करेपर्यंत प्रभाग २, ३ , ४ साठी घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामाकरीता मंजुर व वाहन चालक पुरविणेबाबतचा पुन्हा निविदा उघडणे कायदेशीररित्या योग्य होणार नाही असे मत व अभिप्राय आपले मनपाच्या विधी कायदे सल्लागार यांनी मांडलेले आहे आणि या दिवसांत मा.आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांनी देखील ते प्रस्ताव मान्य करून प्रभाग समिती करीता आपण मागविलेल्या २ , ३ ,४ च्या ई- निविदा प्रक्रीया रद्द करण्यात आलेली आहे. यामुळे आपल्याकडे अश्या परिस्थिती मध्ये शहराचे आरोग्य, स्वच्छतेच्या दृष्टीने त्या व कोरोना संसर्गाचा प्रादुर्भाव व मनपाचे हित विचारात घेवुन आपण एस.के. कॉन्ट्रक्टर यांचेकडून तात्पुरत्या स्वरूपात काम करून घेतलेले आहे. परंतू या दरम्यानच्या कालावधी मध्ये कायदेशीर नोटीसच्या अनुषंगाने सन्मा .सदस्य आपल्या महापालिकेचे आयुक्त साहेब यांच्या दालनात या संदर्भामध्ये म.महापौर , म.उपमहापौर , म.सभापती, म.विरोधीपक्ष नेते , म.गटनेते , उपायुक्त यांची एकत्रित बैठक घेण्यात आली. त्याठिकाणी महानगरपालिकेचे विधि सल्लागार यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार वॉटरग्रेस प्रॉडक्ट लि. नाशिक यांना एक संधी देणे योग्य होईल असे सर्व सन्मा.सदस्य व पदाधिकारी यांनी एकमताने सहमती दर्शवली. त्याअनुषंगाने म.आयुक्त यांनी सन्मा.पदाधिकारी तसेच मनपाचे आर्थिक हित लक्षात घेवुन एकमताने सदर सभेमध्ये म.आयुक्तांना प्राधिकृत करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने म.आयुक्तांनी दि.३१/०७/२०२० च्या पत्रान्वये वॉटरग्रेस कंपनीला पुन्हा काम सुरू करण्याची एक शेवटची संधी देण्यात आलेली आहे आणि या अनुषंगाने वॉटरग्रेस कंपनीने दि. ०१/०८/२०२० पासुन काम सुरू केलेले आहे. वॉटरग्रेस कंपनीच्या कामामध्ये जर सुधारणा आढळुन आली नाही तर ही त्यांना शेवटची संधी आहे जर त्यांना शेवटच्या संधीचा त्यांना फायदा घेता आला नाही तर सदरचा मक्ता रद्द करण्याबाबची पुढील कार्यवाही प्रशासनाच्या विचाराधीन आहे.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई मला साहेबांनी सांगीतलेल्या खुलाश्यावर बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला चेतन भाऊ .

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई मला या अनुषंगाने बोलायचे आहे की जी संविदा आयुक्तांनी ७३ ड च्या अनुषंगाने हि संविदा राबविलेली आहे. त्याचा ७३ ड च्या संविदा मध्ये काय आहे हे अगोदर प्रशासनाने याचा खुलासा करून द्यावा. मला ७३ ड मध्ये त्यांना १५ दिवसांच्या आतमध्ये त्यांना संविदा मिटींग मध्ये ठेवणे गरजेचे आहे. स्थायी समिती समोर आणि आता किती दिवस झालेले आहेत .याच्या आणि हे करण्याच्या अगोदर आपली २ महिन्याआधी स्थायी समितीची मिटींग झालेली आहे. त्यावेळेला हे त्यांनी सादर का नाही केले तरी मला समजावुन सांगावे . मा.महापौर मी स्थायी समितीचा सदस्य आहे तर याबाबत काय आहे याचा खुलासा करावा.

**श्री.उदय पाटील , आरोग्याधिकारी :-** नमस्कार सन्मा. सदस्यांनी उपस्थित केल्याप्रमाणे मी खुलासा करी ईच्छितो की ७३ ड नुसार महाशय आयुक्तांना जे प्राप्त अधिकार आहेत. संविदा करण्याचे त्या अधिकारा अंतर्गत घेतलेल्या निर्णयानुसार ती संविदा हि विहीत मुदतीत स्थायी समितीसमोर सादर करण्यात आलेली आहे. तसेच सभा न झाल्यामुळे हा प्रश्न येथे उपस्थित झालेला आहे.

**श्री.चेतन सनकत :-** बापुसाहेब या विषयावर मला असे बोलायचे आहे की , स्टँडींग कमिटी ची सभा एक मिनिट भाऊ माझ बोलणं पुर्ण होवु द्या नंतर बोला, मागे आपण मिटींग बोलावलेली होती मे महिन्याच्या दरम्यान हे बरोबर आहे का ? लॉकडाऊन मध्ये आपण स्थायी समिती ची मिटींग बोलावलेली होती . त्यावेळेस हा विषय का आला नाही , हा विषय ६ महिन्यानंतर आला आहे आता महासभेपुढे ईतका उशिर का झाला असे माझे म्हणण आहे.

**ॲड . सौ.शुचिता हाडा :-** मा.महापौर ताई मला बोलण्याची संधी द्यावी.

**मा.महापौर :-** बोला शुचिता ताई बोला.

**ॲड . सौ.शुचिता हाडा :-** मा.महापौर ताई आणि सन्मा. सभागृह आता उदय पाटील साहेब यांनी जो खुलासा केलेला आहे त्याबद्दल मी पुन्हा एकदा सभागृहामध्ये सांगु ईच्छिते की ,हा जो खुलासा सादर करण्यात आलेला आहे. यामध्ये जी तात्पुरती

व्यवस्था आहे ती मा.कलेक्टर साहेब यांनी तात्पुरत्या स्वरूपात उभारली. त्यावेळी तात्पुरत्या व्यवस्थेला काहीच न विचार करता सभागृह म्हणो, सत्ताधारी किंवा विरोधीपक्ष म्हणो, आम्ही त्याला मान्यता दिलेली आहे. आणि काही या गोष्टी आम्ही ज्या मान्य केलेल्या आहेत. मात्र उदय बापुंनी येथे जो उल्लेख केलेला आहे की , सदस्यांची , गटनेत्यांची , सभापतींची मिटींग घेवुन त्या एस. के. कॉन्ट्रॅक्टर यांना मक्ता देण्यात आला. त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही त्यात फक्त मक्ता देण्याच्या संदर्भात बाकीच्या गटनेत्यांना दिलेले आश्वासन त्यांनी सभागृहासमोर सांगाव. प्रशासनाने हा जो निर्णय घेतलेला होता की, एस.के.कॉन्ट्रॅक्टरला हे काम देण्यात यावं तर प्रशासनाने हे काम देण्यात आलेल आहे. तात्पुरती व्यवस्था म्हणून हे काम देण्यात आलेल आहे. आणि मे महिन्यामध्ये जी स्थायी समितीची सभा झालेली आहे. त्या स्थायी समितीसभेसमोर ती संविदा प्रशासनाने ठेवली त्यावेळेला विरोधी पक्ष नेते व नितीनभाऊ लढ्ढा यांनी सुध्दा काही मुद्यावंर प्रशासनावर आक्षेप नोंदविलेला होता. तात्पुरती व्यवस्था म्हणून निश्चितच प्रशासनाची ही जबाबदारीच आहे, कि जेव्हा हे काम करण्यात आलेले असो किंवा जो कचरा रस्त्यावर पडलेला आहे. त्यावेळेला तो कचरा उचलण हि प्रशासनाची जबाबदारी आहे आणि ते उचलण्यासाठी आणि रस्ते सफाई साठी आणि जळगांवच्या सगळयाच रस्त्यांची जी जबाबदारी आहे. त्यामुळे अजुन एक संविदा आणण्यात आलेली आहे. स्थायी समितीमध्ये मे महिन्यामधल्या स्थायी समितीमध्ये तर त्या वेळेला नितीनभाऊंनी अनेक मुद्दे उपस्थित केलेले होते. स्थायी समिती मध्ये ते तुम्हाला आठवत असेल नितीनभाऊंनी त्यावेळेला जे मुद्दे उपस्थित केलेले होते .स्थायी समिती मध्ये ते मुद्दे मी येथे पुन्हा पुन्हा मांडते आहे की , हि तात्पुरती व्यवस्था हि तात्पुरतीच आहे व व्हायला हवी होती. जेव्हा हि तात्पुरती राहीली नाही ज्यावेळेला अधिकृत केले प्राधिकृत केले त्यावेळेला हा प्रशासनाचा दोष आहे की प्रशासनाने व्यवस्था म्हणून ज्यावेळी त्यांनी सांगीतल्याप्रमाणे अपेक्षित होते , अभिप्रेत होत त्यावेळेला हया गोष्टी अधिकृत निकषाने केलेल्या नाहीत. सदरची व्यवस्था करतांना यामुळे सदस्यांच्या मनात प्रशासनाबद्दल शंका निर्माण झालेली आहे.आणि मी ईथे एकच सांगु ईच्छिते की सगळया सदस्यांच्या मनातल्या सुदधा आयुक्तांबद्दल ज्या शंका निर्माण झालेल्या आहेत कि हे असे निर्णय का घेण्यात आलेले आहेत, आणि ज्यावेळी स्थायी समिती सभेमध्ये जेव्हा सदरच्या संविदा प्रस्तुत करण्यात आलेली होती व सदरच्या संविदा स्थायी समितीसमोर माहितीस्तव सादर करण्यात येत असतात. तर अश्या वेळेस सुध्दा स्थायी समिती सदस्यांनी सुध्दा दुर्लक्ष केलेले होत की हि तात्पुरती व्यवस्था लवकरात लवकर संपवावी. त्यानंतर हि तात्पुरती व्यवस्था कॅरी फॉरवर्ड करण्यात आलेली आहे.तर उदय पाटील यांनी आता जे मांडलेल आहे कि वॉटरग्रेसला पुन्हा काम देण्या संदर्भात जी सर्व पदाधिकाऱ्यासोबत बैठक घेवुन हा निर्णय झालेला आहे की हे ठरलेल आहे की आयुक्तांना प्राधिकृत केलेले आहे. त्या दृष्टीने आम्ही पण प्रशासनाने असे सांगीतले होते की एस.के.कॉन्ट्रॅक्टरला हे काम देतांना गटनेत्यांची पदधिकाऱ्यांची मिटींग बोलावुन त्यांच्या संमतीने हे झाल तर मी पुन्हा एकदा सभागृहाच्या समोर आणुन देवु ईच्छिते की, असा निर्णय नाही हा निर्णय हा प्रशासनाने प्रशासनाच्या करारानुसार घेतलेला होता आणि त्याला तात्पुरती व्यवस्था केलेली होती मात्र त्याला तात्पुरती व्यवस्था हि लांबायला नको आणि हा मक्ता सुध्दा लांबायला नको. त्यावेळेला त्याला नुतनीकरणची बाधा येते हे मात्र मी पुन्हा एकदा म्हणणार आहे की, या पुर्वीचीच पध्दती प्रमाणे महापौर आणि आयुक्त साहेबांना याबद्दल की आयुक्त साहेबांनी याबद्दल सभागृहासमोर खुलासा सादर करावा .

**श्री.कुलभुषण पाटील :-** महापौर महोदया जसे आता साफसफाईचा जो विषय आहे .

**मा.महापौर :-** बोला बोला

**श्री.कुलभुषण पाटील :-** महापौर महोदया जसे आता साफसफाईचा जो विषय आहे. आता उदय बापुंनी जसे सांगीतले की जळगांव शहरामध्ये १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधुन असे काही विषय मंजुर करण्यात आलेले होते , कि त्यांना पुढे साफसफाई करणे असे चांगले राहील परंतू हा जो विषय त्यापेक्षा वेगळा आहे . हा विषय बिलकुल वेगळा आहे कि मला हे लक्षात आणुन द्यायचे आहे की हा खर्च १४ व्या वित्त आयोगामधुन करणेबाबत निर्णय झाला आहे कि १४ व्या वित्त आयोगामधुन तरतूद करण्यात आलेली आहे. परंतू हे योग्य आहे का असा माझा प्रश्न आहे. दुसरा विषय असा होता की आता जसे सभेमध्ये सांगीतले की कुठले कुठले गटनेते या सभेसाठी किंवा या मिटींग साठी हे सर्व उपस्थित होते व कोणी कोणी या विषयास अनुमती दिली व त्यावेळेस जी मिटींग घेतली सभा घेतली त्यावेळेस त्यांचे मुद्दे काय होते याचे बाबत महापौर महोदय सभेस अवगत करावे.

**मा.महापौर :-** आयुक्त साहेब बोला .

**मा.आयुक्त :-** सन्मा.स्थायी समिती सभापती आणि अन्य काही सन्मा.सदस्यांनी याच्या संदर्भामध्ये काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत.त्याच्या संदर्भामध्ये जी काही कार्यवाही प्रशासनाकडून झालेली आहे . याबाबतीत विद्यमान मा.महापौर ताई यांनी वस्तुस्थिती मांडण्यासाठी समोर आणलेले आहे तथापी मा.सभापती , स्थायी समिती यांनी त्या अनुषंगाने काही गोष्टींचा खुलासा मागीतलेला आहे.आता याच्या संदर्भामध्ये एक अतिशय महत्वाचा मुद्दा मा.स्थायी समिती सभापतींनी मांडला आणि तो काही

अंशी योग्य ही आहे. या विषयी काही दुमत नाही की ज्यावेळेला आपण ६ मार्चला हा वॉटरग्रेसच्या कामाच्या संदर्भामध्ये जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यामध्ये ज्यावेळेला वॉटरग्रेस च्या कामामुळे खुपच कामाच्या संदर्भामध्ये हा मुद्दा आलेला होता आणि साधारणत: फेब्रुवारी महिन्यामध्ये अशी परिस्थिती होती की कामगार हि नव्हते आणि या परिस्थिती मध्ये आपण या संदर्भामध्ये आपण त्याला १ जानेवारीला नोटीसही दिलेली होती . त्याच्यानंतर अनेक वेळा त्याच्या बरोबर चर्चा झाली . त्यावेळेचे आयुक्त असतील . त्यावेळेस म.जिल्हाधिकारी यांचेकडे चार्ज गेला त्याच्यामुळे या विषयावर चर्चा झाली माझ्या माहितीप्रमाणे सन्मा.सदस्यांनी सुध्दा या विषयावर महासभेमध्ये चर्चा केली आणि या पार्श्वभुमिवर जवळपास हे काम बंद झाल. त्यावेळेला ६ मार्चला आपण महापालिका प्रशासनाने हे काम वॉटरग्रेस कडून काढुन घेतलं. आता त्यावेळेला आपल्याकडे दोन पर्याय होते एक म्हणजे तात्पुरत्या स्वरूपामध्ये आपण तातडीने दुसऱ्या दिवसापासुन आपल्याला शहर स्वच्छता करण गरजेच आहे. त्यामुळे जे काही आपल्याकडे लेबर सप्लाय करणारे जे काही मक्तेदार असतील त्याच्याकडून लेबर घेण आणि जे काही आपल्याला कुमक लागणार असेल ते आपण त्या कालावधी साठी आपल्याला निविदा प्रक्रीया राबवुन नविन मक्तेदार निश्चित करण आणि नविन दराप्रमाणे कामगार देण. आता हे दोन्हीही पर्याय त्यावेळेला चालु शकले नाही त्यावेळेला आपल्याकडे बांधकाम खात्यामार्फत निविदा प्रक्रीया राबविली होती ते काम बांधकाम खात्याच असेल त्यामधुन एस.के. कॉन्ट्रक्टर नावाची एजन्सी आपण मा.स्थायी समितीच्या मध्ये झालेल्या ठरावाप्रमाणे निश्चित केलेली होती आणि दर दिवशी कामगारांचे दर हे ५२०/- रू प्रतिदिन अश्याप्रकारे निश्चित केलेले होते,आणि तो जो ठराव आहे तो पोस मध्ये होता त्यामध्ये तत्कालीन आयुक्तांनी जी काही उपलब्ध आपल्याकडे पर्याय आहेत, ते एजन्सीकडून स्थायी समितीने मंजुर केलेल्या दराप्रमाणे लेबर देण्याच्या संदर्भातील आणि त्याप्रमाणे दुसऱ्या दिवसापासुन हे काम ७ मार्च पासुन सुरू केले.आता त्याच वेळेला हि तात्पुरती व्यवस्था हि अर्थातच कायम स्वरूपी किंवा कायम ठेवण हे कदापीही योग्य नाही .असे प्रशासनाचे मत आहे.आता आपण त्याच्यासाठी निविदा प्रक्रीया राबवली आणि आता उदय पाटील यांनी सांगीतल्याप्रमाणे हि निविदा प्रक्रीया राबविल्यानंतर आपण जे तांत्रिक लिफाफे उघडले परंतू त्याच्यामध्ये दोन मुद्दे समोर आले. हि जी आपल्याला पर्यायी व्यवस्था ठेकेदारी पध्दतीने आपल्याला करायची होती.तसेच याच्या संदर्भात ज्या निविदा प्रक्रीया राबविल्या त्याच्या मध्ये दोन मुद्दे समोर आले. मा.महापौर ताई आणि अन्य सन्मा.नगरसेवक यांनी त्यावेळी अशी भुमिका लेखी स्वरूपामध्ये त्यावेळी मांडलेली आहे कि हा जो ठेका आहे हा आपण ३ प्रभाग समिती साठी केलेला आहे.प्रभाग क्रं. २, ३ आणि ४ नंबर असा होता. ज्यावेळी प्रभाग समितीसाठी तुम्ही हा ठेका करणे गरजेच होत. नंबर दोन त्या वेळी तत्कालीन आयुक्तांशी महापौर असतील किंवा अन्य काही पदाधिकारी असतील यांची अशी ही चर्चा झाली होती. याबाबत की हा जो ठेका आहे हा ठेका प्रभाग समितींचा ठेका देतांना आम्ही वेगवेगळया ठेकेदाराला देता आला पाहीजे. मी याच्यामध्ये पाहीले की एका पेक्षा जास्त मक्तेदाराला हा ठेका देता येणार नाही. अश्या प्रकारची अट घालण्याची त्यावेळेला चर्चा झालेली होती. तथापी जे काही आयुक्त स्तरावरून त्यावेळेला जी काही निविदा प्रक्रीया राबविली गेली. ती प्रशासनामार्फत त्यामध्ये अश्या प्रकारची कुठलीही अट नव्हती . दुसरी गोष्ट आपण जी काही निविदा प्रक्रीया राबविली होती. ती १ वर्षाच्या कालावधीसाठी राबविलेली होती. परंतू काही सन्मा.सदस्यांनी त्याच्यावर अश्या सुचना होत्या की वॉटरग्रेसचा अनुभव विचारात घेता. आपण या निविदा प्रक्रीयेमध्ये त्या अटी शर्तींमध्ये दुरूस्ती करणे गरजेच आहे.एक म्हणजे एका ठेकेदाराला एका वेळेला एक प्रभाग समितीच काम करता येईल.नंबर दोन एका वर्षाचा ठेका न देता. आपण काही ठराविक कालावधीसाठी हा ठेका द्यावा. त्यामध्ये आपण समजा ३ महिने दिला किंवा ६ महिने दिला जर तो योग्य वाटला आणि त्याच काम चांगल असेल, तर उर्वरीत कालावधीसाठी ठेका वाढवुन द्यावा. तर मग आपण या अटींसह आपण नविन निविदा प्रक्रीया राबवली. अश्याप्रकारच्या लेखी स्वरूपामध्ये मा.महापौरांच व अन्य सन्मा .सदस्यांच्या सुचना आल्या आणि त्या सुचनांना अनुसरून आपण लिफाफा उघडला नाही. तर आपल्याला निविदा प्रक्रीया नव्याने राबवावी लागली . तर दरम्यानच्या काळामध्ये उदय पाटील यांनी सांगीतल्या प्रमाणे वॉटरग्रेस ने आपल्याला एक नोटीस पाठविलेली होती आणि त्यांनी औरंगाबाद येथे हायकोर्ट मध्ये महापालिकेच्या विरोधामध्ये एक दावा दाखल केलेला होता की ज्यावेळेस परंतू आपल्याला आतापर्यंत उपस्थित राहण्याची नोटीस आलेली नाही .तथापी त्यांनी दाखल केलेल्या दावा हा हायकोर्टा मध्ये त्यांच्या ॲरोगेट मार्फत त्याला नंबर जेव्हा लागेल हायकोर्टचा अश्या प्रकारची आपल्याला नोटीस आलेली होती. त्या नोटीसच्या अनुषगांने याच्यामध्ये जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. ज्या पार्श्वभुमीवर आपण जी निविदा प्रक्रीया राबविलेली होती . त्यावर आपण आपल्या महानगरपालिकेच्या विधी सल्लागारांकडून अभिप्राय मागविला आणि तो अभिप्राय प्राप्त झाला तो उदय पाटील यांनी सांगीतला आणि पुन्हा वेळेअभावी रिपीट करत नाही . त्यामुळे या पार्श्वभुमीवर आलेला अभिप्राय हा सांगीतला आहे आणि आपले सन्मा.सदस्य यांच्या पत्रानुसार व सुचनांनुसार निविदे प्रक्रीयेमध्ये अटी शर्तीमध्ये बदल करण्याचे प्रस्ताव या दोन्हीला अनुसरून आपण हे दोघी निविदा प्रक्रीया आपण रद्द केली आणि जे काही आपल्याला लिगल ओपिनियन प्राप्त झालेले होते. त्याच्यामध्ये आपले जे विधी सल्लागार यांनी जो अभिप्राय दिला होता कि जर आपल्याला नव्याने निविदा जर काढायची असेल तर आता जो ठेका आहे वॉटरग्रेसचा त्याच्याबाबतीमध्ये तुम्हाला निर्णय घेणे गरजेचे आहे.पुर्ण कायदेशीर

प्रक्रीया राबवुन व याच्यामध्ये महानगरपालिकेकडे दोन पर्याय आहेत.एक तुम्ही त्याचा ठेका त्याला कायदेशीर पणे नोटीस दिली असेल त्याप्रमाणे व अंतिम नोटीस देवुन त्याच म्हणणे ऐकून त्याच्याप्रमाणे तुम्ही त्याचा ठेका रद्द करू शकता. हा एक पर्याय आहे किंवा जी तो विनंती करतोय की काही दोष हे महानगरपालिकेकडून करायचे राहून गेले होते, जसे रॅम्प असेल , वजन काटा असेल या सगळयांची पुर्तता महानगरपालिकेकडून राहून गेलेली होती . त्याच्यामुळे ठेक्यामध्ये काही अडचणी निर्माण झाल्या होत्या आणि काही बाबतीमध्ये ठेकेदाराकडून काही बाबी राहून गेल्या होत्या तर या मध्ये त्याच्याकडून कामगार पुरविले जात नव्हते. जेवढी वाहन होती ती पुरविली जात नव्हती काही प्रमाणामध्ये महानगरपालिकेने पुरविलेली वाहन ही दुरूस्ती अभावी पडलेली होती. हया दोन्ही बाजुकडून या गोष्टी राहून गेलेल्या आहेत.अशा पार्श्वभुमिवर आपल्याला तो ती विनंती करतोय की माझ्याकडून पुर्वी झालेल्या चुका लक्षात घेता व महानगरपालिकेकडून ज्या गोष्टी राहून गेलेल्या होत्या या गोष्टींचा विचार करून तुम्ही मला एक संधी द्यावी. हि संधी जर महानगरपालिकेने दिली तर यात महानगरपालिकेच काही नुकसान होणार नाही. जर तुम्ही असे केले नाही तर याच हायकोर्टात याच्यासंदर्भात जो दावा आहे.याच्यावर महानगरपालिकेवर भविष्यात कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आपण महानगरपालिकेने त्याला एक संधी द्यायला हरकत नाहीये.आज जी संधी त्याला आपण द्यायची आहे, त्याच्या म्हटंल्याप्रमाणे हा खुप मोठा धोरणात्मक निर्णय आहे. मा.स्थायी समिती सभापतींनी जो मुद्दा उपस्थित केला . कृपया सन्मा.सदस्यांना माझी एक विनंती आहे की ज्यांचे माईक सुरू असतील त्यांनी कृपा करून बंद ठेवावे , म्हणजे आपला आवाजामुळे डिस्टर्ब होणार नाही धन्यवाद . मा. सदस्यांनी व मा.सभापतींनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे की ,ती जी तात्पुरती व्यवस्था होती त्याच्यामुळे आमची सहमती होती परंतू हि तात्पुरती व्यवस्था ५ महिने चालु ठेवणे योग्य नाही. या मुद्दयाच्या बाबतीमध्ये एक गोष्ट आपण विचारात घेतली पाहीजे कि जे काही लिगल ओपिनियन प्राप्त झालं. त्याच्यामध्ये आपल्याला निविदा प्रक्रीया रद्द करावी लागेल. त्यामुळे आपल्याकडे दोनच पर्याय उपलब्ध होते . एक म्हणजे वॉटरग्रेसचा ठेका कायम स्वरूपी रद्द करण, निविदा प्रक्रीया जी काही आपण राबविलेली होती त्या वेळेच्या कराराप्रमाणे व अटी शर्ती प्रमाणे आणि दुसरा पर्याय म्हणजे एक संधी देण आता त्याच्यामध्ये जे काही डिस्पुट आपले वॉटरग्रेसच्या संदर्भामध्ये झालेले होते. त्याच्यामध्ये जे ॲग्रीमेंट आपण महानगरपालिकेने त्याच्याकडे ऑगस्ट मध्ये केलेले आहे. त्या ॲग्रीमेंट मध्ये असे लिहीलेले आहे की महानगरपालिकेत किंवा वॉटरग्रेस याच्यामध्ये कुठल्याही प्रकारचे वाद निर्माण झाले तर याच्यामध्ये अर्बीट्रेशन आणि कन्सोलेशनचे जो ॲक्ट आहे तो कायदा अश्याप्रकारच्या बाजुला लागु होईल. आता त्या कायद्यामधील ज्या काही तरतूदी आहेत. तर त्याप्रमाणे वादविवाद हे सोडविले पाहीजे. मात्र आपण जो करारनामा महानगरपालिकेने त्याच्याशी केलेला आहे. त्या करारनाम्यामध्ये असे म्हंटले आहे की या म्हणजे जो लवाद जो नियुक्त करायचा आहे. तो महानगरपालिकेचे आयुक्त असेल. आता महानगरपालिकेचे आयुक्त हे महानगरपालिकेची भुमिका मांडणार आहेत व महानगरपालिकेच हित पाहणार आहे. वॉटरग्रेस आणि महानगरपालिका याच्यामध्ये ज्यावेळेला वाद निर्माण होतो. त्यावेळेला या ॲक्ट खाली वॉटरग्रेस आणि महानगरपालिका व्यतिरीक्त थर्ड पार्टी ॲग्रीमेट अशी कुणीतरी असली पाहीजे. त्यामुळे वॉटरग्रेसने त्यालाही आक्षेप घेतलेला होता, की आम्हाला आयुक्तांकडून काही मिळणार नाही व आयुक्त हे महानगरपालिकेचीच बाजु उचलुन धरतील वॉटरग्रेसची बाजु ते विचारात घेणार नाहीत. तर याच्यामध्ये थर्ड पार्टी ऑर्ग्रीमेंट तुम्ही नेमावा आणि त्याप्रमाणे आपल्याला ॲग्रीमेंटमध्ये थोडी दुरूस्ती करणे गरजेचे आहे. या सगळयांमध्ये जी काही कायदेशीर गुंतागुंती निर्माण झालेली होती. या पार्श्वभुमिवर आपण त्यांना एक संधी देण आपल्याला नैसर्गिक न्याय तत्वावर देण आपल्याला योग्य राहील. या पार्श्वभुमिवर आपण याचा विचार केला की आपण हे दोनही पर्याय व त्याच्यासोबत प्राप्त झालेली लिगल नोटीस वॉटरग्रेस कडून आणि त्याने केलेला दावा आणि आता व आपले विधी सल्लागार यांचेकडून प्राप्त झालेले जे काही कायदेशीर मत आहे, हे सगळे करून आपण एकत्रित हा प्रस्ताव मा.महासभेसमोर ठेवुया आणि महासभेमध्ये आपण याच्यावर धोरणात्मक निर्णय घेवुया, कि आपण त्याला पुन्हा एक संधी द्यायची किंवा आपण त्याची कायमस्वरूपी लिगली प्रोसीजर करून आपण त्याचा ठेका रद्द करायचा. दरम्यानच्या काळामध्ये ज्यावेळेला हा विषय ठेवला गेला त्यावेळेला कारण कोरोना मुळे महासभा कशी घ्यायची काय घ्यायची याच्यासंदर्भामध्ये मा.महापौर मॅडमांशी सुध्दा याच्या संदर्भामध्ये चर्चा झाली, आणि हे करत असतांना महासभा हि ऑनलाईन पध्दतीने घ्यावी. आपल्या रेग्युलर पध्दतीने घेवु नये अश्या प्रकारचे शासनाचे आदेश प्राप्त झाले. त्यामुळे आपण नेहमीच्या पध्दतीने महासभा घेणार होतो. त्यावेळेला असाही म.महापौरांनी प्रस्ताव दिला होता की आपल्याला संभाजी राजे नाटयगृहामध्ये मा.महासभा घेता येईल का ? तर त्याचीही पाहणी करण्यात आली होती . परंतू ऑनलाईन सभा घेण्याच्या शासनाच्या सुचना आल्यानंतर आपला हा प्रस्ताव आणि त्यानंतर आता हि ऑनलाईन सभा घेण्याचा जो काही हे आता ऑनलाईन सभा घेण्याचा आदेश आलेला आहे आणि याच्याबाबतीमध्ये निर्णय घेण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आपल्याला कदाचित त्याच्याविषयी चर्चा करणे गरजेचे आहे. त्याच्यानंतर आपण महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी व त्याच्यानंतर आपल्याला ठेकेदाराला नोटीस देण व त्याचे म्हणणे ऐकुन घेण व म्हणण ऐकूण घेण्याच्या बाबती मध्ये आपण दोन वेळेला ऐकुन घेतल. नोटीस दिल्यानंतर आपण दोन वेळा आपण ऐकुन घेतले, त्याचे

म्हणणे असे आहे की या लॉकडाऊन मुळे मला नाशिक मधुन मला जळगाव मध्ये येण शक्य होत नाही. जोपर्यंत मला ई पास मिळत नाही तोपर्यंत मला उपस्थित होता येणार नाही .या सगळया ज्या काही अडचणी उदभवल्या या सगळया अडचणी मधुन आपल्याला मार्ग काढण्यामध्ये जो वेळ लागला त्यामुळे आपल्याला हि तात्पुरती व्यवस्था चालु ठेवावी लागली , मधल्या पिरीयेड मध्ये आपल्याला आरोग्याच काम बघणारे आपल्याकडे जे उपायुक्त नव्हते आपल्यालाही माहिती आहे. एप्रिल ऐन्ड पासुन मे च्या सुरूवातीला जवळपास ३ आठवडे त्यामुळे ते अनुपस्थित असल्यामुळे त्यामुळे आपण हि तात्पुरती व्यवस्था म्हणून आपण त्यांना कार्यभार दिलेला होता. त्यामुळे आपण ज्यावेळेला हा मुद्दा महासभेसमोर ठेवायचा तर पुन्हा आपले उपायुक्त, आरोग्य . दंडवते यांची पुन्हा बदली झाली आणि या सगळया मधल्या पिरियेड मध्ये आपल्याला हा जो काही वेळ लागलेला आहे. त्याच्यामुळे हि जी काही तात्पुरती व्यवस्था कदाचित सन्मा.स्थायी समिती सभापती म्हणतात त्याप्रमाणे आपल्याला या कामासाठी आपल्याला थोडा वेळ कदाचित जास्त करावी लागली. परंतू एक मुद्दा सन्मा.सभापती आणि सन्मा.सदस्यांनी एक विचारात घ्यावा, कि या सगळयांमध्ये आपण कुठेही कायदेशीर गोष्टींचे आपण काहीही उल्लंघन केलेल नाहीये. महानगरपालिकेचे आपले कुठल्याही आर्थिक हिताच नुकसान झालेले नाही. आपला जो दर होता त्याच्यापेक्षा कमी दरामध्ये आपण काम केलेले आहे,आणि याच्यामध्ये आता खुलासा केला होता की या सगळया वेळेमध्ये ज्या ज्या वेळेला प्रशासकीय मान्यता आयुक्त स्तरावरून देण्यात आलेली आहे. त्या त्या वेळेला मान्यता हे ठरलेल्या दराप्रमाणे मा.सभापती , स्थायी समिती यांच्यासमोर आणुन दिलेले आहेत. मे महिन्यामध्ये झालेल्या मा.स्थायी समिती सभेमध्ये कृपया सन्मा.सदस्यांना विनंती आहे की प्लीज आपआपले माईक बंद ठेवावे.

**मा.महापौर :-** आयुक्त साहेबांचे बोलणे पुर्ण झाल्यानंतर बोला आपण .

**मा.आयुक्त :-** धन्यवाद महापौर महोदया , मे महिन्यामध्ये ज्यावेळेला स्थायी समितीची सभा झाली त्यावेळेला त्याच्यापुर्वी ज्या काही प्रशासकीय मान्यता होत्या त्याबद्दलचा विषय हा मा.स्थायी समिती समोर होता . त्यावेळेला मा.नितीनभाऊ असतील किंवा जे स्थायी समितीचे सन्मा .सदस्य आहेत त्यांनी याच्यावर जे काही मुद्दे उपस्थित केले त्यावेळेला याच्यावरचा खुलासा प्रशासनाने त्यावेळेला केलेला आहे. त्यानंतर काही आपल्या स्थायी समिती सदस्यांनी मा.सभापतीं याच्याकडे या संदर्भामध्ये काही लेखी निवेदन दिलेले होते. तर या संदर्भामध्ये मा.स्थायी समिती सभापतींनी जे निवेदन प्रशासनाकडे पाठविलेले होते. त्या अनुषंगाने मा.महापौर, मा.स्थायी समिती सभापती आणि सदस्या यांच्या सोबत झालेल्या चर्चे अंती सुध्दा प्रशासनाने हि पार्श्वभुमि आहे याची हि कायदेशीर बाजु आहे याच्याबाबतीमध्ये खुलासा केलेला होता. त्यानंतरही मा.सभापतींनी ज्यावेळेला पत्र दिल त्यावेळेला हा खुलासा हा उपायुक्त आरोग्य यांच्यामार्फत त्यांच्याकडे करण्यात आलेला आहे. मी सभागृहास एक सांगु ईच्छितो की जो काही आपल्याला वॉटरग्रेस च्या संदर्भामध्ये निर्माण झालेला जो काही गुंतागुंतीचा कायदेशीर वेळ आहे हा जो काही असेल तर त्या मधल्या पिरीयेड मध्ये जे काही आपल्याला उपलब्ध पर्याय आहेत त्याच्यामध्ये महानगरपालिकेचे कुठलेही आर्थिक नुकसान न होता. जो काही आपल्याला सर्वात चांगला पर्याय असेल.तो प्रशासनाने निवडलेला आहे.याच्यामध्ये महानगरपालिकेच हित, कोरोनाची पार्श्वभुमि, आणि शहरातील नागरीकांच आरोग्य या सगळयांचा एकत्रित विचार करून आपण हा निर्णय घेतलेला आहे, आणि याच्यामध्ये कुठेही महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेतलेली असल्यामुळे माझी पुन्हा एकदा मा.सदस्यांना विनंती राहील कि याच्यासंदर्भामध्ये कुठल्याही शंका उपस्थित न करता आता या पार्श्वभुमिवर नसावी अशी माझी अपेक्षा आहे.धन्यवाद.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर महोदया मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** सुनिलभाऊ महाजन बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** कृपया सगळया सदस्यांना विनंती आहे की स्पिकर बंद करावे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदय.

**मा.महापौर :-** ईबाभाऊ बोला बोला

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हॅलो.

**मा.महापौर :-** ईबाभाऊ बोला बोला

**मा.महापौर :-** शुचिता ताई बोला तुम्ही.

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** मा.महापौर ताई आणि सन्मा.सभागृह आता जो आयुक्त साहेबांनी जो खुलासा केलेला आहे.तर आता पुन्हा एकदा सर्व सदस्यांच्या वतीने आयुक्त साहेबांच्या लक्षात आणून द्यायच आहे की आता सुध्दा CBC च्या गाईडलाईन बद्दल जो मुद्दा मांडलेला आहे. त्याबद्दल CBC ने प्रस्ताव दिलेला नाहीये येथे यापुर्वी जी पुर्तता प्रशासनाने केलेली होती त्यावेळेला अर्थसंकल्पामध्ये .

**मा.आयुक्त :-** बरोबर आहे तुम्ही जो मुद्दा त्यावेळेला CBC च्या गाईडलाईनच्या बाबतीत मांडला होता तो राहून गेलेला आहे तो खुलासा मी येथे करतो तर CBC च्या गाईडलाईन्स आहेत. केंद्रीय शासनाच्या गाईडलाईन्स आहेत त्याच्यामध्ये आता जो मुद्दा मा.सभापती स्थायी समिती यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्या स्वत: प्रक्टीसींग ॲडव्होकेट असल्यामुळे कायदेशीर त्यांचा अभ्यास हा निश्चितच आहे. या पार्श्वभुमिवर मी फक्त एकच खुलासा करू ईच्छितो कि आपण जे म्हणताहेत कि एखाद्या कामाच्या संदर्भामध्ये ज्या काही खर्चाला मान्यता आपल्याला मिळालेली आहे. त्या खर्चामध्ये जर ठराविक रकमेपेक्षा जर जास्त खर्च हा होत असेल तर आपल्याला त्याला नव्याने मान्यता दिली पाहीजे किंवा नव्याने निविदा प्रक्रीया राबविली पाहीजे . या बद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही. प्रशासन आपल्या मताशी सहमत आहे. मुद्दा एकच आहे की, स्थायी समितीचा जो ठराव आहे आपण केलेला आहे. तो त्या कामासाठीच आहे` व कामासाठी आपण कुठल्याही ईस्टिमेट मध्ये वाढ केलेली नाही .व खर्चामध्ये वाढ केलेली नाही स्थायी समितीची मान्यता हि स्थायी समितीने दिली आहे. ती बांधकाम खात्यामार्फत जे कामकाज चालत नागरीकांचे असेल किंवा अन्य काही कामं असतील याच्या संदर्भामध्ये जी काही मंजुरी दिलेली होती. त्या खर्चामध्ये जर आपल्या म्हणण्याप्रमाणे जर वाढ होणार असेल तर त्या खर्चाला आपल्याला स्थायी समितीची मान्यता किंवा निविदा प्रक्रीया राबविणे गरजेचे आहे. हे जे काम आहे हे काम जे काही स्थायी समितीने मंजुर केलेले होते. त्या कामाशी संबंधीत नाहीये. या कामाची जी प्रशासकीय मान्यता आहे. ती आता उदय पाटील यांनी सांगीतल्या प्रमाणे १४ व्या वित्त आयोगामध्ये जे आयुक्तांना जे दिलेले अधिकार आहेत. त्यामध्ये ही प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे आपल्याला स्थायी समितीने दिलेल्या मान्यतेपेक्षा जादा खर्च झाला तर निविदा काढणे कारण जी मान्यता आहे तर हि घनकचऱ्याची आहे व हि मान्यता डांबरीकरणाच्या कामाची आहे. त्यामुळे आपल्याला याच्यामध्ये कुठल्याही प्रकारची वेगळी मान्यता स्थायी समितीची मान्यता घेण्याची गरज नव्हती. कारण आपण बांधकाम खात्याच जे काम आहे हे त्या मर्यादेमध्ये केलेले आहे. हे जे काम आहे घनकचऱ्याचे याच्यासाठी वेळोवेळी जी प्रशासकीय मान्यता आहे हि केंद्र आणि राज्य शासनाने दिलेल्या आदेशान्वये व त्या त्या वेळी आयुक्तांनी दिलेल्या मान्यता असल्यामुळे याच्यामध्ये केंद्रीय दक्षता आयोगाचे कुठल्याही सुचनेचा आपल्याकडून कुठल्याही प्रकारे उल्लंघन होत नाही. असे याच्यामध्ये प्रशासनाचे मत आहे.

**मा.महापौर :-** शुचिता ताई बोला.

**ॲड . सौ.शुचिता हाडा :-** आता जे आयुक्त साहेबांनी मांडलेल आहे ते की केंद्रीय दक्षता आयोगाचे उल्लंघन होत नाही. तर त्यांचे हे स्पष्टीकरण मला पटलेले नाही. जेव्हा या प्रक्रीयेपेक्षा एस के कॉन्ट्रक्टर चे काम बघता आपण हे काम बांधकाम च्या मंजुर दरामध्ये दिलेल होत त्यावेळेला २५ टक्के प्रमाण हे जास्त होते आहे. त्यावेळेला आपल्याला महानगरपालिकेचे हित हे साधण व सध्याची परिस्थिती प्रशासनाला हि कार्यपध्दती हि प्रशासनाची वेगळी आहे याच्याबाबत काही दुमत नाहीये . व हि जी प्रक्रीया आहे. तर याच्यामध्ये सदस्यांना विश्वासात घेवुन करणे गरजेचे आहे हि प्रशासनाची कार्यपध्दती चुकीची आहे. तर मागे दिलेल्या पत्रामुळे सगळेच सदस्य सहमत असतील त्या सदस्यांनी आपल मत मांडले. मी येथे सांगु ईच्छिते की आपण स्वच्छतेचे जे काम एस के कॉन्ट्रक्टर कडे दिले तर त्यावेळेला त्याची बँकगॅरंटी तपासली होती का? तर हि प्रक्रीया ज्यावेळेला एवढा वेळ वाढू शकते. नितीन भाऊ व ईतर सदस्यांनी सुध्दा हे प्रश्न मांडलेले आहेतच. तर याच्यामध्ये आयुक्त साहेब सांगायचे आहे की सध्या हि संशयास्पद भुमिका आहे प्रशासनाची स्थायी समितीच्या ठरावानुसार हा ठेका देण्यात आला की ज्या स्थायी समितीच्या ठरावानुसार बांधकामच्या मंजुर दर निश्चित झालेला होता. त्या ठरावामुळे आपण हे काम त्यांच्याकडे दिल. मला हे प्रशासनाच्या लक्षात आणयच आहे की आपण जे पुर्वी पत्र दिलेल आहे. ते आज पुन्हा या सभागृहासमोर आणुन देते की तो जो ठराव आहे स्थायी समितीचा २०१९ चा ठराव आहे तर तो या जुलैमध्ये संपलेला असतांना त्यामध्ये प्रशासनाने कुठल्याही प्रकारे अधिकार नसतांना व डेडलाईन झालेली आहे. यामुळे या सगळया गोष्टींवर सुध्दा आयुक्तांची हि प्रशासनाची संशयास्पद भुमिका असेल तर ती सगळया सदस्यांना वाटते आहे . मी सगळया सदस्यांना येथे सांगू ईच्छिते की, आयुक्तांनी मागे लागून जळगांव महापालिकेमध्ये हा ठेका देण्यात आलेला आहे आणि आता सगळया सदस्यांचे मत आहे की कुठेही प्रभावीपणे काम केल्याच आयुक्त साहेबांच दिसुन आलेले नाही. यामध्ये कोणत्याही प्रकारच्या मिटींगला लोकप्रतिनिंधींना विश्वासात घेवुन हा निर्णय घेण्यात आलेला नाही . त्यामुळे आयुक्तांवर अविश्वास प्रस्ताव आणण्या ईतपत वेळ येवु नये अशी आयुक्तांना आणि प्रशासनाला त्यांची कार्यपध्दती सुधारण्याकरीता मी स्थायी समितीच्या वतीने हि सुचना देते आहे. यामध्ये प्रशासनाची भुमिका हि संशयास्पद दिसत आहे. याची सभागृहाने नोंद घ्यावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब.

**श्री.नितीन लढढा**:- महापौर महोदया.

**मा.महापौर :-** बोला आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब आपली या विषयावर चर्चा झालेली आहे. कमीत कमी वेळेमध्ये आपल्याला सभा संपावावी लागेल. आता २ वाजलेले आहेत. आणि आता अजुन महासभेच्या विषयपत्रिकेवर ३१ प्रस्ताव आहेत.तर या विषयामध्ये शुचिता ताईंना काही अडचणी असतील तर त्यांनी जरूर येथे चर्चा करावी . परंतू त्यांनी आता वेळ न घालवता आपण आपली पार्टी मिटींग घेवुन या बाबत चर्चा करू. परंतू आता या कोरोनाच्या पार्श्वभमिवर आयुक्तांना येथे ३ / ४ महिने झाले असतील आणि त्यामध्ये आता असे व्यक्त करणे काही योग्य वाटत नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आप्पासाहेब आता आपण सांगीतल्याप्रमाणे तसेच या संबंधी सन्मा.सभापतींनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. ते विषयांतर होत आहे का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** विषयांतर नाही होत आहे. वस्तुस्थिती आपल्या समोर मांडलेली आहे . याच्यासंदर्भातील काही काम असतील तर ते काम ते काम त्यांनी केलेले आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आप्पासाहेब तो विषय नाहीये तरी आपण विषयांतर करू नका.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी विषयांतर करत नाहीये जसे शुचिता ताईंनी सांगीतले तर मग ते काम पुर्ण केलेले आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आप्पासाहेब आपल म्हणण योग्य आहे. पण आमचं म्हणण तुम्ही समजून घ्या. हा जो ठेका देण्यात आलेला आहे .याच्याबाबतीत आम्ही विचारले आहे त्याचे उत्तर अजून बाकी आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** पार्टी मिटींग मध्ये घेवुन चर्चा करू.पुढचा विषय घ्या.

**मा.महापौर :-** पुढचा प्रश्न घेण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** पुढचा प्रश्न घेण्यात यावा.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** मला बोलण्याची संधी देण्यात यावी.

**मा.उपमहापौर :-** ईबाभाऊ आम्ही व महापौरांनी तुम्हाला ३/३ वेळा बोललो की बोला.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई आपण जी संधी त्यांना दिलेली होती व आताही दिलेली आहे. परंतू एस.के. कॉन्ट्रक्टरला जे काम दिल, त्यांना बिल ही देण्यात आलेले आहे.

**मा.उपमहापौर :-** सदस्यांना विनंती आहे की त्यांनी आपले माईक बंद करायचे आहेत.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** याच्यामध्ये आपण...

**मा.उपमहापौर :-** ईबाभाऊ आता वेळ झालेला आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** याच्यामध्ये मी आयुक्त साहेबांशी बोललो आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौर ताई माझी विनंती आहे आपल्याला हा विषय जो आहे त्याच्यामुळे उशिर होवुन दुसरे विषय राहून जात आहेत.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई मला चर्चा करू द्या मग पुढचा विषय घ्या. हमारेको बोलणेही नही दे रहे है. आप बोलो भगतभाई आप बोलो.

**श्री.भगतराम बालाणी :-** महापौर ताई , आयुक्त साहेब , मा.सभापती, स्थायी समिती यांनी जी चर्चा केलेली आहे . याच्यामध्ये एस .के. कॉन्ट्रक्टरला काम देण्याविषयी हे नक्की शंका निर्माण होते. परंतू कोरोना च्या पार्श्वभुमिवर हे काम देण्यात आले आहे व प्रशासनावर आमचा पुर्ण विश्वास आहे आणि हा अविश्वासाचा विषय आणायचाच नाही. आम्हाला यामध्ये प्रशासन आणि आपण असे दोन्ही मिळुन जळगांव शहरामध्ये काम करायचे आहे. दुसरे म्हणजे तांत्रिक बाबी असतील तर तुम्ही प्रशासनाला विचारू शकता . परंतू आपल्या पक्षाकडून हा अविश्वासाचा विषय झालेला नाही.त्यामुळे हा त्यांचा वैयक्तीक मत असू शकतो. परंतू आम्ही प्रशासनाशी सहमत नाही असा विषय नाही.

**मा.महापौर :-** प्रशासनाने याचे उत्तर दिलेले आहे, शुचिता ताई .

**नगरसचिव :**- प्रश्न क्रं. ३

**म.उपमहापौर :-** सदस्यांना विनंती आहे की त्यांनी आपले माईक बंद करायचे आहेत.

**नगरसचिव :**- प्रश्न क्रं. ३

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** म.महापौर साहेब

**म.उपमहापौर :-** नवनाथ भाऊ बोला .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** म.महापौर साहेब .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई आता जे एस.के. कॉन्ट्रक्टर ला काम दिलेले आहे ते तात्पुरत्या मंजुर केलेल्या विषयानुसार तर आतापर्यंत आपण महासभेची किंवा कोणत्याही स्थायी समितीची मंजुरी घेतलेली नाही.आता आपण जर त्यांना हे काम नियमानुसार निश्चित करून दिलेले असतील.तर हे योग्य आहे. तर हे आपण समजु शकतो आपण जर हे वॉटरग्रेसला .

**मा.उपमहापौर :-** गोराणे साहेब पुढचा प्रश्न घेण्यात यावा.

**नगरसचिव :-** प्रश्न क्रं.३) श्री.दारकुंडे नवनाथ विश्वनाथ

| | |
|---|---|
| १. अमृत योजना संदर्भात कार्यादेश दिल्याची तारीख | १. दिनांक १७/११/२०१७ |
| २. काम पुर्ण करण्याचा कालावधी | २. २४ महीने |
| ३. आजपावेतो झालेले काम | ३. ४४ टक्के |
| ४. उर्वरीत कामाची तपशिलवार माहिती (सुरु असलेल्या कामांव्यतिरीक्त अपुर्ण कामांची माहिती) | ४. **अ)** वितरण वाहीन्या - २४३.३६ कि.मी. **(ब)** पाण्याच्या टाकीस जोडावयाच्या उर्ध्ववाहीन्या - १३.८४ कि.मी. **(क)** पाण्याच्या उंच टाक्या - ०३ **(ड)** सुधारणा कामे. |
| ५. योजनेचा खर्च | ५. रु.१८३ कोटी (निविदा स्विकृत किमतीनुसार) |
| ६. काम कालावधीत पुर्ण न झाल्यास दंडाची माहिती | ६. निविदा अट क्रं.०२ नुसार विलंबासाठी महानगरपालिका १ ते १० टक्के नुकसान भरपाई आकारु शकते. |
| ७. आजपावेतो झालेल्या तक्रारी व संबंधित मक्तेदाराशी केलेला पत्र व्यवहार | ७. पत्रव्यवहाराची व्याप्ती पाहता संचिका अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात येत आहे. कृपया अवलोकन करावे ही विनंती. |
| ८. केलेली कार्यवाही व दंड | ८. निविदा शर्तीनुसार नुकसान भरपाई आकारणी करण्याचा प्रस्ताव तयार असुन याबाबत घेतलेल्या सुनावणीनुसार मक्तेदारास म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आलेली होती. मक्तेदाराने म्हणणे सादर केले असुन त्यावर मजीप्राचे अभिप्राय इकडेस प्राप्त झाले असून अंतिमत: रु.६.९९ कोटी विलंब नुकसान भरपाई वसुल करणेची शिफारस केली असुन त्यानुसार कारवाई सुरु आहे. |
| ९. आजपावेतो मक्तेदारास देण्यात आलेली रक्कम | ९. सोबत तक्ता जोडलेला आहे. |
| १०. गेल्या ७-८ महीन्यापासून काम बंद असल्याची कारणे व तपशिलवार माहिती | १०. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून पुरवठा करावयाचे डी आय प्रकाराचे पाईप कार्यादेशानंतर ६ महीने उशिराने पुरवठा केले आहे. (२)खोदकाम केलेले रस्ते पुर्ववत करणेच्या कामाचे बाबीत बदल करुन मे-२०१९ मध्ये सुधारीत बाब महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून मंजूर करुन काम करण्यास मान्यता देण्यात आली. (३) पाण्याच्या उंच टाक्यांच्या बांधकामास मक्तेदाराकडून विलंब झाला आहे. (४) जलवाहीनी टाकणेची कामे, तांत्रिक चाचणी, नवीन नळ संयोजने देण्याची कामे मक्तेदाराच्या वतीने विनाकारण देता बंद होती. उपरोक्त प्रमुख बाबींमुळे विलंब झाला आहे. |

**मा.महापौर :-** नवनाथ भाऊ तुम्ही बोला.

**नगरसचिव :-** प्रश्न क्रं.३) श्री.दारकुंडे नवनाथ विश्वनाथ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** म.महापौर साहेब माझा प्रश्न असा आहे अमृत योजनेच्या संदर्भात कि जे कार्यादेश दिलेले आहेत त्यांना कार्यादेश मिळुन त्यांची मुदत संपली होती. नंतर मुदत संपल्यानंतर त्यांना दंड आकारण्यात आला होता ७ कोटी रूपये त्याच्यानंतर त्यांनी पैसे भरले का ? मग त्याच्यानंतर त्यांना मुदतवाढ भेटली होती. त्याचे काय झाले ? त्यांना जी मुदतवाढ जी प्रशासनाने दिली. ज्या ठिकाणी प्रभागांमध्ये खड्डे झालेले होते ज्या ठिकाणी चिखल होत, त्याठिकाणी त्यांनी मुरूम टाकला नाही. प्रत्येक वॉर्डामध्ये प्रत्येक प्रभागात अशीच परिस्थिती आहे. मुरुम टाकेलेला आहे.

**मा.महापौर :-** नवनाथ भाऊ तुमचा आवाज बरोबर येत नाहीये.

**श्री.सुनिल महाजन:-** महापौर ताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** नवनाथ भाऊंचे बोलणे झाल्यानंतर तुम्ही बोला

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** म.महापौर साहेब

**म.उपमहापौर :-** बोला नवनाथ भाऊ .

**श्री.सुनिल महाजन :-** नवनाथ भाऊ बोला

**श्री.नवनाथ दारकुंडे :- हॅलो**

**मा.महापौर :-** नवनाथ भाऊ बोला

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मागच्या टाईमाला अमृत च्या ठेकेदाराला जी वर्कऑर्डर तुम्ही दिलेली होती व त्याचा दंड हा वसुल झ ाला का ? मग काम झालेले नव्हत मग त्याला मुदतवाढ का दिली , आता आमच एकच म्हणण पडत कि जळगांव शहरामध्ये काही जे अमृतचे काम चालू असतील ते तात्काळ बंद करावे. नंतर त्याची भरपाई बाबत चिखल होत आहे व लोकांची ओरड होते याला जबाबदार कोण आहे.

**मा.महापौर :-** खडके साहेब बोला.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** याचे उत्तर द्या.

**मा.महापौर :-** खडके साहेब बोला.

**श्री.डि . एस . खडके , शहर अभियंता :-** मा.महापौरताई व सन्मा.सभागृह अमृत योजनेचे मक्तेदार जैन ईरिगेशन सिस्टिम यांना या मुदतवाढ देण्याच्या संदर्भात जो पत्रव्यवहार झालेला आहे. हे तांत्रिक सल्लागार हे त्याच्या अनुषंगाने त्याला जे काही पत्र दिलेले आहे दंडात्मक कारवाई संदर्भात परंतू याच्या संदर्भात त्यांना विचारणा केली असता . हा जो मुद्दया बाबत महाराष्ट्र जिवन प्रधिकरण विभाग यांचा अभिप्राय मागविलेला होता. ते तांत्रिक सल्लागार असल्याने त्याच्या पदाच्या अनुषंगाने त्यांनी जे काही पत्र दिले आहे. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यासंदर्भात व आपण सदर पत्राच्या अनुषंगाने आपण त्याला विचाराणा केली असता . त्यांचे मुद्दे उपस्थित करून पुन्हा अभिप्राय मागविण्यात आलेला होता. तरी त्यांनी त्यांचा अभिप्राय दिलेला आहे आणि आपण त्यांच्या अभिप्रायानुसार आपण त्यांना ३१/०३/२०२१ पर्यंत आपण त्यांना मुदतवाढ दिलेली आहे. तसेच शासनाचे ११/०७/२०२० च्या शासन निर्णयानुसारही आपण हि मुदतवाढ ३१/०३/२०२१ पर्यंतच राहील आणि शासनाने तसे निर्देशामुळे त्यांना ३१/३/२०२१ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे आणि रस्त्यांच्या कामासंदर्भात आपण त्यांना सुचना दिलेल्या आहेत .पुढच्या आठवड्यामध्ये त्यांच्या कामासंदर्भात व अडचणींसंदर्भात आपल्या जैन ईरिगेशनच्या अधिकाऱ्यांसोबत आपल्या मनपा कार्यालयामध्ये बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापौर महोदया मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला भाऊ बोला.

**श्री.ललीत कोल्हे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला ललीतभाऊ बोला.

**श्री.ललीत कोल्हे :-** महापौरताई आपण जे अमृत चे काम दिलेले आहे याच्यामध्ये जे आहे ते ९० % झालेले आहेत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापौर महोदया मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** नवनाथ भाऊ ललीत भाऊंना बोलू द्या मग नंतर तुम्ही बोला.

**श्री.ललीत कोल्हे :-** अमृत वाल्यांनी विद्युत कॉलनीच काम घेतल आणि त्याठिकाणी खड्डे बुजविले गेले नाही. मुरुम टाकल गेल नाही प्रशासनाने याच उत्तर द्या.

**श्री.डि.एस. खडके, शहर अभियंता :-** त्याच्या कामाची प्रगती लॉकडाऊन मध्ये संथ गतीने सुरू होते आणि याच्या संदर्भात अंतिम निर्णय देण्यात आलेला होती की सर्व पत्रव्यवहार सुरू असल्यामुळे व लॉकडाऊनच्या अनुषंगाने आणि जे काम त्यांचे संथगतीने सुरू होते.

**श्री.ललीत कोल्हे :-** ते मान्य आहे पण काम पुर्ण होत नाहीये त्याचे काय ?

**श्री.डि . एस . खडके , शहर अभियंता :-** त्यांनी काम सुरू केलेले आहे व त्या संदर्भात आपण कालच पत्र दिलेले आहे कि हे काम कश्या पध्दतीने पुर्ण करणार आहेत .

**श्री.ललीत कोल्हे :-** ते ठिक आहे पण हे काम पुर्ण केव्हा होईल हे सांगा.

**श्री.डि . एस . खडके , शहर अभियंता :-** त्यांनी काम सुरू केलेले आहे व आपण पत्र पण दिले आहे.

**श्री.ललीत कोल्हे :-** महापौर साहेब आवाज येतोय का ?

**मा.महापौर :-** हो येतोय बोला.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापौर ताई .

**मा.महापौर :-** बोला नवनाथ भाऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापौर ताई या संदर्भात लवकरात लवकर हॅलो .

**मा.महापौर :-** बोला नवनाथ भाऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापौर ताई या संदर्भात खडके साहेबांनी जे लवकरात लवकर हॅलो .

**मा.महापौर :-** बोला नवनाथ भाऊ ऐकायला येतेय .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापौर ताई या संदर्भात खडके साहेबांना सांगा की जी वर्कऑर्डर दिलेली आहे मुदतवाढ देण्या संदर्भाची आता ठरावीक प्रभागांमध्ये काम चालु आहे. आता ललीत भाऊंनी सांगीतले की चिखल जो होत आहे तर खड्डयांमुळे तर त्या ठिकाणी लवकरात लवकर दुरूस्तीची व्यवस्था करण्यात यावी. पावसाळा सुरू आहे . आमच हेच म्हणण आहे अमृत वाल्यांना आणि ते मुरूम टाकत असतील तर तो मुरूम टाकु नये त्या प्रभागामध्ये .

**मा.महापौर :-** नवनाथ भाऊ त्यांना अमृत वाल्यांना तश्या सुचना देण्यात येतील.

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदया जळगांव शहरात खड्डयांमुळे जे पाणी मुरत आहे त्याच्याबाबती मध्ये लक्ष दिले गेले पाहीजे.तरी त्याबाबतीमध्ये आपण लक्ष द्याव.

**नगरसचिव :-** प्रश्न क्रं.४) श्री.नाईक प्रशांत सुरेश

| | |
|---|---|
| १. महानगरपालिकेच्या एखादया विभागाची, प्रकरणाची माहिती त्याच महानगरपालिकेच्या नगरसेवक यांनी लिखीत स्वरुपात अर्जाव्दारे मागणी केलेली असल्यास अपेक्षित माहिती संबंधीत नगरसेवक यांना उपलब्ध करुन देणेबाबत काही शुल्क आकारण्यात येते कां ? असल्यास महाराष्ट्र महानगरपालिकेच्या कोणत्या प्रकरण, कलमा न्वये सदर शुल्क कुठल्या दर, निकषाने आकारण्यात येते ? | १. महानगरपालिकेच्या एखादया विभागाची माहिती सन्मा.नगरसेवक यांनी लिखीत स्वरुपात अर्जाव्दारे मागणी केली असल्यास तशी माहिती विनामुल्य देणे बाबत महाराष्ट्र महानगरपालिकेच्या अधिनियमात कोणतीही तरतूद नाही. मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण -२ मधील (महापालिकेचे कामकाज) कलम - ५ मधील तरतूदी नुसार सन्मा.सदस्यांनी प्रश्नाव्दारे लेखी नोटिस देऊन मागणी केल्यास त्यांना माहिती देणेबाबत तरतूद आहे.<br>केंद्रीय माहिती अधिकार २००५ अंतर्गत अर्जदार यांनी माहिती अधिकारांचा अर्ज दिल्यास त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदी नुसार छायांकीत प्रतीचे नियमानुसार शुल्क घेऊन माहिती दिली जाते. |
| २. तसेच अपेक्षित माहिती किती दिवसात देणे बंधनकारक आहे ? या प्रकरणी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दयावी. | २. अपेक्षित माहिती लवकरात लवकर उपलब्ध करुन दिली जाते. |

**श्री. प्रशांत नाईक :-** मला जे उत्तर मिळालेले आहे त्याबद्दल मी समाधानी आहे.

**नगरसचिव :-** प्रश्न क्रं.५) श्री.सनकत चेतन गणेश

| | |
|---|---|
| १. शासन निर्णयान्वये नुकताच कार्यालयीन कामकाजाचा पाच दिवसाचा आठवडा केल्याचे समजते, तरी सदर शासन निर्णय कोणत्या दिवशी प्रसिध्द झाला तसेच जळगांव शहर महानगरपालिकेत कोणत्या दिवसापासून सदर शासन निर्णयानुसार अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे. याबाबत सविस्तर माहिती मिळावी. | १. राज्य शासकीय कार्यालयासाठी पाच दिवसांचा आठवडा लागु करण्याबाबतचा शासन निर्णय क्रमांक :समय-२०१६/प्र.क्र.६२/१८ (र.व.का.) दि.२४ फेब्रुवारी,२०२० रोजी प्रसिध्द झाला. जळगांव शहर महानगरपालिकेत मा.आयुक्त सो. यांचे दि.२७/०२/२०२० रोजीच्या मान्यतेने परिपत्रक क्र./जमपा/आस्था/२२१८/२०२० दि.२७/०२/२०२० अन्वये दि.२९ फेब्रुवारी २०२० पासुन सदर शासन निर्णयानुसार अंमलबजावणी सुरु करण्यात आली. |

**श्री.चेतन सनकत :-** जे मे महिन्यामध्ये अगोदर शासन निर्णयान्वये कार्यालयीन कामकाज हे ५ दिवसांचे केलेले होते . त्याच्या संदर्भामध्ये माझा प्रश्न होता आणि तर ते शासकीय कार्यालयाकरीता होते का असा माझा प्रश्न होता आणि आपण मागे ते केले

होते तर माझ्या माहितीनुसार २४ फेब्रुवारीला मला माझे उत्तर मिळालेले आहे . जि. आर प्रसिध्द झालेला आहे. आणि त्याच्या नुसार मध्ये आपण हे केलेले आहे आणि शासन निर्णयानुसार आपण २९ फेब्रुवारी पासुन हा शासन निघालेला आहे अशी माहिती मला देण्यात आलेली असुन मी मला देण्यात आलेल्या माहितीनुसार समाधानी आहे.

**मा.महापौर :-** साहेब ६ वा प्रश्न घ्या.

**श्री.चेतन सनकत :-** याच्यामध्ये मला एक माहिती पाहीजे . याच्यामध्ये मला एक सांगा की ह्या जी. आर नुसार आयुक्त साहेबांनी याबाबत किती दिवसांत अंमलबजावणी केलेली आहे ते मला सांगा. मला देण्यात आलेल्या माहितीच्या आधारे मी बोलतोय. हा जो जी.आर आहे हा २४ फेब्रुवारी २०२० चा आहे आणि २९ फेब्रुवारी २०२० पासुन शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली, किती दिवसांत केली फक्त बोटावर मोजुन दाखवाव मला मग या प्रश्नाचं उत्तर मिळाले की मग काही प्रश्न नाही. हॅलो , हॅलो.

**श्री.भगतराम बालाणी :-** हॅलो.

**मा.उपमहापौर :-** भगतभाई बोला.

**श्री.उदय पाटील , आरोग्याधिकारी :-** आदरणीय सभागृह या ठिकाणी सन्मा.सदस्य. चेतनभाऊ सनकत यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या संदर्भामध्ये खुलासा करू ईच्छितो कि शासन परिपत्रकाबद्दल २७ सप्टेंबर २०१६ ला या संदर्भात .

**श्री.चेतन सनकत :-** बापुसाहेब ते नाहीये माझा प्रश्न ५ दिवसांचा जो आठवडा आहे तो हा नाही तुम्ही हे समजुन घ्या अगोदर तुम्ही पुढच्या प्रश्नावर चालले गेलेले आहे . तुम्ही ६व्या प्रश्नावर गेलेले आहे बापुसाहेब .

**मा.महापौर :-** चेतनभाऊ थांबा.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर मा.सनकत साहेबांनी विचारलेला प्रश्न याच्यात नाही आलेला आहे . परंतू शासनाच्या जी.आर. प्रमाणे अशासकीय , प्रशासकीय कार्यालयांमध्ये २४ फेब्रुवारी रोजी २९ फेब्रुवारीच्या शनिवार पासुन ५ दिवसांचा आठवडा करणेबाबत सुचना होत्या.

**श्री.चेतन सनकत :-** आयुक्त साहेब विषय हा आहे की जेवढे आपले सफाई कामगार आहे तो निर्णय यांच्याबाबतीत नाहीये का ?

**मा.उपमहापौर :-** चेनतभाऊ.

**मा.आयुक्त :-**सनकत साहेब त्याच्यामध्ये शासनाने प्रशासकीय कार्यालयामध्ये कामाचे दिवस कमी करण्याचे व तात्काळ अंमलबजावणी करणे अशी सुचना आहे . महानगरपालिकेसाठी वेगळा जी.आर. नाहीये आणि शासनाने २९ फेब्रुवारी पासुन राज्यातील सर्व कार्यालयांसाठी ५ दिवसांचा आठवडा लागू केलेला आहे.

**श्री.चेतन सनकत :-** सुटीच्या दिवसाला ओ.टी. आयुक्त साहेब याच्यामध्ये जी पध्दत होती. मला फक्त इतिवृत्तामध्ये साहेब काय बोलले त्याची नोंद पाहिजे. मला एक माहिती पाहीजे होती हा जो जी.आर आहे तो फक्त अधिकाऱ्यांसाठीच आहे का?

**नगरसचिव :-** प्रश्न क्रं.६) श्री.दारकुंडे नवनाथ विश्वनाथ

| | |
|---|---|
| १) (अ) प्रभाग क्रं.०१ व ०२ मधील अमृत योजने अंतर्गत व भुयारी गटार योजने अंतर्गत करण्यात आलेल्या कामाबाबत माहीती. (ब) वरील दोन्ही प्रभागात अपुर्ण अवस्थेत कामे करण्यात आली असून नळ संयोजन किती रहीवाश्यांना देण्यात आली त्याची संख्या ? उर्वरीत रहीवाश्यांना किती कालावधीत नळ संयोजन देण्यात येणार ? विलंब का झाला त्याची माहीती. | १) (अ) प्रभाग क्रं.०१ व ०२ मध्ये अमृत पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलकुंभ-२०.०० लक्ष लिटर्स क्षमतेच्या पाण्याच्या टाकीचे ७० टक्के काम पूर्ण झालेले आहे. मलनि:स्सारण योजनेचा झोन क्रं.०१ व झोन क्रं.०४ चा काही भाग समाविष्ट आहे. झोन क्रं.०१ मध्ये मलनि:स्सारण वाहीन्या DWC Pipe LINE - २०.०७ कि.मी., MAIN CHAMBER- ७७१ Nos, RCC PIPE LINE -०.१०५ कि.मी., UPVC PIPE LINE - ४०.०० कि.मी., HOUSE SERVICE CHAMBERS - ५८५१ Nos,व झोन क्रं.०४ मध्ये DWC PIPE LINE - १९.३८ कि.मी., MAIN CHAMBER - ७८० Nos, RCC PIPE LINE -०.०० कि.मी. |
| २) अ) पंत प्रधान घरकुल योजना अंतर्गत कीती जणांना घरकुल मंजूर झाले ?<br>ब) ज्या रहिवाश्यांना घरकुल मंजूर झाले त्या रहिवाश्यांना मनपा तर्फे संपर्क साधण्यात आला कां ? | २) अ) १२५० लाभार्थ्यांचे घरकूल मंजूर झाले आहे. |

| | |
|---|---|
| क) त्यांच्याशी कोणत्या माध्यमातून संपर्क साधला ?<br><br>ड) त्यांना कोणकोणती माहीती आपणाकडून देण्यात आली ? | ब) होय<br><br>क) लाभार्थ्यांशी भ्रमणध्वनीव्दारे संपर्क साधण्यात येतो किंवा प्रत्यक्ष भेटून संपर्क साधण्यात येतो.<br><br>ड) त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेची संपुर्ण माहिती देण्यात आली. |

**मा.महापौर :-** साहेब ६ वा प्रश्न घ्या.
**नगरसचिव :-** अमृत योजने संदर्भात
**मा.उपमहापौर :-** बोला नवनाथ भाऊ.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब माझा एक प्रश्न आहे.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापौर साहेब माझ्या प्रश्नाच्या उत्तराने माझे समाधान झालेले आहे.
**मा.उपमहापौर :-** ७ वा प्रश्न घेण्यात यावा.
**नगरसचिव :-** प्रश्न क्रं.७) श्री.लढ्ढा नितीन बालमुकूंद

| | |
|---|---|
| १) माजी मंत्री श्री.सुरेशदादा जैन यांचे तैलचित्र जळगांव शहर मनपा सभागृहात लावण्यात आले होते कां ?<br>२) सदरहू तैलचित्र सभागृहातुन काढून टाकण्यात आले कां ?<br>३) काढले असल्यास कोणाच्या तक्रारीवरुन व अधिनियमातील कोणत्या कलमान्वये व कोणाच्या आदेशाने काढण्यात आले ? | १) होय.<br>२) होय.<br>३) तक्रारदार श्री.दिपककुमार पी.गुप्ता, आर.टि.आय व सोशल एक्टिविस्ट जळगांव व श्री.अनिल प्रभाकर नाटेकर, अध्यक्ष शहिद भगतसिंग मनपा कर्मचारी संघटना,जळगांव यांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने म.आयुक्त सो यांच्या मान्यतेने संदर्भिय तैलचित्र काढण्यात आले. |

**नगरसचिव :-** आदरणीय नितीनभाऊ लढ्ढा
**श्री.नितीन लढ्ढा :-** सन्मा.महापौरताई हॅलो
**मा.उपमहापौर :-** हो बोला नितीनभाऊ
**मा.महापौर :-** हो बोला नितीनभाऊ
**श्री.नितीन लढ्ढा :-** सन्मा.महापौरताई मी आपल्या वतीने आयुक्त साहेबांना विचारू ईच्छितो की माजी मंत्री मा.सुरेशदादा जैन यांचे तैलचित्र जळगांव शहर मनपाच्या २ ऱ्या मजल्यावरील सभागृहामध्ये लावण्यात आलेले होते.सदर तैलचित्र सभागृहातुन काढून टाकण्यात आले आहे. कोणाच्या पत्रावरून व कोणाच्या दबावामुळे किंवा कोणाच्या आदेशामुळे काढून टाकण्यात आलेले आहे.मा.आयुक्त साहेब यांच्या आदेशान्वये सदर तैलचित्र काढण्यात आलेले आहे असे मला दिलेल्या पत्रावरून कळते. तर प्रशासनाकडून यासंदर्भामध्ये खुलासा पाहीजे आहे कि ते कोणत्या कलमाच्या अधिनियमान्वये काढण्यात आलेले आहे? याचा खुलासा प्रशासनाने करावा.
**श्री.डि . एस. खडके, शहर अभियंता** :- सन्मा.नितीन भाऊ सदरच्या विषयान्वये मा.आयुक्त साहेब यांच्या १३/०९/२०१९ च्या आदेशान्वये तैलचित्र काढण्यात आलेले आहे. तसेच यामध्ये कोणत्या कलमान्वये काढण्यात आलेले आहे तर ते याच्याबद्दल सांगु शकत नाही ते सांगता येत नाही.
**श्री.नितीन लढ्ढा :-** सन्मा.महापौरताई मग हा निर्णय आयुक्त साहेबांनी कोणाच्या दबावाखाली घेतला.
**मा.महापौर :-** एकावेळी एकानेच बालायचे आहे.
**श्री.डि . एस. खडके, शहर अभियंता** :- सन्मा.नितीन भाऊ दिपकककुमार गुप्ता यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने व अध्यक्ष , शहिद भगतसिंग कर्मचारी संघटना यांच्या तक्रार अर्जानुसार आयुक्त साहेबांनी सदरचे तैलचित्र काढलेले आहे.
**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदया नितीन भाऊंनी जो मुद्दा मांडलेला आहे हे काम कायदयातील कोणत्या कलमान्वये करण्यात आलेले आहे. याचे प्रशासनाने उत्तर द्यावे.
**श्री.ईब्राहिम पटेल :-** खडके साहेब बोला खडके साहेब.
**मा.महापौर :-** नितीन भाऊ थांबा.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर महोदया, मा.नितीनभाऊंनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे याच्यामध्ये ३ सप्टेंबर २०१९ मध्ये काही स्थानिक नागरीकांकडून महानगरपालिकेकडे तक्रार प्राप्त झालेली होती आणि त्या अनुषंगाने नगरसचिव कार्यालयाकडून अश्या प्रकारचा रिपोर्ट त्याच्यामध्ये सादर झालेले आहे की, अश्या प्रकारचे तैलचित्र हे महानगरपालिकेच्या सभागृहात लावण्याबाबतचा ठराव पारीत झालेला आढळुन येत नाही . त्याच्यानंतर शहर अभियंता यांनी आयुक्तांकडे हा प्रस्ताव सादर केला तर तत्कालीन आयुक्तांच्या मान्यतेने आयुक्तांनी त्यांच्या मान्यतेने आयुक्तांनी त्याच्यावर कार्यवाही करावी अश्या प्रकारचे आदेश देण्यात आले आणि त्या अनुषंगाने याच्यावर हि कार्यवाही करण्यात आलेली होती.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मा.महापौर साहेब

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदय माझा प्रश्न असा अत्यंत स्पष्ट आहे कि ते जे तैलचित्र काढण्यात आलेल आहे.तरी मला अधिनियमाच्या संदर्भामध्ये त्याची माहिती स्पष्ट करावी.

**मा.आयुक्त :-** जी काही कागदपत्रे आहेत .

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदय या जळगांव शहर महानगरपालिकेमध्ये ईतकी तत्परता नसते परंतू या विषयामध्ये जी तत्परता दाखविली गेली व महानगरपालिकेच्या अनुषंगाने परंतू माझ्याशी बोलतांना कोणत्या अधिनियमाच्या अनुषंगाने करण्यात आले या बाबतीत संवाद करायचा . माझा प्रश्न अत्यंत स्पष्ट आहे.

**मा.आयुक्त :-** जी त्यावेळेची जी कार्यवाही आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पण मा.आयुक्त महोदय कोणत्या अधिनियमातील तरतूदी नुसार करण्यात आली.

**मा.आयुक्त :-** जी त्यावेळेची जी कार्यवाही आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदय माझा प्रश्न अत्यंत स्पष्ट आहे. कि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कोणत्या कलमान्वये हे तैलचित्र काढण्यात आलेले आहे.

**मा.आयुक्त :-** मा.नितीन भाऊ याच्यामध्ये सप्टेंबर २०१९ मध्ये जो काही निर्णय झाला त्याच्यामध्ये जे काही कागदपत्रे होती त्याच्या आधारे हि कार्यवाही प्रशासनाकडून करण्यात आलेली आहे. तरी आम्ही जी काही कागदपत्रे होती त्याच्याबाबतीत वस्तुस्थिती आपल्या निदर्शनास आणुन दिलेली आहे. आता हा निर्णय जो काही घेतला कोणत्या वस्तुस्थितीने घेतला किंवा का घेतला तर आपल्याला याच्यामध्ये कागदपत्रांची पाहाणी करावी लागेल. तर जी वस्तुस्थिती आहे ती मी आपल्यासमोर आणलेली आहे.

**श्री. भगतराम बालाणी:-** मा.आयुक्त साहेब याच्यामध्ये आता तुम्ही सांगीतले की कागदपत्रांच्या याच्यावरून तुम्ही काढले पण नितीन भाऊंना अधिनियमामध्ये काही तरतूदी आहेत का ते तुम्ही सांगा म्हणजे हा प्रश्न मिटेल. सभागृहाला ही कळेल का काढलेल आहे तैलचित्र...

**श्री.कैलास सोनवणे :-** मा.महापौर साहेब मला बोलायचे आहे.

**म.उपमहापौर :-** बोला आप्पा.

**मा.महापौर :-** बोला आप्पासाहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** मा.महापौर साहेब नितीनभाऊंनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे कि जळगांव महानगरपालिकेच्या सभगृहामधील तैलचित्र काढलं तर ते तैलचित्र कोणत्या अधिनियमान्वये काढण्यात आलेले आहे असा त्याच्यामध्ये एकदम याच्यामध्ये जे आहे कि प्रशासनाने जे तैलचित्र काढलेले आहे आणि

**मा.महापौर :-** बोला आप्पासाहेब आवाज येत नाहीये तुमचा

**श्री.कैलास सोनवणे :-** मा.महापौर साहेब तर आता नितीनभाऊंनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याच्यामध्ये एकच आहे कि ते तैलचित्र काढण्याचे काम चुकीचे केले हे त्याचा मी पण निषेध करतो जे काम चुकीचे झालेले आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मा.महापौर साहेब कोणत्या नियमानुसार काढण्यात आले आहे याचा आयुक्तांनी खुलासा करावा.

**म.उपमहापौर :-** पुढचा विषय घ्यायचा का ?

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मा.महापौर साहेब

**मा.महापौर :-** बोला

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हा जो प्रश्न विचारला आहे त्याचं उत्तर मिळाले पाहीजे.

**मा.महापौर :-** आयुक्त साहेबांनी सांगतीले आत्ता.

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदया आज संध्याकाळ पर्यंत महापौर महोदया आज संध्याकाळ पर्यंत ते तैलचित्र सभागृहात लावण्यात यावे.

**श्री.सुनिल महाजन :-** आज संध्याकाळ पर्यंत ते तैलचित्र परत लावल गेल पाहिजे.

**मा.महापौर :-** आयुक्त साहेबांनी उत्तर दिलेले आहे. नितीनभाऊ

**श्री. भगतराम बालाणी:-** महापौर ताई सुरेशदादांचे जे तैलचित्र होते...

**मा.महापौर :-** आयुक्त साहेबांनी खुलासा दिला आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौरताई

**मा.महापौर :-** नगरसचिव साहेब विषय क्रं. ८ घ्या.चेतनभाऊ

**म.उपमहापौर :-** चेतनभाऊ बोला

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई

**मा.महापौर :-** नितीनभाऊ या विषयावर नितीनभाऊ बोला .

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई जोपर्यंत प्रशासन खुलासा करत नाही तोपर्यंत आमची आपल्याला हात जोडून विनंती आहे. कि पुढचा विषय घेण्यात येवू नये.

**मा.महापौर :-** नितीनभाऊ बोला ना नितीनभाऊ बोला मी काय म्हणतेय आपण आयुक्त साहेबांशी बसुन चर्चा करून घेवू . कारण भरपूर विषय बाकी आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई प्रशासनाने जर माझ्या प्रश्नाच उत्तर दिल असत तर माझही समाधान झाल असत , परंतू प्रशासनाने बेकायदेशीर रित्या व महापौरताई कोणाच्या तक्रारीवरून तसेच कुठल्याही सभेची मान्यता न घेता त्यावेळेस जो अश्या पध्दतीचा निर्णय घेतला तो तर हि प्रशासनाची चुक आहे. आम्ही आपणांस व प्रशासनास विनंती आहे की ते तैलचित्र पुर्वीप्रमाणे सन्मानपुर्वक सभागृहात आज संध्याकाळी लावण्यात यावे.

**मा.महापौर :-** ठिक आहे आपण यावर चर्चा करू नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई आपण आम्हाला शब्द देत आहात किंवा जे काही आश्वासन देत आहात त्यासंदर्भात आज संध्याकाळ पर्यंत त्या तैलचित्राबाबत काय तो योग्य निर्णय घेतला तर आम्ही तुमच्या शब्दावर विश्वास ठेवू शकतो.

**मा.महापौर :-** ठिक आहे आपण आयुक्त साहेबांशी यावर चर्चा करू आणि मार्ग काढू.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौरताई आता मला एक सांगा की याच्यावर चर्चा करण्यापेक्षा ते तैलचित्र लावण्यात यावे.

**मा.महापौर :-** ठिक आहे नितीन भाऊंनी जो प्रश्न केलेला आहे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई हे प्रशासनाने ते तैलचित्र चुकीच्या पध्दतीने त्यांनी काढलेले आहे. महापौरताई प्रशासनाने कोणाच्या पत्राने ते तैलचित्र काढल. माझी प्रशासनाला विनंती आहे की, त्यांनी ते तैलचित्र सन्मानपुर्वक त्यापध्दतीने लावणार आहेत कि नाही याबाबत कळवाव.

**मा.महापौर :-** प्रशासनाने या विषयावर सविस्तर खुलासा मांडलेला आहे. नितीन भाऊ आपण या विषयावर सविस्तर चर्चा करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई आयुक्त साहेबांचा खुलासा हा आम्हाला मान्य नाहीये. कारण प्रशासनाने हे चुकीचे पध्दतीने हे काम केलेले आहे. तरी आम्हाला हे कदापिही मान्य नाहीये. लक्षात घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब सभागृहातले दादांचे तैलचित्र काढणे हे कायदेशीर नाही व हे त्यांना मान्य नाही. आणि या सभागृहारमध्ये हा मुद्दा उपस्थित झाला परंतू आता आपण या ठिकाणी.

**श्री.प्रशांत नाईक :-** मा.महापौरताई , आप्पासाहेब तुम्ही महापौर आहात सदस्य आहेत हे मला माहिती आहे. आपण हे करून दाखवाव आमची एवढीच विनंती आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी निर्णय नाही घेवु शकत ना.

**श्री.प्रशांत नाईक :-** आप्पासाहेब तुम्ही घेवु शकता . आप्पासाहेब आम्हाला फक्त तो फोटो लावायचा आहे. महापौर ताई मी काय म्हणतोय ऐका.

**मा.महापौर :-** नितीनभाऊ आयुक्त साहेबांनी अगोदरच याचे उत्तर तुम्हाला दिलेले आहे. पण तुमचे जर समाधान झाले नसेल तर आपण यावर बसुन चर्चा करू.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** नाही महापौरताई

**मा.महापौर :-** विषय क्रं. ८

**श्री.ईब्राहिम पटेल :-** नाही महापौरताई याच आधी समाधानकारक उत्तर देण्यात याव.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदया हे जे उत्तर दिलेल आहे.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ , कृपया सर्व सदस्यांनी आपआपले माईक बंद करावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला महापौर ताई ते तैलचिल काढण्याचे जे काम आहे. आम्हाला आधी याचे उत्तर द्या मग पुढील प्रश्न घ्या.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ आयुक्त साहेबांकडे आपण जावू आणि याच्याबद्दल निर्णय घेवू.

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदया

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई

**मा.महापौर :-** बोला नितीन भाऊ आयुक्त साहेबांकडे आपण जावुन चर्चा करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई आपण स्वत: या जळगांव शहरामध्ये त्याचा विस्तार पाहीलेला असेल .ज्या आयुक्तांनी आपल्या अधिकाराचा दूरूपयोग केलेला असेल आणि ते तैलचित्र काढण्यात आलेले असेल . आमची एवढी आमची विनंती आहे कि ते तैलचित्र जसे काढण्यात आले असेल तेवढयाच तत्परतेने ते प्रशासनाकडून लावण्यात यावे एवढीच आमची विनंती आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर साहेब मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला सुनिल भाऊ बोला .

**श्री.सुनिल महाजन :-** एखादा राजकीय व्यक्ती ४०/४० वर्ष त्याच्या आयुष्याचे शहराच्या विकासासाठी आपले आयुष्य राजकारणात घालवतो . त्याच्यात

**मा.महापौर :-** सुनिल भाऊ आवाज येत नाहीये बोला . आवाज येत नाहीये सुनिल भाऊ बोला.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर ताई आता निर्णय द्या.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्यांनी कृपया एकावेळेस एकजणानेच बोलायचे आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर ताई एक असा आक्षेप आहे की ज्या विषयावर आता चर्चा चालू आहे . एक राजकीय व्यक्ती आपले ४० वर्ष या शहराच्या विकासासाठी घालवतो . त्याचा राजकीय जीवनामध्ये चांगल्या व वाईट गोष्टी घडतात व त्याचा राजकीय वर्चस्व असो किंवा परंतू तो गुन्हेगारी स्वरूपाचा नाही . मी हे आवर्जुन लक्षात आणून देतो आणि हे जर का असं आढळल तर जे ४० वर्ष त्यांनी जे आयुष्याचे घालवले . त्याच त्यावेळेला काय महत्व राहते. मी या गोष्टीचा निषेध करतो व या जर प्रशासनाला लाज वाटत असेल तर ते तैलचित्र पुन्हा सभागृहात उपलब्ध करून देण्यात यावे आणि ते तैलचित्र लावण्यासाठी शिवसेनेचे सर्व नगरसेवक मिळून सभागृहात आजच्या आज लावण्यासाठी आश्वस्त कराव.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब.

**मा.महापौर :-** बोला आप्पासाहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब मला असे बोलायचे आहे की, ह्या विषयात आपण .आयुक्त साहेबांशी चर्चा करून मार्ग काढु. तरी सर्व सदस्यांना विनंती आहे की पुढचा प्रश्न घेवु द्या.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ८

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई , आप्पासाहेब नाही, आम्ही बोलाताहेत ना मग

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई ते तैलचित्र सभागृहामध्ये आणुन द्याव त्याच्यानंतर ते तैलचित्र योग्य पध्दतीने ते आमच्या हस्ते लावण्यात येईल.

**मा.महापौर :-** बोला

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई प्रशासनाने ते तैलचित्र सभागृहामध्ये आणुन द्याव त्याच हे योग्य पध्दतीने आमच्या हस्ते करण्यात येईल.प्रशासनाला त्याला हात पण लावायची गरज पण नाहीये. अश्या भ्रष्ट प्रशासनाची लायकी सुध्दा नाहीये . आता आमची एकच विनंती आहे की ते तैलचित्र सभागृहामध्ये आणुन ठेवाव.

**श्री . विष्णू भंगाळे :-** महापौर महोदया , नितीनभाऊंनी सांगीतल्याप्रमाणे ते तैलचित्र सभागृहात आणुन द्याव आणि ते आणुन द्याव.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई प्रशासनाने अगोदर याचे उत्तर द्यायचे आहे. प्रशासनाने अगोदर ते तैलचित्र सभागृहात आणुन द्यायचे आहे. त्याला किती वेळ लागेल हेही सांगावे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई प्रशासनाने ते तैलचित्र सभागृहात आणुन ठेवाव

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब.

**मा.महापौर :-** बोला आप्पासाहेब.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई आपणांस विनंती आहे की

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब.

**मा.महापौर :-** बोला आप्पासाहेब.

**मा.उपमहापौर :-** बोला आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब माझी विनंती आहे.

**मा.महापौर :-** बोला आप्पासाहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब सदस्यांची विनंती आहे की निर्णय द्या आणि आपल्याला ह्या विषयावर पुन्हा चर्चा करायची असेल तर कृपया थोडा वेळाकरीता हि सभा तहकुब करण्यात यावी.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ८

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई कैलास आप्पांनी जी सुचना मांडलेली आहे.कि सभा तहकुब करण्यासंदर्भातली आणि आप्पांच अस मांडण ते योग्य नाहीये . महापौरताई आमचे एकुन तरी घ्या.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ८ चेतन सनकत यांनी बोलावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब हा विषय आपण आयुक्त साहेबांशी चर्चा करू मग निर्णय घेवु.

**मा.महापौर :-** ठिक आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई आमच्या सर्व नगरसेवकांची विनंती आहे कि तो फोटो परत लावा.

**म.उपमहापौर :-** नितीनभाऊ , नितीन भाऊ

**श्री.अनंत जोशी :-** महापौर साहेबा मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला बंटीभाऊ बोला.

**श्री.अनंत जोशी :-** महापौर साहेबा धन्यवाद तुम्ही मला संधी दिली तर महापौर साहेब एक विनंती अशी आहे कि मा.नितीनभाऊंची जी मागणी होती म्हणजे जो विषय आता सुरेशदादांच्या तैलचित्रावरून सूरू आहे तर त्यामध्ये सगळयांनी आपआपले मत मांडलेले आहेत आणि कैलास आप्पांनी देखील सुध्दा आपले मनोगत व्यक्त केलेले आहे आणि आता सगळेच एक वडीलधारी व ज्येष्ठ असे राजकारणी व्यक्ती जळगांव शहरात जवळपास ४० वर्षांपासुन हे राजकीय क्षेत्रामध्ये जे योगदान दिलेल आहे. अश्या व्यक्तीच तैलचित्र तुम्ही हे कुणीतरी दोन लोक ज्यांनी म्हणजे संघटना आणि एक तक्रार अर्ज याच्या अनुषंगाने आपल्या सभागृहात लागलेले ते तैलचित्र आपले अधिकार/ कर्मचारी ते एवढया तातडीने , तत्परतेने काढून टाकतात ते निदंनिय आहे आणि त्याचा निषेध आहे प्रशासनाचा . माझी एक विनंती अशी असेल. प्रशासनाकडे त्याचे उत्तर आजही नाहीये आणि कालही नव्हत की ते तैलचित्र अश्या प्रकारे प्रशासनाने जे केले हे योग्य नाही . तरी माझी महापौर महोदयांना विनंती आहे सगळया ज्येष्ठ सदस्यांना आणि जे राजकीय नेते असतील याबाबतीत की सभागृहात सुरेशदादांचे तैलचित्र असाव या बद्दल कुणाचेही दुमत नसेल भलेही आज मनपा मध्ये आमची सत्ता नसेल पण आज हे तितकेच सत्य आहे तुम्ही नितीन भाऊंना विचारा ते तेच म्हणतील कि प्रशासनाची जी भुमिका आहे व ते तैलचित्र आपण सन्मान पुर्वक लावण्यात याव आणि त्याची परवानगी आपण द्यावी . कारण ते तैलचित्र तुम्ही काढलेले होते. आणि सगळयात महत्वाचा मुद्दा आहे कि सगळे जे राजकीय नेते आहेत तर ते आपल्या सगळयात ज्येष्ठ नेता या शहराचा आपल्याला लाभलेला आहे.येणाऱ्या काळामध्ये काही होवू नये परंतू असा काही विषय झालेला नाहीये . जे तैलचित्र ज्या व्यक्तीने काढले त्याची जबाबदारी जर ते स्विकारायला तयार असतील त्या कर्मचाऱ्यांवर आपण कार्यवाही करायला पाहीजे आणि ते दादांचे तैलचित्र सन्मानपुर्वक लावण्यात याव अशी माझी सभागृहाला विनंती आहे. याच्याबद्दल काही वैचारीक मते असतील. काही राजकीय मते असतील तर ते आपल्या ठिकाणी पण सभागृहामध्ये दादांचे तैलचित्र सन्मानपुर्वक लावण्यात याव अशी विनंती आहे. हा वादाचा विषय असु शकत नाही आणि हा विषय करू नये. माझी नितीनभाऊंना अशीही विनंती आहे आपल्याला कि हा विषय पुढच्या सभेला घेवु नये. अशी माझी नितीनभाऊंना व विष्णू भाऊंना विनंती आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर ताई हा मुद्दा असा आहे की ,जळगांव शहरामध्ये जे निर्णय घेतले गेलेले आहे आपल्या महानगरपालिकेमध्ये आपण त्याविषयी बोलत आहोत आपण त्यांना सुचना द्याव्यात.

**मा.महापौर :-** विष्णू भाऊ तुमचा आवाज बरोबर येत नाहीये.

**श्री.अनंत जोशी :-** मा.महापौर साहेबा , विष्णू भाऊ दोन मिनिटे थांबा.

**मा.महापौर :-** १० मिनिटांकरीता सदर सभा तहकुब करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-** तहकुब करण्यात आलेल्या सभेला सुरूवात करण्यात येत आहे. सर्व आदरणीय सदस्यांना विनंती आहे कि त्यांनी लवकरात लवकर ऑनलाईन सभेकरीता जॉईन व्हायचे आहे.

**मा.महापौर :-** कृपया सर्वांनी आपले माईक बंद करायचे आहे.

**नगरसचिव :-** प्रश्न क्रं.८) श्री.सनकत चेतन गणेश

| | |
|---|---|
| १) सफाई कर्मचारी व चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना शासकिय सुटीचे लाभ देणे संदर्भात शासन परिपत्रक शासनाकडून प्रसिध्द झालेले होते. सदर शासन निर्णयानुसार अंमलबजावणी झालेली नसल्यास त्याची कारणे काय व त्याला कारणीभुत कोण याबाबत सविस्तर माहिती मिळावी. | १) शासन परिपत्रक क्रं.सफाई २०१६/ प्र.क्र.३७०/नवि-२० मंत्रालय मुंबई-३२ दि.२७ सप्टेंबर २०१६ आस्थापना विभागामार्फत दि.०४/०३/२०१७ डॉकीट क्रं.३०३० महासभेस सादर झाले. महासभेने ठराव क्रं.६२ दि.२९/०४/२०१७ शासकिय सुटीचे दिवशीचे मोबदला देणे व उपविधी तयार करणेस मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने मालेगांव, नाशिक, धुळे, अहमदनगर, उल्हासनगर, औरंगाबाद म.न.पा.स पत्र दिलेले असून माहिती प्राप्त झालेनंतर तात्काळ पुढील कार्यवाही आस्थापना विभागामार्फत करण्यात येईल. |

**मा.महापौर :-** चेतनभाऊ बोला.

**मा.उपमहापौर :-** चेतनभाऊ बोलायचे आहे का.

**मा.महापौर :-** चेतनभाऊ बोला व दोन मिनिटांत आटोपा.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई माझा विषय असा आहे कि, आपले जे सफाई कर्मचारी असतील यांचे बाबत माहिती मागीतली होती. आपण त्यांना सुटीच्या दिवसाचा त्य ांना पगार देणार आहे का ? महापालिकेने . . .

**मा.महापौर :-** चेतनभाऊ तुम्हाला जे उत्तर दिलेले आहे त्याने तुमच समाधान झालेले आहे का ?

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई तो प्रश्न वेगळा होता हा प्रश्न वेगळा आहे. तो शासकीय सुटी बाबतचा विषय आहे हा सफाई कर्मचाऱ्यांचा विषय आहे.

**मा.महापौर :-** चेतनभाऊ तुम्हाला जे उत्तर दिलेले आहे.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई तो जि.आर आहे.

**मा.महापौर :-** चेतनभाऊ तुम्हाला जे उत्तर दिलेले आहे त्याने तुमच समाधान झालेले आहे का ?

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई नाही .

**मा.महापौर :-** चेतनभाऊ बोला.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई सफाई कर्मचाऱ्यांच्याबाबतीतला जो २०१६ चा जि.आर आहे तो २०१६ मध्ये निघालेला जो जि.आर आहे तो आता बघा ऐकून घ्या मी काय म्हणतोय ते एकदा शासकीय कार्यालयांकरीता ५ दिवसांच्या आठवडयाचा जो जि.आर आता निघालेला आहे तर तो आपण ५ दिवसांमध्ये लागू केलेला आहे. तर आता साडेचार वर्ष झालेले आहे. सफाई कामगारांचे बाबतीतला त्याचे काहीच सफाई कर्मचाऱ्यांना लागू केलेले नाहीये. ईतके साढेचार वर्ष निघुन गेलेले आहे म्हणजे हा डोळेझाक पणा नाहीये का प्रशासन कर्मचाऱ्यांचे शोषण करतय . प्रशासन लक्षच देतच नाहीये म्हणजे हे फक्त सफाई कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आहे का? म्हणजे ५ दिवसांच्या आठवडयाचा जि.आर ५ दिवसांत लागू करताहेत व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना आजपर्यंत लाभ दिलेले नाही.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई .

**मा.महापौर :-** ईबाभाऊ हे झाल्यानंतर बोला.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई एकतर कायम कर्मचारी यांचे सर्व लाभ लागू करताहेत आणि दुसऱ्या ठिकाणी तुम्ही प्रशासनाने सफाई कर्मचाऱ्यांचे खच्चीकरण करताहेत का? प्रशासनाने सफाई कर्मचाऱ्यांना सुटीचे लाभ दिलेले नाही आतापर्यंत महानगरपालिकेला लागू नाहीये का साध्या नगरपालिकेला ते लागु झालेले आहे. मग तुम्ही जे मला उत्तर दिले आहे की आपल्याला लागू नाही. तुम्ही मुंबई , नाशिक ला धुळयाला नगरला , मालेगांवला पत्र पाठविलेले आहे पण त्यांचे अजून पत्र आलेले नाही. त्या पत्रात तुम्ही पत्र पाठविल्यानंतर स्वत:च्या सुटयांसाठी तुम्ही ५ दिवसांत लागू करताहेत आणि सफाई कर्मचाऱ्यांसाठी कोण करेल.प्रशासनाने मला याचे उत्तर द्यावे.

**श्री.दिलीप पोकळे :-** सन्मा.सदस्य चेतन सनकत यांनी जो विषय मांडला आहे साहेब त्यांच्या संदर्भात हा जो जि.आर आहे कि जे सफाई कर्मचारी आहेत. त्याच्या सुटीसंदर्भातील २०१६ मध्ये आपला. . .

**श्री.चेतन सनकत :-** ५ दिवसांच्या आठवडयासाठी आपले प्रशासन हे कश्या पध्दतीने काम केले हे लक्षात आले का ? ज्या दिवशी यांना सुटी असते त्या दिवशी सफाई कर्मचारी काम करत असतो. अधिकाऱ्यांना लाभ असतात सुटीचे का बर ? सफाई

कर्मचारी वेळेवर काम करतो .२७ सप्टेंबर २०१६ पासुन हा शासनाचा जि.आर निघालेला आहे की हि जी सुटी आहे ती सफाई कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावी.

**श्री.भगतराम बालाणी :-** महापौर ताई त्यांचे असे म्हणणे आहे की शासन निर्णय आहे त्याची आपण तात्काळ अंमलबजावणी केली . याच्यामध्ये आपले जे पंतप्रधान मोदी साहेब हे सफाई कामगारांचे पाय धुवुन त्यांचा सत्कार करतात आणि आपण हा चुकीचा विषय करतात. तरी सफाई कर्मचाऱ्यांना ते लागू करण्यात यावे आणि व त्याची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. अशी प्रशासनाला विनंती आहे.

**श्री उदय पाटील, आरोग्याधिकारी :-** सन्मा.सभागृह सन्मा सदस्य श्री.चेतन सनकत यांनी विचारला आहे त्याच्यावर मी खुलासा सादर करीत आहे. शासन निर्णयानुसार शासकीय कर्मचाऱ्यांना सुटीचे लाभ देण्याकरीता महासभेमध्ये ठराव पारीत झालेला आहे.

**श्री.चेतन सनकत :-** बापुसाहेब ठराव कोणत्या वर्षी झालेला आहे ?

**श्री उदय पाटील, आरोग्याधिकारी :-** १९/०४/२०१७ मध्ये पारीत झालेला आहे.

**श्री.चेतन सनकत :-** म्हणजे २०१७ मध्ये ठराव पास झालेला आहे मग त्याची अंमलबजावणी झालेली का नाही ?

**श्री उदय पाटील, आरोग्याधिकारी :-** आपण शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला होता , परंतू या संदर्भामध्ये याची उपविधी आपले महानगरपालिकेने तयार केल्याचे दिसत नाही तर या अनुषंगाने आपल्याकडे एक नमुना आपल्याला मिळावा म्हणून आपण , नाशिक, मालेगांव, धुळे , नगर या महापालिकांना आपण या संदर्भात पत्रव्यवहार केलेला आहे. त्यामध्ये आपल्याला ज्या उपविधी आपल्याला मिळाल्या त्याआधारे आपण आपले उपविधि आस्थापना विभागामार्फत तयार करून पुढची कार्यवाही करणार आहोत. तसेच इतर महानगरपालिकेच्या उपविधी आपल्याला प्राप्त झालेल्या नाहीयेत त्यामुळे हा प्रस्ताव राहीलेला आहे.

**श्री.चेतन सनकत :-** बापुसाहेब याच्यासंदर्भात माझे म्हणणे हे आहे की, आपल्या जिल्हयाच्या तालुक्यांमध्ये भुसावळ मध्ये या जि.आर प्रमाणे लाभ सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात येत आहे. तुम्ही महाराष्ट्रातील पुर्ण महापालिकेला पत्र पाठविले असेल. तर भुसावळ ची माहिती घेतली का? नगरपालिकेमध्ये देता येते पण महानगरपालिकेमध्ये देता येत नाही.याची माहिती घेतली का?

**श्री उदय पाटील, आरोग्याधिकारी :-** चेतनभाऊ मी माहिती घेतो परंतू ती नगरपालिका असल्यामुळे नगरपालिका आणि महानगरपालिका अधिनियमांमध्ये फरक आहे. तरी आपल्या महानगरपालिका अधिनियमांमध्ये फरक असुन तरी आम्ही त्यानुसार माहिती घेतो व त्यानुसार ते तयार करून घेतो .

**श्री.चेतन सनकत :-** बापुसाहेब विषय आता सन्मा.महापौरताई , उपमहापौर भाऊ मी जी माहिती मागीतलेली होती ती महापालिकेच्या कर्मचारी यांना लागू करण्यात यावी . त्या जि.आर नुसार सफाई कर्मचाऱ्यांना लाभ देण्यात यावा.तुम्ही सफाई कर्मचाऱ्यांचे शोषण करताहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब , आयुक्त साहेब .

**श्री.चेतन सनकत :-** प्रश्न क्रं. ९ जो आहे वॉटरग्रेस चा जो पत्रव्यवहार आहे.

**श्रीकुलभुषण पाटील :-** नितीनभाऊ

**श्री उदय पाटील, आरोग्याधिकारी :-** सन्मा.सभागृह तर याच्यामध्ये वॉटरग्रेस च्या संबंधी हा विषय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो बापुसाहेब हा प्रश्न क्रं. ९ आहे वॉटरग्रेस च्या संबंधी

**श्री.चेतन सनकत :-** आधी माझ्या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने द्यावे अधिकाऱ्यांना सुटी लागते सफाई कर्मचाऱ्यांना सुटी लागत नाही का? बोला ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब यांना त्यांचे समाधानकारक उत्तर द्या व पुढचा प्रश्न घ्या.

**श्री.चेतन सनकत :-** याला किती दिवस लागतील व अंमलात आणण्यात येईल हे सांगा.

**श्री उदय पाटील, आरोग्याधिकारी :-** माहीती मागविण्यात येवुन त्याच्यानंतर महासभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात येईल.सदरची माहिती मागवुन येणाऱ्या महासभे मध्ये ठेवण्यात येईल.

**श्री.चेतन सनकत :-** ठिक आहे धन्यवाद. पुढच्या महासभेमध्ये मी विचारणार आहे.

**नगरसचिव** :- प्रश्न क्रं.९) श्री.नितीन बालमुकूंद लढ्ढा

| | |
|---|---|
| १) वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांचे शहरातील घनकचरा उचलणे व त्याची वाहतुक करणेचे काम दि.०६/०३/२०२० रोजी म.न.पा.ने बंद केले त्याची कारणे काय ?<br>२) सदर मक्ता पूढे रद्द करणे किंवा करारनाम्याच्या अटी शर्तीनूसार सुरु करणे संदर्भात प्रशासनाने काय पावले उचलली आहे व त्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय ? | १) वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक या कंपनीने घंटागाडीचे रुट नूसार वाहने न पाठविणे, रस्ते, गटार स्वच्छतेचे कामात मनुष्यबळ संख्या कमी पुरविणे, कामगारांची बायोमॅट्रीक हजेरी न घेणे, कामगारांचे पी.एफ. खाते उघडून खातेवर ऑनलाईन भरलेले चलन सादर न करणे, शहरातील स्वच्छतेचे काम सुरळीत न |

| | |
|---|---|
| ३) वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांचे दि.०६/०३/२०२० पासून काम बंद झालेनंतर पर्यायी व्यवस्था म्हणून कामगार घेणे संदर्भात निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती ती निविदा प्रक्रिया रद्द करणे मागची नेमक्या कारणांचा खुलासा करण्यात यावा.<br>४) पर्यायी कामगार व्यवस्था करण्याकामी मक्तेदार S.K.Traders यांना कामगार पुरवणेकामी कुठल्याही जाहीर निविदा प्रक्रिया न राबविता मंजूर दरानूसार कार्यादेश देण्यात आला हे कायदेशीरदृष्टया योग्य आहे कां ?<br>५) इतका मोठा मक्ता देण्याचे संदर्भात अशा पध्दतीने मंजूर दराने मक्तेदार नेमून कितपत योग्य आहे याचा खुलासा / माहिती देण्यात यावी.<br>६) शासकिय नियमानुसार म.न.पा.स पुरविण्यात आलेल्या संपुर्ण कामगाराच्या P.F. Account व ESI या आवश्यक गोष्टींची पुर्तता पालन केले आहे काय ?<br>नसल्यास त्याची होणारी कायदेशीर जबाबदारी कोणाची आहे ? | ठेवणे व वारंवार कामगारांचे पगार अभावी संप होणे.<br>२) मे.एस.के.कॉन्ट्रक्टर,जळगांव यांचा मक्ता रद्द करुन दि.०१/०८/२०२० पासून मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांनी काम सुरु केलेले आहे. |

**मा.महापौर :-** नितीनभाऊ बोला.

**श्री.नितीन लढ्ढा:-** मा.महापौरताई सदरच्या विषयावर भरपुर चर्चा झालेली आहे आणि या विषयाच्या अनुषंगाने सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. मला फक्त सभागृहात प्रशासनाला एवढेच सुचित करण्यात सारस्य आहे कि अश्या पध्दतीने प्रत्येक वेळेला निविदेमध्ये विलंब होतो . आता माहिती घेतल्यानंतर ती मुदत संपुष्टात येणार आहे. परंतू मुदतीआधी पालिकेने व्यवस्था करणेकामी किमान निविदा प्रक्रीया सुरू करावी. वारंवार प्रशासनाकडून दिरंगाई होते आणि त्यामुळे अश्या परिस्थितीमध्ये निर्णय घेतांना आणि याच विषयाच्या अनुषंगाने वॉटरग्रेस चा मक्ता संपुर्ण प्रस्ताव आपण त्यावेळेला ठेवला होता. प्रशासनाने तो निर्णय निविदा प्रक्रीया राबवली होती . परंतु निविदा प्रक्रीया अंतिम टप्प्यात आल्यानंतर मग त्याच्यावर मग हे सगळ झाल होत हे निविदेप्रक्रीयेसोबत राबविले असता कि एका वेळेसच केले असते किंवा या प्रक्रीयेला विलंब न करता त्याच्यावर सन्मा.सदस्यांना एवढा त्रासही झाला नसता . तरी प्रशासनाला सुचना आहे की या निविदे प्रक्रीया मध्ये वॉटरग्रेस चे काम संपुष्टात येत असेल. तर त्याची पुर्व तयारी हे वॉटरग्रेसचे काम अंतिम मुदत संपण्याच्या आत दोन महिन्यापुर्वी निविदा प्रक्रीया करण्याची भुमिका प्रशासनाने घेण्यात यावी.

**नगरसचिव :-** प्रश्न क्रं.१०) श्री.लढ्ढा नितीन बालमुकूंद

| | |
|---|---|
| १) जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या व्यापारी संकुलाचे गाळेभाडे / नुकसान भरपाईची एकुण रक्कम आजपर्यंत किती वसुल करण्यात आलेली आहे ?<br>२) व यामध्ये GST वस्तु सेवा कर किती जमा करण्यात आलेला आहे ?<br>३) व ती रक्कम वस्तुसेवा कर GST विभागाला भरण्यात आलेली आहे का ?<br>४) असल्यास किती व कैंव्हा भरण्यात आलेली आहे ?<br>५) रक्कम भरण्यात आलेली नसल्यास का भरण्यात आलेली नाही ?<br>६) त्याचे कारण काय GST भरण्यास विलंब झाला असल्यास दंड व व्याज किती आकारले जाईल व ते | |

| | |
|---|---|
| भरण्याची जबाबदारी कोणाची ?<br>७) GST, TDS चे कामासाठी म.न.पा.ने आतापर्यंत सनदी लेखापाल यांची नेमणूक केली आहे कां ?<br>८) व केली असल्यास ती जाहिर निविदा किंवा देकार मागविण्यात आल्या होत्या कां ?<br>९) असल्यास कोण कोण निविदाधारक आले व कोणाला नेमणूक देण्यात आली आहे याची माहिती दयावी.<br>१०) भाडे नुकसान भरपाई पोटी जमा झालेल्या रक्कमेच्या मुदत ठेवी करण्यात आलेल्या आहेत कां ?<br>असल्यास किती रक्कमेच्या या व्यतिरिक्त म.न.पा.ने विविध बँकेत ज्या मुदत ठेवी केलेल्या आहे त्या कोण कोणत्या निधीच्या व किती रक्कमेच्या व त्यावर व्याज किती टक्के प्रमाणे सदया मिळत आहे ? | ७) GST, TDS चे कामासाठी म.न.पा.ने सनदी लेखापाल यांची नेमणूक केलेली आहे.<br>८) देकार मागविण्यात आलेले आहे<br>९) १)दहाड गोयल कंपनी, २)अश्विनकुमार पाटील ॲण्ड असोसीएसट्स, ३) आर.एन.पाटील ॲण्ड कंपनी, ४) ए.आर.शहा ॲण्ड असोसिएट्स<br>१०) भाडे/नुकसान भरपाई पोटी जमा झालेल्या रक्कमेच्या मुदत ठेवी करण्यात आलेल्या आहेत.<br>११) सन्मा.सदस्य यांना पत्रासोबत यादी दिलेली आहे. |

**मा.महापौर :-** नितीनभाऊ बोला.

**श्री.नितीन लढ्ढा:-** मा.महापौरताई मला मुख्य प्रश्नाच उत्तर मला प्राप्त झालं नाहीये. GST च्या संदर्भातील प्रश्न होता आणि प्रश्न हा तसाच प्रलंबित आहे. या विषयाच्या अनुषंगाने मा.आयुक्तांशी पुर्वी मी चर्चा सुध्दा केलेली होती आणि या परिस्थितीच गांभीर्य सुध्दा त्यांच्या लक्षात आणुन दिलेले होते . परंतू सद्या कोरोना च्या ड्युटीमुळे किरकोळ वसुली विभागाचे अधिक्षक ते आपल्या इंजिनियरींग कॉलेज मध्ये असल्याने त्यांना माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी उशिर झाला . म्हणून माझा GST शी संबंधित असलेला जो प्रश्न आहे तो राखीव ठेवलेला आहे. त्यासाठी खरतर माझा हा प्रश्न क्रं. १० मधील ७ हा GST शी संबंधित असल्यामुळे ती माहिती नमुद केली आहे का ? ती नमुद केलेली नाही . त्याच्यामधील क्रं . ८ मधील याच्यासाठी जाहीर निविदा मागविल्या होत्या का ? देकार मागविण्यात आलेले आहे. आता या संपुर्ण प्रक्रीयेचे आपण कायदेशीर अवलोकन कराल तर ही सगळी कार्यपध्दती जी आहे ती सर्व अतिशय चुकीच्या पध्दतीने राबविलेली आहे आणि चुकीच्या पध्दतीनेच नाही. अश्या बऱ्यापैकी अनेक प्रक्रीया या चुकीच्या पध्दतीने महानगरपालिकेने राबवल्या गेल्या आहेत. आता सनदी लेखापाल नेमणूकी च्या विषयामधील जी प्रकरण होते . आता त्या सनदी लेखापाल नेमणूकीची प्रक्रीया होती प्रशासनाचे जे धोरण घेतल होत. त्यावेळेला लक्षात आल कि हि वर्षानुवर्ष अतिशय चुकीची प्रक्रीया चे अवलंब करून या पध्दतीने आपण ती ३ पाकीटे मागवुन प्रक्रीया आपण राबवतो आणि ३ कोटेशन मागवुन ती प्रक्रीया आपण करतो . हि प्रक्रीया अत्यंत बेकायदेशीर व चुकीची पध्दत आहे. याच्यामध्ये महानगरपालिका अधिनियमाच्या कलम मध्ये प्रकरण ५ मध्ये विवक्षित प्रकरणी निविदा मागविल्या यामध्ये स्पष्टपणे तरतूद आहे, कि या प्रकारची जी प्रक्रीया आहे ती आयुक्त यांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने जे कोणतेही काम कोटेशन किंवा कोणत्याही प्रकारची प्रक्रीया राबवली याच्यासाठी दोन लाख रूपयापेक्षा अधिक किंवा महानगरपालिकेचा ३ लाखापेक्षा जास्त खर्च होणार असेल तर ते काम करण्यात याव असे किंवा कोणतीही सामग्री किंवा माल पुरविणेबाबत कोणतीही संविदा करण्यापुर्वी निदान स्थानिक वृत्तपत्रातील जाहीरातीद्वारे याच्यासाठी अश्या निविदा मागवल्या गेल्या पाहीजे. परंतू दोन लाखापेक्षा कमी रकमेच्या कोणत्याही संविदेच्या सुचना महानगरपालिकेच्या सन्मा .सदस्य यांच्या लक्षात आणुन द्याव्यात . अत्यंत स्पष्ट अशी कायद्यात ती तरतूद आहे. परंतू मी परवा आयुक्त साहेबांशी चर्चा केली . त्यांनी मला शासनाचे परिपत्रक कोणते कोणते आहेत ते मला त्यांनी दर्शविले आणि त्या शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे ज्या ज्या पध्दतीने आपल्या सोईसाठी या पध्दतीचे बंद पाकीटे मागवायचे असतील तश्या पध्दतीने बंद पाकीटे महापालिकेने मागवली त्याच्यामध्ये शंका त्याच्यामध्ये प्रत्येक पाकीटात त्याच्यामध्ये हेतू चांगला असेल व तसे मला मान्य आहे. परंतू हि प्रक्रीया जी आहे. सनदी लेखापाल नेमणूकीची हि अतिशय चुकीच्या पध्दतीची झाली आहे. हि निविदा पाकीटे महानरपालिकेने ओपन केली परंतु त्याच्यासंदर्भातील संपुर्ण माहिती घेतली असता. सनदी लेखापाल बाबत या सर्व बाबी मुख्यलेखाधिकारी श्री. कपिल पवार साहेब यांच्या निदर्शनास आणुन दिल्या कि, अश्या पध्दतीने आपल्या काही अधिकारी मंडळी चुकीच्या पध्दतीने काम करीत आहेत. चुकीच्या पध्दतीने काम करून प्रशासनात ते कार्यरत आहेत आणि या सगळया प्रक्रीयेमागे सगळयात मोठ काम म्हणजे काय कि हे जे आहे मक्तेदारांना पैशांची मागणी करीत असतात. अश्या पध्दतीच्या तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत आणि अश्या पध्दतीचे संदर्भ मी आपल्याकडे मागे सुचित केले होते . तर या अनुषंगाने आपण याच्यामध्ये लक्ष घालावं. आपल्याकडे स्टोर डिपार्टमेंट असेल किंवा अन्य काही असतील तर अश्या पध्दतीच्या निविदा प्रक्रीया राबविणे हे अत्यंत

बेकायदेशीर आहे व चुकीची आहे. आता जळगांव मध्ये ३०० सनदी लेखापाल आहेत.परंतू ३०० सनदी लेखापाल मध्ये मी निवड कशी करता येईल. ती महानगरपालिकेच्या GST च्या संदर्भातील रिटर्न भरण्यासंदर्भामध्ये जळगांव मध्ये इतके सनदी लेखापाल असतांना स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात तुम्ही दिली असती. परंतू हि कार्यपध्दती तुम्ही अवलंब केली असती , परंतू महानगरपालिकेच्या अनुषंगाने साधारणत: अश्या पध्दतीने याच्यामध्ये जळगांव शहरातील अनेक लेखापाल महानगरपालिकेमध्ये काम करायला ईच्छुक आहेत. याबाबत मला ३ ते ४ लेखापाल मला येवुन भेटले , कि अश्या पध्दतीने महानगरपालिकेच्या कुठल्याही नियमांचा अंमल न करता कोणा कोणा कडून तिन पाकीट मागवायचे हे आपल्या सोईच्या असलेल्या व्यक्तीला हे टेंडर दिले जाते व कारण ती व्यक्ती सोईची असते आणि हे तिनही प्रकारचे पाकीटे हे मागवुन हे सर्व प्रक्रीया आपण बेकायदेशीर करतो. तर या अनुषंगाने यासाठी ज्या काही कारणाने विलंब झालेला आहे. तो तातडीने रद्द करण्यात यावा.आणि आता याच्यापुढे अश्या पध्दतीने बेकायदेशीर रित्या ३ पाकीटे मागविणे ते कोणतेही काम असो तर याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री.कपिल पवार , मुलेअ :-** सन्मा.महापौर आणि सन्मा.आयुक्त साहेब आता सन्मा. नितीनभाऊंनी प्रश्न विचारला आहे तर याच्याबाबत मी प्रशासनाच्या वतीने खुलासा करू ईच्छितो आपण सांगीतल्याप्रमाणे ॲक्ट मध्ये तरतूद २ लाखांच्यापुढे ज्या निविदा प्रक्रीया ज्या असतात. परंतू यामध्ये १ डिसेंबर च्या शासन निर्णयानुसार यामध्ये ३ लाखापर्यंत दरपत्रक मागविले गेले पाहीजे आणि ३ लाखांच्यापुढे ह्या निविदा प्रसिध्द करण्यात याव्यात . तर आपण आता जो मुद्दा सांगीतला ॲक्टचा हा शासन निर्णयापेक्षा वरचढ असतो तर मी याच्यामध्ये मी आपल्या लक्षात आणून देवु ईच्छितो की आता जिल्हा परिषद असते , पि.डब्ल्यु.डि असेल किंवा महानगरपालिका असते तर त्या ॲक्ट ला अनुसरून हे एकूण केले गेले आहेत. याच्यामध्ये मुद्दा असा आहे कि एकूण शासन निर्णया नुसार आपण निविदा प्रक्रीया करतोय . या संदर्भात शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करतोय. या खुलाश्यामध्ये असे नमुद केले आहे की शासन निर्णयानुसार तसेच अधिनियमातील तरतूदी नुसार याबाबत २०१६ नंतरची कोणतीही खरेदी त्या शासन निर्णयानुसार करावी.आपणांस लागल्यास हे मी आपल्या समक्ष आणुन देईन.

**श्री.नितीन लढ्ढा:-** मा.महापौरताई मला याबाबत काही दुमत नाहीये , मी आता आयुक्त महोदयांना असे विचारतो कि हा शासन निर्णय चुकीचा आहे कि ॲक्ट चुकीचा आहे आणि हे सर्वश्रृत आहे की ॲक्ट हा कधीही चुकीचा नसतो आणि त्याच्यामधील अश्या पध्दतीने शासन निर्णयाचा विचार करून अधिनियमामध्ये मांडलेले २०१६ च्या महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या पुस्तकामध्ये मी ज्यावेळेला महापौर होतो २०१६ पासुन सर्व सन्मा.सदस्यांच्या वतीने विचारतो कि २०१९ च्या ॲक्ट मध्ये काही अमेंटमेंट झालेले आहे का ? परंतू २०१९ मध्ये सुध्दा कोणत्याही प्रकारची अमेटमेंट झालेली नाहीये. जेथे कायद्यामध्ये संदिग्धता असेल त्याला शासन परिपत्रकाचा किमान आधार हा घेतलेला असतो. परंतू येथे कायदा हा स्पष्ट आहे तर ईथे मला वाटत कि कायद्याच्या बाहेर जावुन व अश्या प्रकारच्या परिपत्रकांचा आधार घेवुन यानिविदा प्रक्रीया राबविणे हे चुकीचे आहे. तरी मला आयुक्तसाहेबांनी याबाबत स्पष्टीकरण द्यावे.

**मा.आयुक्त :-** सन्मा. महापौर तसेच सन्मा.सभागृह मा.नितीनभाऊंनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे आपल्या निविदे प्रक्रीयेचा तर शासनाचे परिपत्रक असेल किंवा शासनाचा जि.आर असेल आणि काही कायद्यातील ज्या तरतूदी असतील आणि त्यात काही संदिग्धता असेल तर हि जी कायद्यातील तरतूद असेल तर त्याच्याविषयी दुसरे काही दुमत असेल असे काही नाही. परंतू आता नितीन भाऊंनी आता लक्षात आणून दिले कि अधिनियमातील प्रकरण ५ मध्ये २ लाखापर्यंतच्या निविदा प्रक्रीया राबविणेचा मर्यादेमध्ये आपण जर वेबसाईट वर किंवा संकेतस्थळावर केले तर अश्याप्रकारे आपण कोटेशन प्रसिध्द करणे २ लाख किंवा त्याच्यापेक्षा जास्त रकमेचे प्रसिध्द करणे याच्यापेक्षा जास्त रकमेच्या बाबतीमध्ये ज्या निविदेप्रक्रीये करीता वर्तमान पध्दती निश्चित केलेल्या आहेत . त्याच्यामाध्यमातुन करणे गरजेचे आहे. आता याच्यामध्ये एकच फक्त तांत्रिक मुद्दा आहे तो मी नितीनभाऊ आणि सभागृहाच्या लक्षात आणुन देवु ईच्छितो की , महानगरपालिका ज्या ज्या वेळेला आपण कोटेशन मागवु शकतो. आता महानगरपालिकेपेक्षा वरचे प्राधिकरण शासन आहे. शासनाने जर ३ लाख ठरवले असेल तर आपण यामध्ये जर आपण ३ लाखापर्यंतचे कोटेशन मागवत असु तर आपण या दोन्हींचा जर विचार केला तर वेळोवेळी तर कायद्यातील तरतूद व वेळोवळीचे शासनाचे निर्णय बघितले. तर महानगरपालिकेला २ लाखापेक्षा जास्त चे जे बंधन होते. तर यावेळेला २ लाखापेक्षा जास्त रकमेची निविदा प्रक्रीया न राबवता कोटेशन मागवण्याची तरतूद आहे. जर शासन निर्णय आहे की ३ लाखापर्यंत तुम्ही करू शकता आणि हा जो शासनाचा निर्णय आहे. जसे आता कपिल पवार यांनी सांगीतले की राज्याच्या सगळया विभागांना लागू आहे . आता नगरविकास विभागाला सुध्दा लागू आहे. त्यामुळे आता आपण ज्या पध्दतीचा वापर करतो तर त्या मध्ये प्रशासनाचा काही तसा हेतू दिसुन येत नाही. कारण ही प्रशासकीय सोय होते आणि शासन निर्णयाप्रमाणे २ लाखांची तरतूद झाली तर कायद्यातील तरतूद पाहीली तर आज लिडींग कॉस्ट काढली तर ती निश्चितच ३ लाखापर्यंत लागू आहे. तर आज प्रशासकीय प्रक्रीया वर्तमान पध्दतीने ज्यावेळेला शासन ज्यावेळेला तो निर्णय देत असेल. तर आपणही मान्य करायला पाहीजे.

आपला जो मुळ मुद्दा होता. आपल्या महापालिकेचे हित होणार आहे हे निश्चित आहे. आपला मुद्दा होता की आपले यामध्ये कॉम्पीटीशन व्हावे व त्या कॉम्पीटीशनचा फायदा महानगरपालिकेला व्हावा अश्या पध्दतीने हि कॉम्पीटीशन होण्याच्या गरजेने आपण निश्चितच येणाऱ्या पुढच्या काळामध्ये महानगरपालिकेच्या वेबसाईटवर असेल , गुगल वर असेल किंवा अन्य काही जे पर्याय येथे दिलेले आहेत. त्याच्यामध्ये जास्तीत जास्त लोकांना संधी मिळेल आणि महानगरपालिकेचा फायदा होईल अश्या पध्दतीने निविदा प्रक्रीया आपण निश्चित राबवु .

**श्री.नितीन लढ्ढा:-** निश्चितच प्रशासनाने याची काळजी घ्यायला पाहीजे. याच्यामध्ये तिन लोकांनी बंद पाकीटे दिले की काम देण्यात येते याच्यामध्ये माझा मुद्दा असा होता कि याच्याप्रमाणे निविदा प्रक्रीया न राबवता आपण ज्या निवड केलेल्या आहेत. त्या चुकीच्या पध्दतीने केलेल्या आहेत व मला जे पारदर्शक पध्दतीने ज्या जळगांव शहरामध्ये ३०० लेखापाल आहेत अश्या पध्दतीने तरी याच्यामध्ये फक्त ३ लोकांकडून अश्या पध्दतीने पाकीटे मागवायचा याचा हेतू काय याचा खुलासा प्रशासनाने करायला पाहीजे .आज शहरामध्ये ३०० चार्टंड अकाऊंटट आहेत. फक्त तिनच लोकांचे लिफाफे मागविले का ?

**मा.आयुक्त :-** आता गेल्या काही दिवसांमध्ये ज्या काही निविदा प्रक्रीया राबविल्या गेल्या त्याच्यामध्ये आत्ताही काही अश्या प्रकारच्या निविदा राबविण्याच्या संदर्भामध्ये दरपत्रक मागविलेले आहेत.तर मात्र एक मुद्दा निश्चित आपल्या निदर्शनास आणुन देतो तो तर आपल्याला याच्यामध्ये पारदर्शकता आणुन जे काही व्यवसायिक असतील तर याच्यामध्ये कॉम्पीटीशन घेतली जाईल व त्याचा फायदा महानगरपालिकेला कसा होईल .या दृष्टीने आपण सर्वांना संधी मिळेल अश्या पध्दतीने आपण कोटेशन मागवु.

**श्री.नितीन लढ्ढा:-** आयुक्त साहेब सनदी लेखापालाची प्रक्रीया रद्द करणेबाबत. . .

**मा.आयुक्त :-** आता आपण याचा फेरआढावा घेतला जाईल.तसे जर आढळले तर. . .

**श्री.नितीन लढ्ढा:-** मी याच्यामध्ये मा.आयुक्त महोदय हि जी प्रक्रीया राबविली होती की याच्यामध्ये प्रशासनाकडून जे चुकीचे काम झालेले आहे. म.महासभा संपल्यानंतर किंवा उद्या मी आपल्याला विस्तृतपणे दाखवेल कि या निविदे प्रक्रीयेमध्ये निश्चितपणे चुकीचे काम झालेले आहे. आणि त्याच्यानंतर आपण निर्णय घ्यावा. सदर प्रकरणी लेखापाल यांच्या नेमणूकीचे आदेश देण्यात येवू नयेत हि आपणांस विनंती आहे.

**मा.आयुक्त :-** आपली भुमिका समजावुन घेवु आणि त्यानंतर सदरचे आदेश देण्यात येतील.

**नगरसचिव :-** प्रश्न क्रं.११) श्री.सोनवणे कैलास नारायण

| | |
|---|---|
| १) अदयावत कुठल्या शासन निर्णयानुसार तसेच कोणकोणत्या निकषानुसार जळगांव मनपात रिक्त जागांपैकी किती टक्के जागांवर अनुकंपा तत्वावर नियुक्त्या देणे अनुज्ञेय आहे. ? | **१) शासन निर्णय :-** १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग-अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ दि.२१ सप्टेंबर २०१७, (२) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.एम.सी.ओ.-२०१९/ प्र.क्र.११७/ नवि-१४ दि.११ जुलै २०१९, (३) शासन निर्णय अकंपा-१२१८/प्र.क्र.०१/आठ दि.१५ फेब्रुवारी २०१८, (४) शासन निर्णय क्र.अकंपा/१२९९/प्र.क्र.५६/आठ दि.१० जुन २०१९<br><br>**निकष :-** १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग-अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ दि.२१ सप्टेंबर २०१७ अन्वये अनुकंपा नियुक्तीबाबत सर्व शासन निर्णयांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. त्यानूसार नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम.सी.ओ.-२०१९/ प्र.क्र.११७/ नवि-१४ दि.११ जुलै २०१९ अन्वये राज्यातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वारसास अनुकंपा नियुक्ती योजनेचा लाभ देणेबाबत उल्लेख असून महानगरपालिकेतील स्थायी, अस्थायी आस्थापनेवरील तसेच सेवानियमित केलेल्या परंतु अधिसंख्या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना गट-क व गट-ड मधील सरळसेवा पदांवर संबंधित सेवाप्रवेश नियमातील विहीत शैक्षणिक अर्हतेनुसार नियुक्ती देणेबाबत तरतुद आहे. (२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील ५३ (३) नुसार मा.आयुक्त सो. यांनी नेमणूकीचे अधिकार आहेत. तसेच मा.महासभा ठराव क्र.७० दि.१०/०२/२००५ अन्वये अनुकंपा तत्वावर नियुक्ती करणेस म.आयुक्त सो.जशमनपा जळगांव यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे. (३)दि.१५/०७/२०१० च्या न.पा.प्रशासन संचालनालयाच्या पत्रानूसार अनुकंपा नियुक्तीसाठी आस्थापना खर्चाची अट शिथिल करण्यात आलेली |

| | |
|---|---|
| | आहे. (४) दि.२१/०९/२०१७ च्या शासन निर्णयानुसार अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी वयोमर्यादा ४५ वर्ष करण्यात आलेली आहे. (५)दि.१३ जून २००३ च्या शासन निर्णयानूसार अनुकंपा तत्वावरील पदे भरताना मागासवर्गीय किंवा अमागासवर्गीय असा भेदभाव न करता प्रतीक्षा सूचीतील क्रमानुसारच पदे भरण्यात यावीत. (६) शासन निर्णय क्र.अनुकंपा/ १०१४/प्रक्र./१५५/आठ मंत्रालय मुंबई-३२ दि.१७ नोव्हेंबर २०१६ अन्वये खालील प्रमाणे शासन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.<br><br>**१.** शासन निर्णय क्र./अकंपा-१०१३/प्र.क्र./८/आठ/दि.२६/०२/२०१३ रद्द झाल्याने त्याअनुषंगाने तसेच उपरोक्त संदंर्भ १, २ व ३ अन्वये विहीत केलेल्या अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी दिवंगत शासकीय कर्मचाऱ्यांच्या पात्र नातेवाईकांच्या यादीमध्ये सुधारणा करण्यात येत असून खालील नमूद केलेले नातेवाईक अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र राहतील व त्यापैकी एका पात्र नातेवाईकास नियुक्ती अनुज्ञेय राहील १) पती/पत्नी, २) मुलगा/मुलगी,अविवाहीत/विवाहीत मृत्युपूर्वी कायदेशिररित्या दत्तक घेतलेला मुलगा/मुलगी अविवाहीत/विवाहीत, ३)दिवंगत शासकीय कर्मचाऱ्यांच्या मुलगा हयात नसेल किंवा तो नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून, ४) घटस्पोटीत मुलगी किंवा बहीण, परित्यक्ता मुलगी किंवा बहीण, विधवा मुलगी किंवा बहीण, ५)केवळ दिवंगत अविवाहीत शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्यांवर सर्वस्वी अवंलबून असणारा भाऊ किंवा बहीण<br><br>**२.** अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी संबंधितांकडून दिवंगत कर्मचाऱ्यावर अवलंबून असलेल्या कुटूंबातील अन्य व्यक्तींच्या सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. भविष्यामध्ये सदर प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन झाल्याबाबतची तक्रार संबंधीत कुटूंबातील सदस्यांची केल्यास सदर तक्रारीची चौकशी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी / शिस्तभंग विषयक प्राधिकाऱ्याने करावी. चौकशी अंती अनुकंपा नियुक्तीधारकाने प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन केल्याचे निषपंन्न झाल्यास त्याला सेवेतून काढून टाकण्याची देखील शिक्षा देता येईल. |
| २) जळगांव मनपात एकुण किती पदे रिक्त आहेत ? | २) दि.३०/०६/२०२० अखेर एकूण ९४० पदे (अंदाजित) रिक्त आहेत. (सफाई कर्मचारी धरुन) |
| ३) जळगांव मनपात एकुण किती जागांची प्रतिक्षा यादी प्रलंबित आहे ? | ३)आजमितीस जशमनपात एकूण ९९ उमेदवारांची प्रतीक्षा यादी प्रलंबीत आहे. |
| ४) अदयावत शासन निर्णयानुसार प्रत्येक वर्षी किती जागांवर अनुकंपा तत्वावर नियुक्त्या देणे अनुज्ञेय आहे ? | ४)अदयावत शासन निर्णय व तसेच वेळोवेळीचे शासन निर्णयांन्वये खालील तक्त्यानूसार अंदाजीत नियुक्त्या देणे अनुज्ञेय आहे. |

| वर्ष | रिक्त जागा वर्ग-३ | रिक्त जागा वर्ग-४ | रिक्त जागा एकूण | टक्केवारी | किती नियुक्या देता येतील |
|---|---|---|---|---|---|
| २०११ | - | - | ४५ | ५% | २.२५ |
| २०१२ ते २०१४ | - | - | १७३ | १०% | १७.३ |
| २०१५ | ३४ | ४६ | ८० | १०% | - |

<table>
<tr>
<td></td>
<td>
<table>
<tr><td>२०१६</td><td>३४</td><td>४३</td><td>७७</td><td>१०%</td><td>*</td></tr>
<tr><td>२०१७</td><td>३४</td><td>३३</td><td>६७</td><td>२०%</td><td>१३.४</td></tr>
<tr><td>२०१८</td><td>४१</td><td>४३</td><td>८४</td><td>२०%</td><td>१६.८</td></tr>
<tr><td>२०१९</td><td>३३</td><td>२५</td><td>५८</td><td>२०%</td><td>११.६</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td>एकूण</td><td>६०.०५</td></tr>
</table>
*२०१७ मध्ये अनुकंपा तत्वावर १६ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे.
</td>
</tr>
<tr>
<td>५) सदयस्थितीत महाराष्ट्र शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.अर्थसं२०२०/प्र.क्र.६५/अर्थ३ दिनांक ३०/०७/२०२० अन्वये अनुकंपा तत्वावरील भरतीय निर्बंध लागू राहणार नाहीत असे निर्णय असून त्यानुसार जळगांव मनपा अनुकंपा तत्वावर नियुक्त्या देणेची कार्यवाही सुरु आहे कां ? तसेच या प्रकरणी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दयावी.</td>
<td>५)होय.<br><br>शासन निर्णय क्रं./अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३ दि.४ मे २०२० च्या शासन निर्णयात पदभरती व बदली मध्ये, १४) सार्वजनिक आरोग्य विभाग व वैदयकीय शिक्षण व औषधी व द्रव्ये विभाग वगळता कोणत्याही विभागाने कोणत्याही प्रकारची नविन पदभरती करु नये १५) कोरोना महामारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या विविध विविध विभागांतर्गतच्या उपाययोजनामध्ये सातत्य राखणे गरजेचे आहे ही बाब लक्षात घेवून चालू वित्तीय वर्षात कोणत्याही संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची बदली करण्यात येवू नये या अनुषंगानेचे सविस्तर आदेश सामान्य प्रशासन विभागामार्फत देण्यात येत आहेत असे नमूद आहे.<br><br>तसेच शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३ दि.३० जूलै २०२० मध्ये, " मात्र सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्ण्य क्र.अकंपा/१२१९/प्र.क्र.५६/आठ दि.११ सप्टेंबर २०१९ नूसार केल्या जाणाऱ्या अनुकंपा तत्वावरील भरतीस सदरचे निर्बंध लागू राहणार नाहीत." असे नमूद आहेत.<br><br>अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत कार्यवाही प्रस्तावीत आहे. उपलब्ध् असलेली माहिती देण्यात येत आहे.</td>
</tr>
</table>

**म.उपमहापौर:-** कैलास आप्पा बोला .

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब , याठिकाणी आस्थापना अधिक्षक आहेत राजेंद्र पाटील यांनी उत्तर द्यावे. त्याचप्रमाणे आपले देशमुख साहेब आहेत . मी ५ ते ६ प्रश्न विचारले आहे परंतू त्यानुसार मी एक समजावतो. आपली ---------------------- राजु पाटील यांनी सांगीतले आहे. महापौरांच्या समोर आपल्याकडे १४० पदे रिक्त आहेत का ? राजेंद्र पाटील साहेब बोला.देशमुख साहेब मला तुमच्या सहीने पत्र मिळालेले आहे. मा.आयुक्त साहेब . .

**श्री.किरण देशमुख , उपायुक्त :-** हो बरोबर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रतिक्षा यादी आली ९९ जणांची आहे.

**श्री.किरण देशमुख , उपायुक्त :-** हो बरोबर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ६० लोकं आपण भरू शकता का ?

**श्री.किरण देशमुख , उपायुक्त :-** शासन निर्णयानुसार आपल्या महापालिकेत ६० जागा भरता येतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** बर साहेब आता या ६० जागा तुम्ही केव्हा भरणार ?

**श्री.किरण देशमुख , उपायुक्त :-** याच्यामध्ये कसे आहे कि हि जी सर्व प्रकरणे आहेत हि सर्व तपासले जातील आणि शासन निर्णयानुसार.

**श्री.कैलास सोनवणे :-** बर साहेब ते तपासुन घ्या तुम्ही परंतू यामध्ये कोणताही शासन निर्णय किंवा कोणताही कायदा आडवा येत नाही आणि तुमचा शासन निर्णय असेल तर तोही शासन निर्णय बघण्यात यावा आणि याच्यासंदर्भामध्ये की अनुकंपा तत्वामध्ये कोणताही शासन निर्णय अडत नाही . तरी नियमाप्रमाणे , कॉलीफीकेशन प्रमाणे या लोकांची भरती तुम्ही केव्हा करणार याचे उत्तर मला आयुक्त साहेबांकडून पाहीजे.

**श्री.सुनिल खडके :-** आयुक्त साहेब आम्ही सुध्दा आपल्याला याकरीता निवेदन दिलेले आहे. त्यामध्ये जे लोक आहेत ते जवळ जवळ ३० ते ४० लोक आहेत . त्यांनी निवेदन पण दिले आहे आयुक्त साहेबांना भेटुन.

**मा.महापौर :-** सुनिलभाऊ तुमचा आवाज येत नाहीये.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब , एक मिनिट सुनिलभाऊंचा आवाज येत नाहीये तरी आयुक्त साहेबांनी याच उत्तर द्यावं कि हि पदे किती दिवसात भरणार आहेत.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर

**श्री.सुनिल खडके :-** हॅलो आवाज येतोय का माझा ?

**मा.महापौर :-** बोला सुनिलभाऊ तुमचा आवाज येतोय .

**श्री.सुनिल खडके :-** आपल्याकडे ज्या जागा अनुकंपाच्या आहेत. म्हणजे ९० जागा आहेत आणि ६० जागा आपण भरू शकतो आणि ६० जागा आपण नियमानुसार भरू शकतोय या ६० जागा भरल्यामुळे कुठलाही आर्थिक बोजा आपल्या महानगरपालिकेवर पडणार नाही .आणि या ६० लोकांमध्ये बरेच लोक जे आहेत ते ऐजबार झालेले आहेत. आता त्याच्यामध्ये त्यांचे वय ४० ते ४२ च्या वर झालेले आहे तर त्यांनी कोर्टाकडून न्याय मागावा. तर मला या संदर्भामध्ये आयुक्त साहेबांना विनंती करायची आहे तरी अनुकंपा तत्वावरची हि ६० जागांची भरती करावी आणि जे ऐजबार झालेले आहेत त्यांचा सुध्दा त्यांनी नियमामध्ये बसत असल्यास किंवा कोणत्या शासन निर्णयामध्ये बसत असेल तर ते करावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब .

**मा.महापौर :-** बोला आप्पासाहेब बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब , मी आयुक्त साहेबांना एक प्रश्न विचारतो की या ६० जागा केव्हा भरणार त्यांनी हे ही सांगावे की याच्यामध्ये जे लोक ऐजबार झालेले आहेत.त्यांची भरती केव्हा होणार आणि याच्यामध्ये यांची भरती केव्हा होणार ?

**मा.आयुक्त :-** मा.महापौर , अनुकंपाच्या संदर्भामध्ये जे शासनाचे धोरण आहेत त्या धोरणानुसार जे कर्मचारी सेवेमध्ये असतांना मयत झाले असतील. अश्या कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसांना त्या त्या आस्थापनेवर त्याच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रिक्त पदांच्या काही ठराविक टक्केवारी नियमाप्रमाणे त्यांची नेमणूक करण्याची तरतूद आहे. परंतू आपल्या महानगरपालिकेमध्ये काही बाबतीत असे काही लक्षात येते की जवळपास गेल्या ७ ते ८ वर्षांमध्ये अनुकंपाच्या नियुक्त्या ह्या झालेल्या नाहीत हि वस्तुस्थिती आहे. आता या नेमणूका का झाल्या नाहीयेत . त्याची आपल्याला कागदपत्रे तपासावी लागतील. काही आपल्याला शासनाची काही मार्गदर्शक तत्वे होती का . कारण काय आहे की महानगरपालिका झाल्यापासुन आपला आकृतीबंध मंजुर झालेला नाहीये , दुसरी गोष्ट आपला आस्थापना खर्च हा ३५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे.परंतू अडमीनीस्ट्रेशन मध्ये नगरपालिकेंच्या बाबतीमध्ये अश्या सुचना दिलेल्या आहेत की अनुकंपा नियुक्ती करत असतांना आस्थापना खर्च पाहण्याची गरज नाही. परंतू आता आपण हे करत असतांना महानगरपालिकेसाठी हे लागू आहे का महानगरपालिका ह्या सर्व बाबतीत संपुर्ण प्रशासकीय नियंत्रणासाठी शासनाच्या काही वेगळया सुचना आहेत का किंवा आता या सगळयामध्ये त्यावेळेला आपल्याला या सगळयांची माहिती घ्यावी लागेल.परंतू आता सध्या याच्यामध्ये ज्या काही पध्दत आपल्याला शासनाच्या धोरणाप्रमाणे मागे असलेला बॅकलॉग सह आपल्याला कोणत्या पदाकरीता आवश्यकता आहे. त्याच्यामध्ये प्रत्येक प्रकरणामध्ये महत्वाचा मुद्दा असा आहे कि आपण प्रत्येक प्रकरणाची छाननी करून त्यातुन निघालेल्या निकषानुसार आपण या नेमणूका करण्याच्या संदर्भामध्ये जी काही कार्यवाही आहे. तर आपण ती प्रशासनाच्या वतीने निश्चित करूया.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब , सदर नियुक्त्या ज्या आहेत त्या करण्यासाठी आपण शासनाचे जि.आर नुसार पाळत नाहीत असे माझे म्हणणे नाही . पण माझे असे म्हणणे आहे की आपण लवकरात लवकर हि भरती आपण करावी. अशी मी नम्र विनंती करतो.आता साहेब मला दुसरी एक गोष्ट विचारायची आहे की जळगांव शहर महानगरपालिकेमध्ये कालबध्द पदोन्नतीचे काय आहे. आपण कालबध्द पदोन्नती दिलेल्या नाहीयेत आणि त्याच्यामध्ये जवळजवळ २०० कर्मचारी तर हे लोक १५ ते १६ वर्षापासुन त्याच्यामुळे बाधित झालेले आहे . काही लोक हे रिटायर्ड सुध्दा झालेले आहेत. तरी देशमुख साहेब तुम्ही मला याचे उत्तर द्यावे मला प्रशासनाने याचे उत्तर सांगावे. राजेंद्र पाटील यांना विचारा.

**श्री.किरण देशमुख , उपायुक्त :-** सन्मा.सभागृह याच्यामध्ये आप्पासाहेब मी या संदर्भात आस्थापना अधिक्षकांकडून माहिती घेतो आणि मी आपल्याला याबाबत खुलासा कळवतो .

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही आत्ता विचारा साहेब , त्यांना माहिती असेल आस्थापना अधिक्षक आहेत सभागृहामध्ये त्यांना विचारा कि किती लोकांचे कालबध्द चे काम झालेले नाहीये .

**श्री.राजेंद्र पाटील , आस्थापना अधिक्षक:-** २६ जून २०१६ रोजी आस्थापना विभागाकडून ती जी समिती नेमण्यात आलेली होती.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही मला ते नका सांगू मला फक्त एवढेच सांगा कि किती कर्मचारी बाधित झालेले आहेत . किती लोकांचे बाकी आहे याचे उत्तर द्या.

**श्री.राजेंद्र पाटील , आस्थापना अधिक्षक:-** तेच सांगतोय आप्पासाहेब २०० लोक आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही राजेंद्र पाटील किती लोक राहीलेले आहेत २०० आहेत कि नाही एवढेच सांगा.

**श्री.राजेंद्र पाटील , आस्थापना अधिक्षक:-** होय २०० लोक राहीलेले आहेत .

**श्री.कैलास सोनवणे :-** बस मला तेच विचारायचे होते , तर आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे. जे दिडशे ते २०० कर्मचारी बाधित झालेले आहेत . त्यांना १५ ते १६ वर्षापासुन त्यांना कालबध्द पदोन्नती दिलेल्या नाहीयेत. म्हणून माझी विनंती आहे की कोविड आहे कर्मचारी एक्सपायर झालेले आहेत. तरी मी सर्व माहिती घेतलेली आहे. तर मी साहेबांना विनंती करतो की ती जी समिती आहे डिपार्टमेंटल प्रमोशन कमिटी . त्या समिती बाबत साहेबांनी लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

**मा.आयुक्त :-** मला वाटत कि मागे डिपीडीसी ची कमिटी गठीत केलेली असावी. आता याच्यामध्ये आपल्या महानगरपालिकेमध्ये आस्थापना अधिक्षक जी माहिती देताहेत. त्याप्रमाणे अश्याप्रकारची डिपार्टमेंटल प्रमोशन कमीटी हि ऑलरेडी स्थापन केलेली असल्यामुळे आपण पुन्हा स्थापन करण्याची आवश्यकता नसावी. फक्त ती हे का करत नाही तरी आपण त्याच्यावर कार्यवाही करू.

**श्री.कैलास सोनवणे :-** साहेब ज्या कर्मचाऱ्यांनी काम केलेल आहे त्यांचा फायदा होवु द्या माझे हेच म्हणणे आहे .

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौर ताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** उज्वलाताई बोला .

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मा.महापौरताई , उपमहापौर सो , तसेच आयुक्त साहेब. हॅलो , हॅलो.

**मा.महापौर :-** उज्वलाताई आवाज येतोय बोला .

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मा.महापौरताई , उपमहापौर सो मला आता पाणी पुरवठ्याचा जो सप्लाय करण्यात आला गिरणा टाकीवरील त्याच्याबाबतीत बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** उज्वलाताई आवाज येतोय बोला .

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ९ तारखेला गिरणाटाकीवरून जो पाणी पुरवठा झाला. तेथे प्रभाग समिती क्रं. ४ चे आपले मिनी कार्यालय आहे. महापालिकेचे अंतर्गत छोटे हे एक कार्यालय असते आणि त्या कार्यालयाची अवस्था अशी आहे कि एकदा महापौरताई , आयुक्त साहेब आणि विरोधी पक्ष नेते यांना मी विनंती करणार आहे की हे जे कार्यालय आहे आज पाऊस असल्यामुळे व मिटींग चालु आहे . तरी आपण उद्या सकाळी त्या ठिकाणी व्हिजीट करावी जे पाणी दुषित झाले आहे. त्या ठिकाणी जे औषध आहेत , पंप आहेत . ते पंप असे आहेत की तिथे वस्तु ठेवायला जागा नाहीये आणि तेथुन जळगांव शहराचा पाणी पुरवठा होतो. अश्या ठिकाणी जर व्यवस्था नसेल तर जळगांव शहरासाठी घातक ठरू शकते. तेथुन ९ तारखेला पाण्यामधुन ऑईलचा पुरवठा झालेला आहे. आयुक्त साहेब मी साळुंखे साहेबांना फोन केला आणि आपले जे. ई आहेत त्यांना सुध्दा फोन केला . पुर्ण पाण्यात ऑईलचा वास येत होता. तरी संपुर्ण पाण्याची टाकी वॉशआऊट करावी आणि पुर्ण साफ केल्यानंतर पाणी पुरवठा १ दिवस लेट झाला तरी चालेल. पण साफ करून पाणी द्याव अशी माझी विनंती आहे. आणि त्याठिकाणी गवत ईतके वाढलेले आहे . प्रभाग समितीचे जे ऑफीस आहे त्या प्रभाग समितीच्या ऑफीस मध्ये आमचे प्रभाग अधिकारी उदय पाटील साहेब यांना पण विनंती केली होती की ते प्रभाग समितीचे कार्यालयच वाटत नाहीये.

**मा.महापौर :-** उज्वलाताई बोला .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौरताई.

**श्री.डि एस . खडके , उपअभियंता :-** उज्वलाताई गिरणा टाकी मध्ये आपले एक पॉवर हाऊस आहे त्याठिकाणी सर्व मशिनरी मधील पंपाचे जे ऑईल असते त्या पंपाचा पाईप लिक झाल व पाण्यामध्ये थोडेफार ऑईल पडले म्हणून त्या अनुषंगाने पाणी पुरवठा हा झालेला होता . त्याच दिवशी आपण ते पाणी मधील ऑईल कव्हर केले व तो पंप दुरूस्त केला व तो पंप संध्याकाळी ओव्हर फ्लो केला आणि ओव्हर फ्लो करून आपण त्याचे मुळे १५ मिनिटे हा पाणी पुरवठा उशिरा केलेला आहे आणि त्या ठिकाणी जे इतर ज्या मशिनरी आहेत. त्याचे स्थलांतर करण्याचे काम सुरू आहे. आणि उद्या आपण ते खाली करून घेवु व ते झाल्यानंतर एमएसईबीला आपण वाघुरपाईप लाईनवर आपण भुमिगत केबल टाकण्यासाठी शट आऊट मागीतलेले आहे त्या शट

आऊट वर आपण वाघुर ची जी पाईपलाईन आहे. त्याच्यावरून ते लिकेज काढले जाईल . तसेच आपला गिरणा टाकीजवळील व्हॉल्व सुध्दा दुरूस्ती करायचा आहे. त्या अनुषंगाने आपण उद्याचा जळगांव शहराचा पाणी पुरवठा शट आऊट जे मागीतलेले आहे मध्ये ते पाणी आपले पुर्णपणे संपेल आणि मग आपण ती टाकी पुर्ण पणे धुवुन स्वच्छ करण्यात येईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आयुक्त साहेब आणि महापौरताई यांनी पण त्याठिकाणी व्हिजीट करा आणि तिथे जी तिसरी टाकी आहे त्या टाकीची काय परिस्थिती आहे ती बघावी . आपले अमृतचे काम सुरू आहे तरी ते काम प्रायोरिटीने जर केले तर ते जळगांवच्या नागरीकांसाठी चांगले राहील

**मा.महापौर :-** उज्वलाताई आम्ही उद्या येतो व्हिजीट करायला.नगरसचिव साहेब आता प्रश्नोत्तराची वेळ संपलेली असल्यामुळे विषय पत्रिकेवरील विषयांचे वाचन करावे.

**श्री.चेतन सनकत :-** महापौर ताई मला काही प्रश्न विचारायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे:-** प्रश्नोत्तरे संपलेले असल्याने विषय पत्रिकेवरील विषयास सुरूवात करण्यात यावी.

**नगरसचिव :-** विषय पत्रिकेवरील विषयांना सुरूवात करण्यात येत आहे. मी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो की त्यांनी कृपया आपले माईक बंद करावेत.

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर ताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** विष्णू भाऊ आवाज येत नाहीये.

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर ताई या प्रश्नोत्तरामध्ये कर्मचाऱ्यांचे जे वेतन निश्चिती करणेबाबतचा प्रस्ताव होता त्या अनुषंगाने मी प्रशासनाचे लक्ष वेधू ईच्छितो . मा.आयुक्त साहेबांनी सांगीतले कि वेतन निश्चिती करणेबाबत या विषयी शासन निर्णयानुसार वेतन निश्चिती करण्यात येईल.तर आता आपले महापालिकेचे उत्पन्नावर याचा काही परिणाम होईल का मी सभागृहाच्या समोर आणु ईच्छितो की आपण मागे एक . . .

**श्री.कैलास सोनवणे:-** प्रश्नोत्तरे संपलेले असल्याने विषय पत्रिकवरील विषयास सुरूवात करण्यात यावी.

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर साहेब याचे उत्तर तरी द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर साहेब माझे बोलणे अधिकृत आहे.

**श्री.नगरसचिव :-** विषय क्रं. ०१

**श्री.सुनिल महाजन :-** प्रश्नोत्तराचा तास आहे काही प्रश्न बाकी आहे आणि प्रश्नोत्तराचा तास कसा संपला .

**श्री.नगरसचिव :-** भाऊ संपलेला आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** आमचे प्रश्न बाकी आहे अजुन

**मा.उपमहापौर :-** आवाज येत नाहीये.

**मा.महापौर :-** प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विष्णू भाऊ, नितीन भाऊ , सुनिलभाऊ आपण पुढच्या मिटींगमध्ये करू चर्चा आता विषयांना सुरूवात करू द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कैलास आप्पा मला माझ्या प्रश्नाचे उत्तर पाहीजेय.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ आयुक्त साहेबांना भेटणार आहात ना तुम्ही त्या विषयावर

**श्री.नितीन लढ्ढा :-** कैलास आप्पा नाही नाही नाही , आयुक्त साहेब माझ्या प्रश्नाच उत्तर देवुन द्या तुम्ही. . .

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर साहेब याचे उत्तर तरी द्या. आयुक्त साहेबांनी याचे उत्तर द्यावे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त साहेब माझ्या प्रश्नाच उत्तर द्या.

**श्री.सुनिल महाजन :-** अजुन आमच्या प्रश्नाच उत्तर बाकी आहे .

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर साहेब आमच्या प्रश्नांचे उत्तर दिल्याशिवाय कसे काय. .

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई माझ्या प्रश्नाचे उत्तर देवु द्या. माझ्या प्रश्नाचे प्रशासनाने अजुन उत्तर दिलेले नाहीये.आप्पा तुमची याच्यावर काय प्रतिक्रीया आहे. महापौर ताई , महापौर ताई प्रशासनाला उत्तर देवु द्याना

**मा.महापौर :-** नितीनभाऊ प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

**प्रशासकीय प्रस्ताव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १)** दिनांक ११/०२/२०२० रोजी संपन्न झालेल्या महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.सचिन पाटील :-** विषय क्र.०१ ला माझे अनुमोदन आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सुचक मी आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, दि.११/०२/२०२० रोजी झालेल्या महासभेचे कार्यवृत्त कायम करणेंस मान्यता प्रदान करणेंत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- पाटील सचिन भिमराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २)** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वा.ह)मध्ये मौजे पिंप्राळा शिवार गट नं.३४०/१ व ३४०/२ या जमिनीवर आरक्षण क्र.७० व ७१ प्रायमरी स्कुल व हायस्कुल क्षेत्र २८७८७.५० चौ.मी. चे भुसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुर्नस्थापना, आणि पुर्नवसन अधिनियम २०१३ अन्वये संपादीत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौरताई मला या विषयावर बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला पोकळे साहेब.

**श्री.दिलीप पोकळे :-** म.न.पा.ची आर्थिक परिस्थिती पाहता टी.डी.आर. देण्यात यावा.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया आज हे जे विषय आहे कमीत कमी १६ कोटीचे हे विषय आहे. तरी पण आपण असे विषय विषयपत्रिकेवर घ्यायलाच नको. जे आपल्या महानगरपालिकेची शाळा आहे त्याच्याकडे आपण लक्ष देत नाही ते बंद पडत आहे आणि शाळेच्या आरक्षणासाठी १५-१६ कोटी खर्च करणे, अप्पा साहेब हे लोकं टी.डी.आर. घेत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब पुढचा विषय घ्या.

**श्री.सुनिल खडके :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २६८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वा.ह)मध्ये मौजे पिंप्राळा शिवार गट नं.३४०/१ व ३४०/२ या जमिनीवर आरक्षण क्र.७० व ७१ प्रायमरी स्कुल व हायस्कुल क्षेत्र २८७८७.५० चौ.मी. चे भुसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुर्नस्थापना, आणि पुर्नवसन अधिनियम २०१३ अन्वये संपादीत करणेबाबत म.प्रा. व न.र.अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक १) श्री.नितेंद्रसिंग कुमारसिंग पाटील, ॲड.श्री.प्रमोद ए. पिसाळ व इतर यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक १) श्री.नितेंद्रसिंग कुमारसिंग पाटील, ॲड.श्री.प्रमोद ए. पिसाळ व इतर यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थितीचा विचार करता आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३)** जळगांव शहर महानगरपालिकेत DAY-NULM च्या बचत गटामार्फत कॅन्टीन सुविधा उपलब्ध करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा. परंतु जळगांव महानगरपालिकेतील कॅन्टीन बचत गटाला देण्यात यावी अशी सुचना आहे की, शाकाहारी, सॉफ्टड्रिंक, अल्पोहाराचे पदार्थ विक्री तसेच दिव्यांग बघीणी जे असतील त्यांनाच प्राधान्य देण्यात यावे असा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**सौ.ज्योती चव्हाण :-** या विषयाला माझा अनुमोदन आहे आणि एक सुचना आहे या बद्दल की, जळगांव शहरातल्याच बचत गटांना प्राधान्य द्यावे आणि महानगरपालिकेची जी इमारत आहे तेथे अग्निशमक दलाने त्याची काळजी घ्यावी. कोणतीही हानी तेथे पोहचली नाही पाहिजे. कारण एल.पी.जी गॅसचा उपयोग तेथे होणार आहे. ही सर्व काळजी घेवुन त्या बचत गटांना प्राधान्य द्यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, महापौर साहेब,

**मा.महापौर :-** बोला आप्पासाहेब,

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्र. ४ ते १३ सारखे आहे. त्यामुळे त्याच्यावर सामुहिक चर्चा व्हावी आणि ज्याला या विषयांवर बालायचे असेल त्यांनी बोलावं.

**श्री.राजेंद्र झिपरु पाटील :-** विषय क्र.४ ते १३ पैकी १० नंबर वगळावा.

**श्री.कुलभुषण पाटील :-** महापौर ताई मला विषय क्र. १० वरती बोलायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोला विषय क्र.१० वर बोला. कुलभुषण पाटील बोलतील.

**श्री.कुलभुषण पाटील :-** अप्पा साहेब, अनुसुचित जाती उपाययोजना अंतर्गत सन २०२०-२१ या योजने अंतर्गत माझ्या वार्ड क्र.१० मध्ये काही कामे प्रस्तावीत करणेचे आहे तसे पत्र मी महापौरांना दिलेले आहे. तरी माझा तो एक विषय त्या सोबतच मंजुर करण्यात यावा ही विनंती आहे महापौर महोदयांना.

**श्री.कैलास सोनवणे :-** मंजुर आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** महापौरताई विषय क्र. १० ते १३ जे आहे त्याच्यावर मला बोलायचे आहे. विषय क्र.१० ते १३ जे आहे त्यात दोन विषय नागरी दलितोत्तर आणि दोन विषय महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान या दोघे हेड मधुन आपले जळगांवचे पालकमंत्री ना.श्री.गुलाबराव पाटील साहेब यांचे माध्यमातुन त्यांचे आदेशातुन यांच्या प्रयत्नांनी विविध विभागात ही निधी विकासासाठी मंजुरी दिलेली आहे. या निधी अंतर्गत ८ नगरसेवकांचे क्षेत्र येत आहे. आणि या निमित्ताने मी श्री.गुलाबराव पाटील यांचा अभिनंदन करतो की, त्यांनी आमचे माजी पालकमंत्री श्री.गिरीष महाजन

**श्री.ईब्राहिम पटेल :-** पक्षीय भेदभाव न करता.

**श्री.भगतराम बालाणी :-** ईबा भाई मधे बोलु नका मी बोलत आहे. माजी पालकमंत्री श्री.गिरीष महाजन यांचे ही धन्यवाद मानतो, मागील ५ वर्षापुर्वी जळगांव शहरामध्ये खान्देश विकास आघाडी असतांना सुध्दा आणि पालकमंत्री श्री.गिरीष भाऊ महाजन असतांना अनेक वाढीव निधी जळगांव शहरासाठी श्री.ललितभाऊ महापौर असतांना त्यांना सर्व प्रशासकीय कामात मंत्रालयातील कामात मदत केली आणि त्यांच्या वतीने ना.श्री.गिरीषभाऊ महाजन आणि आमदार श्री.राजुमामा भोळे यांचे प्रयत्नाने १०० कोटीचा विकास निधी जळगांव शहरासाठी आणला. त्यापैकी ४२ कोटीचे कामं पी.डब्ल्यु.डी. बी.एम.सी. कडुन निविदा काढुन वर्क ऑर्डर तयार असतांना त्यात काही तांत्रिक त्रुटया काढल्या आणि आता मंत्रालयात पडुन आहे. आणि १८ कोटीचे कामे नगरविकास मंत्रालयात पडलेले आहे. इतर ४० कोटीचे कामं एम.जी.पी.ला टेक्नीकल सॅगशनसाठी पडुन आहे. तरी माझी विनंती आहे की, श्री.गुलाबराव पाटील साहेबांनी जो निधी दिलेला आहे. तरी इतर ही १०० कोटीची निधी सुध्दा त्यांचे वजन खर्च करु न मंत्रालयातुन मदत करून शहर विकासासाठी तो निधी ताबडतोब वितरीत करण्याच्या संदर्भात प्रयत्न करावा आणि श्री.नितीनभाऊ लढढा, आमचे शिवसेनेचे गटनेते श्री.अंनत जोशी आम्ही श्री.गुलाबराव पाटलांना विनंती करतो की, त्यांनी ही थांबलेला निधी सुध्दा आपण हा निधी दिला. तसेच कुठलाही पक्षभेद न पाहता शहराच्या नागरीकांशी बांधीलकी म्हणुन आपण ह्या निधीच्या अनुषंगाने थांबलेली १०० कोटीच्या कामांना सुध्दा त्याचा फॉलोअप घेऊन निधी लवकरात लवकर वितरीत करणेसाठी मदत करावी ऐवढी मी मा.ना.श्री.गुलाबराव पाटील यांचेकडुन अपेक्षा ठेवतो.

**नगरसचिव :-** सुनिलभाऊ महाजन मंजुर आहे का ?

**श्री.सुनिल महाजन :-** मंजुर आहे.

**नगरसचिव :-** रियाज भाई आहेत का एम.आय.एम.चे रियाज भाई.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २६९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.अ.यो.राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना अंतर्गत शहरात ९१८ बचत गटांची व ३६ वस्तीस्तर संघाची आणि १ शहर संघाची स्थापना करण्यात आलेली आहे. जळगांव शहर महानगरपालिका कार्यालयात किंवा आवारात कॅन्टीन सुविधा उपलब्ध नाही त्यामुळे आयुक्त, उपायुक्त, लेखा परिक्षक यांचे कडे तसेच इतर विभाग प्रमुखांकडे अनेक प्रतिष्ठीत, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील व्यक्ती, तसेच सन्मा.महापौर, सन्मा.उपमहापौर, सन्मा.स्थायी समिती अध्यक्ष, सन्मा.विरोधी पक्षनेता इत्यादींची कार्यालये महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमध्ये आहेत. अशावेळी कॅन्टीन सुविधा नसल्याने येणाऱ्या पाहुण्यांचे आदरातिथ्य करणे शक्य होत नाही. त्याच प्रमाणे कर्मचारीही चहापाना करीता महानगरपालिकेचे बाहेर जातात त्यात वेळेचा खोळंबा होतो. त्या अनुषंगाने तसेच बचत गटांना रोजगार उपलब्ध होवू शकतो हि बाब लक्षात घेवुन शहर अभियंता व अग्निशमन अधिकारी यांनी सुचित केलेनुसार कार्यवाही करुन जळगांव शहर महानगरपालिका सरदार वल्लभभाई पटेल प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या फोर व्हीलरच्या पार्कींग साठी असलेल्या गाळयांपैकी पूर्व-दक्षिण भागातील जागेत शाकाहारी, सॉफ्टड्रिंक्स अल्पोहाराचे पदार्थ विक्री करणेस DAY-NULM च्या जळगांव शहराच्या बचत गटांना व दिव्यांग बांधवांच्या बचत गटास प्राधान्य देण्याच्या अटीवर कॅन्टीन सुविधा उपलब्ध करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४)** आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत प्रभाग क्र.१० मध्ये गुरुदत्त कॉलनी, श्री.स्वामी समर्थ गल्लीत डॉ.रितेश पाटील यांच्या गल्लीत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.९९९९/- मात्र परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २७० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत प्रभाग क्र.१० मध्ये गुरुदत्त कॉलनी, श्री.स्वामी समर्थ गल्लीत डॉ.रितेश पाटील यांच्या गल्लीत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार सुशिलकुमार गणपत डोंगरे,जळगांव यांची सुरक्षा अनामत पावती क्रं.१४७५० दि.२३/०९/२०१६ अन्वये रक्कम रु.९९९९/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन मनपा खजिन्यात जमा असून सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत दि.०१/०४/२०१७ रोजी पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार सुशिलकुमार गणपत डोंगरे यांची जमा सुरक्षा अनामत परतावा रक्कम रु.९९९९/- मात्र अदा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका लेखासंहिता १९७१ चे कलम १६९ (५) अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- कोल्हे ललित विजय**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५)** मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्रं.२९, ३० अंतर्गत शिरसोली नाक्या पासुन ते मेहरुण महादेव मंदीरा पर्यंतचा रस्ता डांबरी करणे कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.१२,७०५/- मात्र परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २७१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्रं.२९, ३० अंतर्गत शिरसोली नाक्या पासुन ते मेहरुण महादेव मंदीरा पर्यंतचा रस्ता डांबरी करणे कामी मक्तेदार एल.एच.पाटील,जळगांव यांची इसारा अनामत पावती क्रं.०२०२१ दि.१२/०९/२०१४ अन्वये रक्कम रु.१२,७०५/- मात्र इसारा अनामत म्हणुन मनपा खजिन्यात जमा असून सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत दि.२७/०३/२०१५ रोजी पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार एल.एच.पाटील,जळगांव यांची जमा इसारा अनामत परतावा रक्कम रु.१२,७०५/- मात्र अदा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका लेखासंहिता १९७१ चे कलम ४५ अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- कोल्हे ललित विजय**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६)** मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्रं.०८ मध्ये नेहरु चौक पासून ते टॉवर चौका पर्यंत दोन्ही बाजुचा रस्ता रिसर फेसिंग करणे कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.१९,०४५/- मात्र परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २७२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्रं.०८ मध्ये नेहरु चौक पासून ते टॉवर चौका पर्यंत दोन्ही बाजुचा रस्ता रिसर फेसिंग करणे कामी मक्तेदार एल.एच.पाटील,जळगांव यांची इसारा अनामत पावती क्रं.०२०२० दि.१२/०९/२०१४ अन्वये रक्कम रु.१९,०४५/- मात्र इसारा अनामत म्हणुन मनपा खजिन्यात जमा असून सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत दि.०८/११/२०१४ रोजी पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार एल.एच.पाटील,जळगांव यांची जमा इसारा अनामत परतावा रक्कम रु.१९,०४५/- मात्र अदा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका लेखासंहिता १९७१ चे कलम ४५ अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- कोल्हे ललित विजय**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७)** मक्तेदार प्रेम एंटरप्रायजेस,उल्हासनगर यांनी रा.म.क्रं.६ वरील गिरणा पुलापासुन ते लिला पार्क पर्यंत असलेली पथदिव्यांची नादुरुस्त यंत्रणा (पोल,केबल व इतर) दुरुस्त करणे व १ वर्ष कालावधी करीता दैनंदिन देखभाल वगळता वेळोवेळी नादुरुस्त होणाऱ्या यंत्रणेची दुरुस्तीची कामे करणे कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.६९,३५८/- मात्र परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २७३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मक्तेदार प्रेम एंटरप्रायजेस, उल्हासनगर यांनी रा.म.क्रं.६ वरील गिरणा पुलापासुन ते लिला पार्क पर्यंत असलेली पथदिव्यांची नादुरुस्त यंत्रणा (पोल,केबल व इतर) दुरुस्त करणे व १ वर्ष कालावधी करीता दैनंदिन देखभाल वगळता वेळोवेळी नादुरुस्त होणाऱ्या यंत्रणेची दुरुस्ती करण्याच्या कामाचे कार्यादेश पवडी/विदयुत/१०२/०९/१० दि.३१/०३/२०१० अन्वये देण्यात आलेले होते. त्यानूसार मक्तेदार यांनी निविदा अटी व शर्ती प्रमाणे काम पुर्ण केलेले असुन मक्तेदार यांच्या हिले धावते देयकातुन मनपा पावती क्रं.२७२२० दि.०१/०२/२०११ अन्वये रक्कम रु.६९,३५८/- मात्र कपात करण्यात आलेली होती. सदरची रक्कम मनपा खजिन्यात जमा असून सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार प्रेम एंटरप्रायजेस, उल्हासनगर यांची जमा इसारा अनामत परतावा रक्कम रु. ६९,३५८/- मात्र अदा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका लेखासंहिता १९७१ चे कलम ४५ अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- कोल्हे ललित विजय**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८)** मक्तेदार न्यु.आर.के.इलेक्ट्रीकल,जळगांव यांनी आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१५-१६ च्या आमदार गुरुमुख जगवाणी यांच्या निधी अंतर्गत मिनी हायमास्ट पोल उभारुन प्रखर लाईट व्यवस्था करणे कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.४८,४२८/- मात्र परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २७४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मक्तेदार न्यु.आर.के.इलेक्ट्रीकल,जळगांव यांनी आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१५-१६ च्या आमदार गुरुमुख जगवाणी यांच्या निधी अंतर्गत मिनी हायमास्ट पोल उभारुन प्रखर लाईट व्यवस्था करणे कामीचे देयक शाखा अभियंता यांच्यामार्फत तयार करुन अर्थ विभागाकडे पाठविण्यात आले होते. मक्तेदार यांच्या देयकातुन सुरक्षा अनामत पोटी मनपा पावती क्रं.६१६८३ दि.११/०३/२०१६ अन्वये रक्कम रु.४८,४२८/- मात्र कपात करण्यात आलेले होते. सदरची रक्कम मनपा खजिन्यात जमा असून सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार न्यु.आर.के.इलेक्ट्रीकल,जळगांव यांची जमा इसारा अनामत परतावा रक्कम रु.४८,४२८/- मात्र अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- कोल्हे ललित विजय**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ९)** खासदार स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत प्र.क्रं.२९, मधील आदर्श नगर, रुस्तमजी शाळेपासुन ते लॉयन्स हॉल पर्यंत व गणपती नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे, वा.क्रं.२९ प्रभाग क्रं.२९ व ३० स्टेट बँक कॉलनी आदर्श नगर प्लॉट नं.१ ते १३/१ पर्यंतचा रस्ता कॉक्रीटचा तयार करणे व प्रभाग क्रं.३३ त्रिवेणी मंदिर ते अशोक किराणा पर्यंत कॉक्रीटीकरण व पुल बांधणे कामाची इसारा अनामत रक्कम रु.२७,६६४/- मात्र परत करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २७५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, खासदार स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत प्र.क्रं.२९, मधील आदर्श नगर, रुस्तमजी शाळेपासुन ते लॉयन्स हॉल पर्यंत व गणपती नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे, वा.क्रं.२९ प्रभाग क्रं.२९ व ३० स्टेट बँक कॉलनी आदर्श नगर प्लॉट नं.१ ते १३/१ पर्यंतचा रस्ता कॉक्रीटचा तयार करणे व प्रभाग क्रं.३३ त्रिवेणी मंदिर ते अशोक किराणा पर्यंत कॉक्रीटीकरण व पुल बांधणे कामी मक्तेदार श्री गजानन एन्टरप्राईजेस,जळगांव यांची इसारा अनामत (१)पावती क्रं.२९२२४ दि.०२/०५/२०१५ रक्कम रु.९९७३/- मात्र (२) पावती क्रं.२९२२५ दि.०२/०५/२०१५ रक्कम रु.७६९५/- मात्र (३) पावती क्रं.२९२२६ दि.०२/०५/२०१५ रक्कम रु.९९९६/- मात्र अशी एकुण रक्कम रु.२७,६६४/- मात्र इसारा अनामत म्हणुन मनपा अर्थ विभागात जमा आहे.

सदर कामी मक्तेदार यांना दिलेल्या कार्यादेशानूसार मक्तेदार यांनी अ.क्रं.१ व ०२ चे काम दिलेल्या मुदतीत पूर्ण करुन दिलेले आहे. अ.क्रं.०३ चे काम ३१ दिवस उशिरा केलेले असल्याने त्याच्या देय्यकातुन दंड कपात करण्यात आलेला आहे. सदरचे काम पूर्ण होवून ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मनपा खजिन्यात जमा असलेली इसारा अनामत रक्कम रु.२७,६६४/- मात्र मक्तेदार श्री गजानन एन्टरप्राईजेस,जळगांव यांना महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम ४५ नूसार परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- कोल्हे ललित विजय**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १०)** नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत मा.ना.श्री.गुलाबराव पाटील, पालकमंत्री जळगांव जिल्हा यांचे शिफारशी नुसार खालील ०४ कामांकरीता सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता पुनर्विनियोजनाचे कामांना व रक्कम रु.६९,४५,०१३/- मात्रच्या खर्चास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २७६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत मा.ना.श्री.गुलाबराव पाटील, पालकमंत्री जळगांव जिल्हा यांचे शिफारशी नुसार खालील कामांकरीता सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता

पुनर्विनियोजन अंतर्गत रक्कम रुपये ७० लक्ष रक्कमेचे कामे प्रस्तावीत करणे बाबत जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका शाखा जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव यांच्या कडील पत्र क्र.नपा/१/सुजयो/२३८/२०२० दि.२५/०२/२०२० अन्वये सन २०१९-२० या आर्थीक वर्षाकरीता तरतुद करण्यात आली असल्याचे सुचित केलेले आहे. त्यानुसार खालील कामे प्रस्तावीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.१५ मधील महादेव मंदिर जवळील नाल्यावर पुल बांधकाम करणे. | १४,९०,८२२/- |
| २. | प्रभाग क्रं.१५ मध्ये संत गुलाब कॉलनी मधील मागिल रस्त्यावर स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | ९,५८,५२९/- |
| ३. | प्रभाग क्र.१२ जय नगर ते ओंकारेश्वर मंदिर परिसर येथे आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | २४,९५,७४२/- |
| ४. | प्रभाग क्रं.०८ निमखेडी गट नं.१०१ मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे. | १९,९९,९२०/- |
| | एकुण रक्कम रु.:- | ६९,४५,०१३/- |

वर नमुद १ ते ०४ कामांना मान्यता देण्यात येत असून सदरचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभूषण विरभान**

**अनुमोदक :- सोनवणे सुरेश माणिक**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ११)** नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत मा.ना.श्री.गुलाबराव पाटील, पालकमंत्री जळगांव जिल्हा यांचे ०३ कामांकरीता सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता पुनर्विनियोजनाचे कामांना व रक्कम रु.६५,७५,०३३/- मात्रच्या खर्चास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २७७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत मा.ना.श्री.गुलाबराव पाटील, पालकमंत्री जळगांव जिल्हा यांचे शिफारशी नुसार खालील कामांकरीता सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता पुनर्विनियोजन अंतर्गत रक्कम रुपये ६६ लक्ष रक्कमेचे कामे प्रस्तावीत करणे बाबत जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका शाखा जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव यांच्या कडील पत्र क्र.नपा/१/८१/२०२० दि.१६/०३/२०२० अन्वये सन २०१९-२० या आर्थीक वर्षाकरीता तरतुद करण्यात आली असल्याचे सुचित केलेले आहे. त्यानुसार खालील कामे प्रस्तावीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.१५ मधील मधील साईबाबा मंदिरामागील नाल्यास मिल्लत | ४१,९९,२२३/- |

| | | |
|---|---|---|
| | हायस्कुल पर्यंत (पूर्वेस) संरक्षण भिंत बांधणे. | |
| २. | प्रभाग क्रं.१५ मधील त्रिभुणी माता मंदिरालगतच्या पुलास अप्रोच रस्ता बांधणे. | ८,७९,००४/- |
| ३. | प्रभाग क्र.१५ मधील इक्बाल कॉलनी मधील खुल्या जागेस कुंपण भिंत बांधणे. | १४,९६,८०६/- |
| | एकुण रक्कम रु.:- | ६५,७५,०३३/- |

वर नमुद १ ते ०३ कामांना मान्यता देण्यात येत असून सदरचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- कोल्हे ललित विजय**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १२)** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत मा.ना.श्री.गुलाबराव पाटील, पालकमंत्री जळगांव जिल्हा यांचे शिफारशी नुसार खालील ०३ कामांकरीता सन २०१९-२० या आर्थीक वर्षाकरीता पुनर्विनियोजन कामांना व रक्कम रु.७८,८२,७३६/- मात्रच्या खर्चास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २७८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत मा.ना.श्री.गुलाबराव पाटील, पालकमंत्री जळगांव जिल्हा यांचे शिफारशी नुसार खालील कामांकरीता सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता पुनर्विनियोजन अंतर्गत रक्कम रुपये ८० लक्ष रक्कमेचे कामे प्रस्तावीत करणे बाबत जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका शाखा जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव यांच्या कडील पत्र क्र.नपा/१/सुजयो/२३७/२०२० दि.२५/०२/२०२० अन्वये सन २०१९-२० या आर्थीक वर्षाकरीता तरतुद करण्यात आली असल्याचे सुचित केलेले आहे. त्यानुसार खालील कामे प्रस्तावीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.१५ मध्ये या.दे.पाटील शाळेच्या खुल्या जागेपासुन ते महादेव मंदिराच्या पुला पर्यंत दोन्ही बाजुला नाल्याला संरक्षण भिंत बांधकाम करणे. | २९,६४,१६४/- |
| २. | प्रभाग क्रं.१९ मध्ये सर्व्हे क्रं.२७३ मधील नाल्याला क्रॉक्रिट बांधकाम करणे. | २४,३५,०५६/- |
| ३. | प्रभाग क्र.१९ मधील सर्व्हे क्रं.२७३ एम.डी.एस.कॉलनी परीसरातील खुल्या जागेस वॉल कंपाऊंड व पेव्हींग ब्लॉक बसविणे. | २४,८३,५१६/- |

| | | |
|---|---|---|
| | एकुण रक्कम रु.:- | ७८,८२,७३६/- |

वर नमुद १ ते ०३ कामांना मान्यता देण्यात येत असून सदरचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- कोल्हे ललित विजय**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १३)** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत मा.ना.श्री.गुलाबराव पाटील, पालकमंत्री जळगांव जिल्हा यांचे शिफारशी नुसार ०६ कामांकरीता सन २०१९-२० या आर्थीक वर्षाकरीता पुनर्विनियोजन कामांना व रक्कम रु.१,३८,५२,८९४/- मात्रच्या खर्चास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २७९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत मा.ना.श्री.गुलाबराव पाटील, पालकमंत्री जळगांव जिल्हा यांचे शिफारशी नुसार खालील कामांकरीता सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता पुनर्विनियोजन अंतर्गत रक्कम रुपये १.६७ कोटी रक्कमेचे कामे प्रस्तावीत करणे बाबत जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका शाखा जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव यांच्या कडील पत्र क्र.नपा/१/सुजयो/२७६/२०२० दि.१२/०३/२०२० अन्वये सन २०१९-२० या आर्थीक वर्षाकरीता तरतुद करण्यात आली असल्याचे सुचित केलेले आहे. त्यानुसार खालील कामे प्रस्तावीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.०८ निमखेडी गट नं.८६ मध्ये रस्ते सिमेंट क्रॉक्रिट ट्रिमिक्स ने बनविणे. | २६,५८,४१५/- |
| २. | प्रभाग क्रं.०८ मध्ये निमखेडी शिवार गट नं.८४ मध्ये रस्ते सिमेंट क्रॉक्रिट ट्रिमिक्स ने बनविणे. | २२,४३,८०६/- |
| ३. | प्रभाग क्रं.०८ मध्ये निमखेडी गट नं.९० मध्ये परीसरात आर.सी.सी.गटार बनविणे. | १४,७७,३१३/- |
| ४. | प्रभाग क्रं.०८ निमखेडी शिवार गट नं.९२/१, ९२/२ मध्ये रस्ते सिमेंट क्रॉक्रिट ट्रिमिक्स ने बनविणे. | २२,०३,४०६/- |
| ५. | प्रभाग क्रं.०८ निमखेडी शिवार गट नं.८३ मध्ये रस्ते सिमेंट क्रॉक्रिट ट्रिमिक्स ने बनविणे. | १५,९१,८९९/- |
| ६. | प्रभाग क्रं.०८ निमखेडी शिवार गट नं.८४ ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे. | २१,८५,८८४/- |
| ७. | प्रभाग क्रं.०८ निमखेडी शिवार गट नं.८० ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व गट नं.९० मध्ये गटार बांधणे. | १४,९२,१७१/- |
| | एकुण रक्कम रु.:- | १,३८,५२,८९४/- |

वर नमुद १ ते ०७ कामांना मान्यता देण्यात येत असून सदरचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- कोल्हे ललित विजय**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १४)** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत सन २०१९-२० मधील पुनर्विनियोजन मधील ०३ कामांना व रक्कम रु.११,०६,४५०/- मात्रच्या खर्चास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २८० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत सन्मा.सदस्य, श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील यांचे पत्राचे अनुषंगाने त्यांनी सुचविलेले पाईप लाईन टाकणेचे कामांना प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत पत्र दिलेले आहे. या अनुषंगाने सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता पुनर्विनियोजन मधील प्रस्ताव सादर करणे बाबत जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांचे कडील पत्र क्र.नपा/१/सुजयो/२७६/२०२० दि.१२/०३/२०२० अन्वये सन २०१९-२० या आर्थीक वर्षा मधील पुर्नविनियोजन मधील प्रस्ताव सादर करणे बाबत सुचित केलेले आहे. त्यानुसार खालील कामे प्रस्तावीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | पा.पु.विभागा अंतर्गत प्रभाग क्रं.८ शिवम नगर (आव्हाणे गट क्रं.७६५/२/ स.नं.७६५/२/२) या परिसरात पाईप लाईन टाकणे तसेच संत सावतानगर पासून शिवमनगर पर्यंत मुख्य जलवाहीनी टाकणे. | ५,०३,६६७/- |
| २. | पा.पु.विभागा अंतर्गत प्रभाग क्रं.८ गट नं.११८ पै, व्दारकानगर, निमखेडी शिवार या भागात नवीन पीव्हीसी पाईप लाईन टाकणे. | १,८०,९७६/- |
| ३. | पा.पु.विभागा अंतर्गत प्रभाग क्रं.८ (आव्हाणे शिवार स.नं.३७१/१B/१) या परिसरात निमखेडी रस्त्यापासून ते संत सावता नगर पर्यंत १६० मीमी पीव्हीसी पाईप लाईन टाकणे. | ४,२१,८०७/- |
| | एकुण रक्कम रु.:- | ११,०६,४५०/- |

वर नमुद १ ते ०३ कामांना मान्यता देण्यात येत असून सदरचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- कोल्हे ललित विजय**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १५)** जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या बालवाडयामधील शिक्षिका व मदतनिस यांच्या मानधनात वाढ करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**अॅड.सौ.शुचिता हाडा :-** सन्मा.महापौर महोदया प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव मान्य आहे. फक्त प्रशासनाला येथे एक सुचना द्यायची आहे. सदरच्या प्रस्तावाच्या डॉकेटचे अवलोकन केलं असता अस निर्दशनास येत आहे की, महिला बालकल्याण विभागाकडे ५% ची जी तरतुद आहे. त्या तरतुदीतुन हा ४ कोटीचा खर्च करणेत येणार आहे. मानधन वाढी बाबतचा प्रस्ताव असतांना महिला बालकल्याण विभाग यांची महिला बालकल्याण समिती असते. त्यात सभापती सुध्दा

असतात. सदरचा प्रस्ताव हा खर तर असा अपेक्षित होता. त्या समितीपुढे जावुन महासभेपुढे यायला हवा होता. त्या समितीच्या हक्कांना येथे बाधा पोहचविण्यात आलेली आहे. हे प्रशासनाच्या निर्दशनास आणुन द्यायचे आहे. हा अंगनवाडी आणि मदतनीस शिक्षिका यांचा प्रस्ताव आहे. त्यांच्या मानधनात वाढ करणे हे आवश्यक आहे. गेल्या अनेक वर्षापासुन त्यांचा मानधनाचा विषय प्रलंबीत आहे. त्यामुळे प्रशासनाचा हा प्रस्ताव आम्ही मान्य करतच आहोत. मात्र प्रशासनाने जो स्पेसिफीक प्रोटोकॉल पाळला पाहिजे. ते पाळल्याचा दिसुन येत नाही. हे सभागृहाच्या निर्दशनास आणुन देवु इच्छिते. महिला व बालकल्याण समिती सभापतींच्या हक्कांवर ही गदा आणलेली आहे. त्या समिती समोर हा प्रस्ताव जावुन महासभेपुढे येणे अपेक्षित होत. ही प्रशासनाने नोंद घ्यायची आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई, महापौरताई अनुमोदन आहे माझे या विषयाला.

**श्री.सुनिल महाजन :-** १ ते १६ विषयांना मंजुरी द्यावी.

**नगरसचिव :-** आदरणीय सुनिल भाऊ सुनिल भाऊ महाजन.

**मा.महापौर :-** सुनिल भाऊ बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोलले ते बोलले.

**श्री. सुनिल महाजन :-** १ ते १६ विषयांना मंजुरी आहे. १ ते १६ विषयांना मंजुरी आहे.

**नगरसचिव :-** सर्वानुमते.

**श्री.सुनिल महाजन :-** १ ते १६ विषयांना मंजुरी आहे. सर्वानुमते.

**श्री.चेतन सनकत :-** १६ व्या विषयाला मी सुचक आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २८१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या बालवाडयांची संख्या ३० असुन बालवाडी शिक्षिका ३० व मदतनिस २१ आहेत. मराठी माध्यम बालवाडयामधील विदयार्थी संख्या ५३७ तर सेमी इंग्रजी बालवाडयामधील विदयार्थी संख्या ९३७ असे दोन्ही माध्यमांच्या बालवाडयामधील एकुण विदयार्थी संख्या १४७४ इतकी असुन बालवाडयांमधील शिक्षिका व मदतनिस यांनी त्यांचे मानधन वाढीबाबत महिला व बालकल्याण विभागाकडेस विनंती अर्ज केलेले आहेत.

जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या बालवाडयामधील शिक्षिका व मदतनिस यांचे मानधन वाढ होणेकामी महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक - एबावि-२०१८/प्र.क्र.३४३/का-६ दि.१६ ऑगस्ट २०१९ चे शासन निर्णयानुसार प्रतिमहा बालवाडी शिक्षिका यांना रु.८०००/- व मदतनिस यांना रु.४२५०/- प्रमाणे मानधन वाढ करणेस व त्याअनुषंगीक येणाऱ्या वार्षीक जादा रक्कम रु.१३,३०,९००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १६)** मनपा कार्यरत कर्मचारी यांना सण अग्रिम व कर्मचारी अग्रिमामध्ये तसेच खातेप्रमुख अग्रिम या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१९-२० चे सुधारीत आणि सन २०२०-२१ मुळ अंदाजपत्रकाच्या तरतुद मध्ये रक्कम रु.१ कोटीची वाढ करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २८२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका कार्यरत कर्मचारी यांना शासन निर्णय क्रमांक अग्रिम-२०१७/प्र.क्र.१२/२०१७/विनियम दि.१८ मे २०१७ अन्वये ९ महत्वाच्या सणाकरिता वर्षातुन एकदा मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम क्र.१४२ (जे) अनुसार देण्यात येणाऱ्या सण अग्रिमांची रक्कम १००००/- करण्यात आलेली आहे. मागासवर्गीय आयोगाने जळगांव शहर महानगरपालिकेस भेटी दरम्यान झालेल्या बैठकीमध्ये उक्त शासन परिपत्रकान्वये अग्रिम देण्याचे मान्य करण्यांत आलेले आहे. परंतु सन २०१९-२० चे सुधारीत आणि सन २०२०-२१ मुळ अंदाजपत्रकात रक्कम रु.१५ लक्ष मात्रची तरतुद अपुर्ण असुन सर्व कर्मचाऱ्यांना अग्रिम दयावयाचा झाल्यास सदरची तरतुद रक्कम अपुर्ण असुन त्याकरिता सण अग्रिम/कर्मचारी अग्रिम तसेच खातेप्रमुख अग्रिम या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रु.१ कोटी ची तरतुद वाढवीणेस व एकुण तरतुद रक्कम रु.१.१५ लक्ष करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १७)** जळगांव म.न.पा.चे सामुदायीक शौचालयांच्या एकुण १६५५ सिट्सच्या दैनंदिन साफसफाई व देखभालीसाठी ३ वर्ष कालावधीकरीता मक्तेदार नियुक्त करणेकामी ई-निविदा प्रक्रिया करणे व हल्लीचे मक्तेदार मे.नवल वेल्फेअर फाउंडेशन नाशिक यांना ३ महिने (किंवा नवीन मक्तेदार नियुक्ती होईपावेतो) मुदतवाढीच्या कार्योत्तर मंजुरीस व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाला मी सुचक आहे. प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** सुनिल भाऊ, सुनिल भाऊ, आदरणीय सुनिल भाऊ.

**श्री.सुनिल महाजन :-** मंजुर मंजुर

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २८३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीचे सामुदायीक शौचालयांच्या २०८४ सिट्स करीता दैनंदीन साफसफाई व देखभालीचा मे.नवल वेल्फेअर फाउंडेशन नाशिक यांना देण्यात आलेला मक्ता दि.१९/०४/२०२० रोजी संपुष्टात आला आहे. त्यानुसार नवीन मक्तेदार नियुक्तीकामी ई-निविदा प्रक्रीया राविण्याचे प्रस्तावीत आहे. परंतु सदयस्थितीतील कोवीड-१९ या महामारी मुळे लॉकडाऊन असल्याने सदर प्रक्रीया पुर्ण होणेस नियमीत पेक्षा जास्त कालावधी लागणार आहे.

त्यामुळे कर्मचारी अनुपल्बधतेमुळे सामुदायीक शौचालयांच्या दैनंदीन साफसफाई व देखभालीवर परिणाम होऊ नये या अनुषंगाने सदयस्थितीतील मक्तेदार मे.नवल वेल्फेअर फाउंडेशन नाशिक यांना जा.क्र./आ.वि./६४/२०२०-२१ दि.२२/०४/२०२० नुसार ३ महिने किंवा नविन मक्तेदाराची नियुक्ती होईपावेतो मा.महासभेच्या मान्यतेस अधिन राहून आयुक्त यांचे दि.२२/०४/२०२० रोजीच्या मान्यतेने मुदतवाढीचा आदेश देण्यात आलेला आहे. सदरच्या मुदतवाढीस व येणारा खर्च रु.११,९४,१३२/- मात्र अर्थसंकल्पीय तरतुद २०२०-२१ करीता साफसफाई व कंत्राटी वाहनचालक मक्ता या शिर्षकाखाली करणेस तसेच पुरष सिट्स संख्या ७५७ आणि स्त्री सिट्स संख्या ८९८ असे एकुण १६५५ सिट्सच्या दैनंदिन साफसफाई व देखभालीसाठी ३ वर्ष कालावधीकरीता मक्तेदार नियुक्त करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणे व त्याकरीता प्रती सिट प्रती महा रु.२१०/- प्रमाणे मासिक खर्च रु.३,४७,५५०/- असे एकत्रीत तिन वर्ष कालावधी

करीता रक्कम रु.१,२५,११,८००/- मात्रच्या खर्चास अर्थसंकल्पीय तरतुद २०२०-२१ करीता साफसफाई व कंत्राटी वाहनचालक मक्ता या शिर्षकाखाली करणेस तसेच मनपा क्षेत्रातील सार्वजनीक शौचालयांची साफसफाई करणेकामी नियुक्त मक्तेदार यांचा मक्ता दि.१९/०४/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. मात्र लॉकडाऊन च्या पार्श्वभुमीवर यासंबंधिची ई-निविदा प्रक्रीया करणेस जास्त कालावधी (कर्मचारी अनुपलब्धतेमुळे) लागु शकातो. सबब,मक्तेदार यांना यापुर्वी मंजुर केलेल्या दरानेच पुढील ३ महिन्यांसाठी अथवा नविन मक्तेदार नियुक्त होईपावेतो मुदतवाढ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १८)** महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांना दि.३०/०६/२०२० पर्यंत मालमत्ता कराचा भरणा केल्यास चालु आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या रक्कमेवर नियमानुसार **१०%** सुट देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मंजुर मंजुर, चला. मंजुर मंजुर,

**सौ.शुचिता हाडा :-** विषय क्र.१८,१९ आणि २० हे तिघे सारखेच विषय आहे महापौर महोदया,

**मा.महापौर :-** सारखेच आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** प्रशासनाचे १०% रिबीट बद्दलचे हे विषय आहे. तिघेही विषय प्रशासनाचे मंजुर करण्यात येत आहे. फक्त विषय क्र.२० मध्ये एक अशी सुचना आहे की, १५ ऑगस्ट पर्यंत जी प्रशासनाने १०% रिबीटची सुचना केलेली आहे. तर ती ३१ ऑगस्ट २०२० पर्यंत मुदतवाढ देवुन हा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**नगरसचिव :-** सुनिल भाऊ, सुनिल भाऊ

**श्री.सचिन पाटील :-** हॅलो, हॅलो, अनुमोदन आहे. विषय क्र.१८,१९,२० ला अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय सुनिल भाऊ महाजन सर्वानुमते मंजुर आहे का?

**श्री.सचिन पाटील :-** विषय क्र.१८,१९,२० ला अनुमोदन आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** ३१ ऑगस्ट २०२० पर्यंत मुदतवाढीची प्रशासनाने नोंद घ्यायची आहे.

**मा.महापौर :-** सुनिल भाऊ.

**श्री.सचिन पाटील :-** अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोलले ते बोलले.

**श्री.सुनिल महाजन :-** मान्य आहे. प्रशासनाने नियमानुसार मंजुरी द्यावी.

**श्री.दिलीप पोकळे :-** नियमानुसार मंजुरी द्यावी.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ, नितीन भाऊ लढढा.

**श्री.नितीन लढढा :-** हो ताई, मंजुर करण्यात यावा. सर्वानुमते घेण्यात यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** कोरोनाचा विषय आहे. याच्यावर चर्चा व्हावी.

**नगरसचिव :-** नितीन भाऊ, आदरणीय नितीन भाऊ १ ते २० सर्वानुमते मंजुर आहेत ना.

**श्री.नितीन लढढा :-** हो हो सर्वानुमते मंजुर आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २८४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १४० (अ) मध्ये पुढील प्रमाणे नमुद आहे.-

१४० – अ. मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरण्यातून सूट.-

“या अधिनियमांत काहीही अंतुर्भुत असले तरी, मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यत: पात्र असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर, त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापुर्वी भरत असेल किंवा

असा कर, संपुर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर, तिला महानगरपालिका, सर्वसाधारण आदेशाव्दारे निर्धारित करिल अश्या दराने मालमत्ताकर भरण्यातुन सूट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्या वेगवेगळया वर्गाकरिता अशी सुट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील." अशी तरतुद आहे.

त्याअनुशंगाने जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव म.स्थायी समिती ठराव क्र.२१७ दि.१८/०२/२०१५ व महासभा ठराव क्र.२०९ दि.२४/०३/२०१५ अन्वये एप्रिल महिन्यात मालमत्ताकराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकतधारकांस १०% सुट देणेबाबत मान्यता दिलेली असुन सदर ठरावांची अंमलबजावणी सुरु आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात माहे एप्रिल २०१९ मध्ये १०%सूट घेवुन भरणा केलेल्या मिळकतधारकांची तपशिलवार माहिती खालिल तक्त्यात नमुद केलेली आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्र. | एप्रिल महिन्यात १०% सुट घेतलेल्या मिळकत धारकांची संख्या | एकुण वसुल रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | १ | ५६५१ | ३५१३३४२९ |
| २ | २ | २६९६ | १४०५५०४३ |
| ३ | ३ | ३५६२ | २२९४१५४४ |
| ४ | ४ | ५३१६ | २९००१२८६ |
| | एकुण | १७२२५ | १०११३१३०२ |

उक्त प्रमाणे माहे एप्रिल २०१९ मध्ये एकुण १०११३१३०२/- इतक्या रक्कमेचा भरणा मालमत्ता करापोटी झालेला आहे.

आता चालु आर्थिक वर्षात covid -१९ (कोरोना) या आजाराचा होणारा फैलाव रोखण्यासाठी केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने दि.२४/०३/२०२० पासुन लॉकडाऊन घोषीत केलेले आहे. उक्त नमुद तक्त्यात एप्रिल महिन्यात १०% सुटचा लाभ घेणाऱ्या मिळकतधारकांच्या संख्येचा विचार करता प्रत्येक प्रभाग समिती कार्यालयात एका दिवसांत सरासरी १४३ लोक भरणा करण्यासाठी येतात. मात्र चालु वर्षी एप्रिल महिन्यात जमावबंदी लागु असल्याने व मालमत्ताकर भरण्यासाठी होणारी गर्दी टाळण्यासाठी मालमत्ता कराचा भराणा स्विकारण्यात आलेला नाही. तथापि, सदर परिस्थितीचा विचार करता मालमत्ता कराचा व पाणीपट्टी कराचा भरणा करण्यासाठी होणारी गर्दी टाळण्यासाठी चालु आर्थिक वर्षासाठी मालमत्ता करात १०% सुटसह दि.३०/०६/२०२० पर्यत १) online पध्दतीने २)धनादेश (Chaque) व्दारे १०% सुट देवुन भरणा स्विकारणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० (अ) मधील तरतुदीनुसार कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- पाटील सचिन भिमराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १९)** महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांना दि.३१/०७/२०२० पर्यंत मालमत्ता कराचा भरणा केल्यास चालु आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या रक्कमेवर नियमानुसार १०**%** सुट देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २८५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांना दरवर्षी प्रमाणे एप्रिल महिन्यात मालमत्ताकराचा आगाऊ भरणा केल्यास थकबाकीची व शासकिय कराची रक्कम वगळून उर्वरित रक्कमेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १४० (अ) व त्याअनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव स्थायी समिती ठराव क्र.२१७ दि.१८/०२/२०१५ व महासभा ठराव क्र.२०९ दि.२४/०३/२०१५ अन्वये एप्रिल महिन्यात मालमत्ताकराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकतधारकांस १०% सुट देणेबाबत मान्यता दिलेली असुन त्यानुसार १०% इतकी सुट देण्यात येते.

परंतु चालु आर्थिक वर्ष covid -१९ (कोरोना) या आजाराचा होणारा फैलाव रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाव्दारे दि.२४/०३/२०२० पासुन लॉकडाऊन घोषीत केलेले आहे. त्याअन्वये जमावबंदीचे नियम लागु असल्यामुळे मालमत्ताकर भरण्यासाठी होणारी गर्दी टाळण्यासाठी मालमत्ता कराचा भराणा स्विकारण्यात आलेला नव्हता, तथापि, सदर परिस्थितीचा विचार करता मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी होणारी गर्दी टाळण्यासाठी चालु आर्थिक वर्षासाठी मालमत्ता करात १०% सुटसह दि.३०/०६/२०२० पर्यंत १) online पध्दतीने महानगरपालिकेच्या https://www.jalgaonmc या लिंकवर, २) धनादेश (Chaque) व्दारे १०% सुट देवुन भरणा स्विकारणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली. असून आता स्थायी समिती सभापती, सन्मा.ॲड.सौ.शुचिता हाडा यांचे पत्र जा.क्र./जशमनपा/सस्थास/१९१, दि.१५/०६/२०२० चे अनुषंगाने दि.०१/०७/२०२० ते दि.३१/०७/२०२० पर्यंत १) रोखीने भरणा, २) online व्दारे, ३) धनादेश (Chaque) व्दारे भरणा स्विकारणेस व सदर कालावधीत मालमत्ता कर व पाणीपट्टी कराचा भरणा करणाऱ्या नागरीकांना १०% सुटचा लाभ देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० (अ) मधील तरतुदीनुसार कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- पाटील सचिन भिमराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २०)** महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांना दि.१५/०८/२०२० पर्यंत मालमत्ता कराचा भरणा केल्यास चालु आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या रक्कमेवर नियमानुसार **१०%** सुट देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २८६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांना दरवर्षी प्रमाणे एप्रिल महिन्यात मालमत्ताकराचा आगाऊ भरणा केल्यास थकबाकीची व शासकिय कराची रक्कम वगळून उर्वरित रक्कमेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १४० (अ) व त्याअनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव स्थायी समिती ठराव क्र.२१७ दि.१८/०२/२०१५ व महासभा ठराव क्र.२०९ दि.२४/०३/२०१५ अन्वये एप्रिल महिन्यात मालमत्ताकराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकतधारकांस १०% सुट देणेबाबत मान्यता दिलेली असुन त्यानुसार १०% इतकी सुट देण्यात येते.

परंतु चालु आर्थिक वर्ष covid -१९ (कोरोना) या आजाराचा होणारा फैलाव रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाव्दारे दि.२४/०३/२०२० पासुन लॉकडाऊन घोषीत केलेले आहे. त्याअन्वये जमावबंदीचे नियम लागु असल्यामुळे मालमत्ताकर भरण्यासाठी होणारी गर्दी टाळण्यासाठी मालमत्ता कराचा भराणा स्विकारण्यात आलेला नव्हता, तथापि, सदय परिस्थितीचा विचार करता मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी होणारी गर्दी टाळण्यासाठी चालु आर्थिक वर्षासाठी मालमत्ता करात १०% सुटसह दि.३०/०६/२०२० पर्यत १) online पध्दतीने महानगरपालिकेच्या https://www.jalgaonmc या लिंकवर, २) धनादेश (Chaque) व्दारे १०% सुट देवुन भरणा स्विकारणेस मान्यता प्रदान

करण्यात आलेली आहे तसेच स्थायी समिती सभापती, सन्मा.अॅड.सौ.शुचिता हाडा यांचे पत्र जा.क्र./जशमनपा/सस्थास/१९१, दि.१५/०६/२०२० चे अनुषंगाने दि.०१/०७/२०२० ते दि.३१/०७/२०२० पर्यंत १) रोखीने भरणा, २) online व्दारे, ३) धनादेश (Chaque) व्दारे स्विकारणेस व सदर कालावधीत मालमत्ता कर व पाणीपट्टी कराचा भरणा करणाऱ्या नागरीकांना १०% सुटचा लाभ देणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली असून आता पुनश्च: मा.सभापती, स्थायी समिती यांनी पत्राव्दारे जनता कर्फ्युअंतर्गत लॉकडॉऊन असल्याने काही नागरिकांना कराचा भरणा करता आला नाही, करिता दि.०१/०८/२०२० ते दि.३१/०८/२०२० अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० (अ) मधील तरतूदीनुसार मालमत्ता कराचा रोखीने/चेकव्दारे/ ऑनलाईन पध्दतीने भरणा करणाऱ्या नागरीकांना चालु आर्थिक वर्षाच्या रक्कमेवर १०% सुटचा लाभ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- अॅड हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- पाटील सचिन भिमराव**

**अशासकीय प्रस्ताव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २१)** खोटेनगर बस स्टॉप समोरील चौकाला “आदरणीय तीर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी” असे नांव देणेबाबत सन्मा.सदस्य डॉ.श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** प्रस्ताव मान्य , प्रस्ताव मान्य.

**श्री.सुनिल महाजन :-** प्रशासनाने या पुर्वी नाव दिलेले आहे की नाही याची तपासणी करुन मान्यता द्यावी.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** नाव दिलेले नाही प्रस्ताव मान्य. प्रस्ताव मंजुर करावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** दोघी मान्य.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** विषय क्र.२१ आणि २२ खात्री करुन प्रस्ताव मान्य करावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २८७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, खोटेनगर बस स्टॉप समोरील चौकाला “आदरणीय तीर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी” असे नांव देणेसंदर्भात परिसरातील नागरिकांचे १ हजार सहयांचे निवेदन प्राप्त झाले आहे.

“आदरणीय तीर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी” प्रतिष्ठानामार्फत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात व “आदरणीय तीर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी” यांच्या विचाराने प्रेरित असलेला मोठा वर्ग या परिसरात राहात असल्याने खोटेनगर बस स्टॉप समोरील चौकाला “आदरणीय तीर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी” असे नांव देणेस प्रतिष्ठानामार्फत स्व:खर्चाने चौक सुशोभिकरण व देखभाल करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर चौकास यापुर्वी कोणाचेही नाव दिले गेले नसलेबाबत खात्री करुन घ्यावी व सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**अनुमोदक :- भोईटे लताबाई रणजित**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २२)** हिरागौरी पार्क खोटे नगर परिसर निमखेडी शिवार येथे होत असलेल्या बगिच्याला "आदरणीय तीर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी" असे नांव देणेबाबत सन्मा.सदस्य डॉ.श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्रं.२१ आणि २२ झाला आहे. २३ वा घ्या.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** प्रस्ताव मान्य करावा.

**श्री.सुनिल महाजन :-** मंजुर मंजुर.

**श्री.चेतन सनकत :-** खात्री करुन प्रस्ताव मान्य करावा.

**नगरसचिव :-** सुनिल भाऊ आदरणीय सुनिल भाऊ.

**श्री.सुनिल महाजन :-** अगोदर नामकरण न झाल्याची खात्री करून प्रशासनाने मंजुरी द्यावी.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** कुठलेही नाव देण्यात आलेले नाही. प्रस्ताव मंजुर करावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २८८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.८ मध्ये नविन बगिचा तयार होत आहे त्या बगिच्याला "आदरणीय तीर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी" असे नांव देण्यात यावे अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केलेली असुन "आदरणीय तीर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी" प्रतिष्ठाण मार्फत अनेक कामे सुरु आहे. जसे की वृक्ष लागवड, वृक्ष संर्वधन, स्वच्छता अभियान, विहीर पुर्नभरण, बगिचे स्वच्छता मोहिम, सरकारी कार्यालय स्वच्छता मोहिम, बस स्थानक रेल्वे स्टेशन स्वच्छता मोहिम, गणेश उत्सवा दरम्यान निर्माल्य संकलनातुन सेंद्रीय खत तयार करणे, जेष्ठ नागरीकांसाठी वयाचे दाखले देणे, व्यसन मुक्ती, बाल संस्कार मार्गदर्शन व बैठकीच्या माध्यमातुन अनेक समाजपयोगी कार्य अखंडपणे सुरु आहे.

"आदरणीय तीर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी" प्रतिष्ठानामार्फत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जात असल्याने हिरागौरी पार्क खोटे नगर परिसर निमखेडी शिवार येथे होत असलेल्या नविन बगिच्याला "आदरणीय तीर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी" असे नांव देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे सदर बगिच्याची स्वच्छता व देखभाल करण्याची जबाबदारी प्रतिष्ठानामार्फत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर बगिच्याला यापुर्वी कोणाचेही नाव दिले गेले नसलेबाबत खात्री करुन घ्यावी सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**अनुमोदक :- पाटील विजय पुंडलिक**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २३)** केशर बाग गट नं.२७०२/अ मधील खुला भुखंड क्षेत्रफळ ९७७.०३ चौ.मी. विकसीत करावयास व सामुहिक कार्यासाठी मिळणेबाबत सन्मा.सदस्य श्री.दिलीप बबनराव पोकळे व अध्यक्ष, योगीराज श्री गजानन महाराज बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.दिलीप पोकळे :-** सदर प्लॉट धारकांनी संमती दिली असल्याने प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.नितीन लढढा :-** सुचक कोण आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** मी सुचक आहे.

**नगरसचिव :-** सुनिल भाऊ, सुनिल भाऊ .

**श्री.सुनिल महाजन :-** मान्यता देण्यात यावी.

**नगरसचिव :-** सर्वानुमते मंजुर का ?

**श्री.सुनिल महाजन :-** मंजुर मंजुर .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २८९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, योगीराज श्री गजानन महाराज बहुउद्देशिय संस्था,जळगांव या संस्थेचे भविष्यातील मानस लक्षात घेता व विविध समाजपयोगी कार्यक्रमात जनमानसांचा सहभाग पाहता केशर बाग गट नं.२७०२/अ मधील ९७७.०३ चौ.मी. खुला भुखंडाचा विकास करणे, विविध सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आरोग्य विषयक, क्रिडा विषयक, शेती विषयक, वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, रक्त / नेत्र तपासणी, रक्तदान, नेत्रदान तथा अन्य उपक्रम राबविण्याच्या दृष्टीकोनातून सदरचा गट नं.२७०२/अ मधील ९७७.०३ चौ.मी. खुला भुखंड विकसित करणेसाठी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली गेली नसलेबाबत खात्री करुन घेऊन सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- जोहरे प्रिया मधुकर**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २४)** ओपन स्पेस जागा गट नं.३३८/१/२/पै/प्लॉट नं.४ व ५ मधील शिल्लक असलेली व रोडला लागुन असलेली जागा संस्थेस मिळणेबाबत सन्मा.सदस्य श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे व सचिव, श्री.गणेश क्रिडा सांस्कृतीक, सामाजिक व शैक्षणिक संस्था, जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.दिलीप पोकळे :-** प्रस्ताव नामंजुर.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** नवनाथ भाऊंनी दिलेला प्रस्ताव नामंजुर का करण्यात येत आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** त्याच्यामध्ये कायदेशीर अडचण आहे. कायदेशीर अडचण, कायदेशीर त्रुट्या असल्या कारणाने सदरचा प्रस्ताव नामंजुर करण्यात यावा.

**श्री.नितीन लढढा :-** महापौरताई सगळया ओपनस्पेसच्या संदर्भातला जो विषय आहे ना प्रशासनाने सुप्रिम कोर्टाचे जे निर्देश आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** १९९६ मधील जे आहेत.

**श्री.नितीन लढढा :-** १९९६ चे जे निर्देश आहे .त्याचे तंतोतंत पालन करु न त्याच्या संदर्भात कुठेही कायद्याचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**श्री.भगतराम बालाणी :-** नितीन भाऊच्या मताशी आम्ही सर्व सहमत आहोत.

**नगरसचिव :-** नितीन भाऊ, आदरणीय नितीन भाऊ. सर्वानुमते नामंजुर आहे का ?

**श्री.नितीन लढढा :-** सर्वानुमते करा, हो, परंतु सुप्रिम कोर्टाच्या निर्देशांचे १००% पालन व्हायला पाहिजे, त्याचे कुठेही उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी.

**श्री.भगतराम बालाणी :-** पुढचा विषय घ्या, महापौरताई.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २९० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, ओपन स्पेस जागा गट नं.३३८/१/२/पै/प्लॉट नं.४ व ५ मधील शिल्लक असलेली व रोडला लागुन असलेली जागा संस्थेस मिळणेबाबत सन्मा.सदस्य श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे व सचिव, श्री.गणेश क्रिडा सांस्कृतीक, सामाजिक व शैक्षणिक संस्था, जळगांव यांनी दिलेला प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**
**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २५)** जळगांव मनपा हद्दीतील गट नं.२९,३० संत मुक्ताईनगर कॉलेज जवळील किंवा गट नं.२९० भोईटे नगर मधील म.न.पा.ची ओपन स्पेस म्हणून राखीव असलेली जागा राजपूत समाजाला मिळणेबाबत मा.सभापती,स्थायी समिती,अड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा व अध्यक्ष,क्षत्रिय राजपूत समाज बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.शुचिता हाडा :-** मा.महापौरताई, जळगांव म.न.पा. गट नं. २९,३० किंवा भोईटे नगर गट नं.२९० या जागा देण्यात येऊ नये. तर त्या ऐवजी पिंप्राळा गट नं.३४ एस.एम.आय.टी कॉलेज जवळची खुली जागा ही देण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-** अनुमोदक, अनुमोदक भाऊ आदरणीय भाऊ,

**श्री.नितीन लढढा :-** सुचना मान्य करण्यात यावी ,परंतु मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा कुठेही अवमान होणार नाही याची काळजी घ्यावी.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २९१ पारित करण्यात आला.**

जळगांव मनपा हद्दीतील गट नं.२९,३० संत मुक्ताईनगर कॉलेज जवळील किंवा गट नं.२९० भोईटे नगर मधील म.न.पा.ची ओपन स्पेस म्हणून राखीव असलेली जागा राजपूत समाजाला मिळणेबाबत मा.सभापती,स्थायी समिती, ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा व अध्यक्ष, क्षत्रिय राजपूत समाज बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांनी दिलेल्या पत्राचे वाचन केले.

असा ठराव करण्यात येतो की, क्षत्रिय राजपूत समाज बहुउद्देशिय संस्था,जळगांव या संस्थेला सामाजिक कार्यासाठी जळगांव मनपा हद्दीतील गट नं.२९,३० संत मुक्ताईनगर कॉलेज जवळील किंवा गट नं.२९० भोईटे नगर मधील म.न.पा.ची ओपन स्पेस म्हणून राखीव असलेली जागा देण्यात येवू नये. त्याऐवजी सदर संस्थेला पिंप्राळा शिवार गट नं. ३४ एस.एम.आय.टी.कॉलेज जवळील खुली जागा देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली गेली नसलेबाबत खात्री करुन घेऊन सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- ॲड हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २६)** भोईटे नगरला लागून असलेला रेल्वे मार्गावरील मालधक्का आरोग्यास अपायकारक असल्याने सदरचा मालधक्का शहराबाहेर हलविणेबाबत मा.उपमहापौर डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.उपमहापौर :-** सन्मा.महापौर, आयुक्त साहेब आणि सन्मा.सर्व सदस्य सदरील हा मालधक्का भोईटे नगर परिसराला लागुन आहे आणि भोईटे नगर हा अतिशय दाटवस्तीचा परिसर असल्यामुळे तसेच प्रेमनगर, मुक्ताईनगर, म्हाडा कॉलनी आणि दुसऱ्या बाजुने दुध फेडरेशन असा दाटवस्तीचा परिसर असल्यामुळे या ठिकाणी नेहमी धान्यांचे पोते, सिमेंटच्या गोण्या असतील इत्यादी गोण्यांची नेहमीच लोडींग आणि अनलोडींग होत असते. त्या परिसरात धान्यांच्या पोत्यांमुळे चिलटयांचे प्रमाण वाढलेले आहे. सिमेंटच्या गोण्यांचा लोडींग अनलोडींग होत असतांना धुराळा उडत असतो आणि त्यामुळे त्या परिसरातील अनेक लोकांना वेगवेगळया आजारांना तोंड द्याव लागत आहे. अनेक वर्षापासुन त्यांची तक्रार

होती. त्या तक्रारीला अनुसरुन हा विषय महासभेत घेतलेला आहे आणि सदरील मालधक्क्याला माजी मंत्री आणि आमदार श्री.गिरीषभाऊ महाजन स्वत: दिल्लीला गेले आणि पर्यावरण मंत्रालयाकडुन त्यांनी परवानगी मिळवुन आणलेली आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो आणि ठराव मांडतो की, भाईटे नगरला लागुन असलेला हो मालधक्का शहराबाहेर हलविण्यात यावा.

**श्री.भगतराम बालाणी :-** अश्विनभाऊ, खासदार श्री.उन्मेशभाऊ पण बरोबर होते.

**श्री.नितीन लढढा :-** मंजुर मंजुर.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** प्रभाग क्र.०८ च्या वतीने मा.श्री.गिरीषभाऊंचे आभार.

**श्री.सुनिल महाजन :-** मा.उपमहापौर साहेबांनी पटलावर ठेवलेला विषय मंजुर झालेला आहे. त्यांचे खुप खुप अभिनंदन.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.गिरीष भाऊ दिल्लीला जाऊन ते विषय मंजुर करून आणत आहे त्यात आपल मोठ श्रेय आहे. अभिनंदन आपले.

**श्री.चेतन सनकत :-** खासदार साहेबही सोबत होते उन्मेशदादा.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** मा.गिरीष भाऊ आणि खासदार उन्मेशदादा यांचे आभार प्रभाग क्र.०८ च्या वतीने.

**मा.उपमहापौर :-** सुनिल भाऊ तुमचं मत सांगा.

**श्री.सुनिल महाजन :-** मान्य मान्य.

**श्री.नितीन लढढा :-** मा.उपमहापौरांच्या विषयाला आम्ही कसे अनुमोदन देणार नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २९२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील भोईटे नगरला लागुन असलेला रेल्वे मालधक्का हा भोईटेनगर, दूध फेडरेशन वस्ती, म्हाडा कॉलनी, भिकमचंद जैन नगर, इत्यादी परीसरातील नागरीकांना अनेक वर्षापासून त्रासदायक ठरत आहे. (१) या मालधक्क्यावर विविध प्रकारच्या धान्याच्या पोत्यांची तसेच, खते, सिमेंट इत्यादीच्या गोन्यांची नेहमीच लोडींग-अनलोडींग करण्यात येत असते, यामुळे परीसरात सतत धुराळा उडत असतो, (२) धान्य इत्यादीमुळे वारंवार चिलटयाचा परीसरात त्रास उद्भवत असतो. (३) काही केमिकल युक्त धुराळयामूळे डोळयांचे त्रास उद्भभवत असतात. (४) त्याचबरोबर आणखी महत्वाचे म्हणजे रेल्वेतील लोड-अनलोड करावयाचे धान्य, खते, सिमेंट इत्यादीची वाहतुक करण्यासाठी दररोज साधारणत: ५०० ते ६०० वा त्यापेक्षा जास्त मालगाडया, ट्रक्स या भागातुन वेगाने जा-ये करीत असतात. वाहनांचे कर्कश हॉर्न, खडखडाटाच्या आवाजाला लोक वैतागले आहेत. रहीवास परीसरातून जाण्याऱ्या या रस्त्यांवर जड वाहनांची ये-जा वाढलेली आहे. त्यामुळे अपघात घडण्याची भिती आहे. रिंगरोड वर जड वाहनांना प्रवेश बंदीचा ठराव पारीत झालेला असतांनाही वाहतुक सुरु आहे.

करीता जळगांव शहरातील भोईटे नगरला लागुन असलेला रेल्वे मालधक्का हा दाट लोक वस्तीच्या परिसराला लागून असून सदर मालधक्क्यामूळे तेथील रहिवाशांना विविध त्रासांना तोंड द्यावे लागत असल्याने सदरहू रेल्वे मालधक्का शहराबाहेर हलविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे व सदर मालधक्का इतरत्र हलविण्या संबंधी रेल्वे विभाग व अन्य संबंधीत विभागांशी पत्र व्यवहार करणेस सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे अश्विन शांताराम**

**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २७)** श्री.राहुल लक्ष्मीनारायण वर्मा यांना गणेश कॉलनी रोड साईबाबा मंदीरा शेजारी विकास दुध केंद्र चालविणेस परवानगी मिळणेबाबत श्री.वि.पां.पाटील, मॅनेजर, जळगांव जिल्हा कृषि औदयोगीक सर्व सेवा सहकारी संस्था मर्यादित (विसनजीनगर) जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.महेश चौधरी :-** महापौरताई मला बोलायचे आहे या विषयावर.

**मा.महापौर :-** बोला बोला.

**श्री.महेश चौधरी :-** ताई, साईबाबा मंदिराच्या जवळच परवानगी न देता त्याला फक्त परवानगी देतांना साईबाबा मंदिराच्या समोरच्या बाजुला द्यावी.

**सरिता नेरकर :-** हॅलो, हॅलो.

**मा.महापौर :-** सरिताताई बोला.

**सरिता नेरकर :-** महापौरताई, श्री.राहुल वर्मा यांनी सुचित केलेल्या जागेच्या बद्दल तसेच श्री.खेमचंद दिनकर पाटील, वर्धमान हाईटस समोरील जागा दुध बुथसाठी केंद्र मान्यता द्यावी.

**नगरसचिव :-** अनुमोदक कोण आहे ?

**सौ.ज्योती चव्हाण :-** अनुमोदन आहे माझं या विषयाला.

**नगरसचिव :-** सर्वानुमते आहे का ?

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौरताई फक्त एवढंच आहे की, मुख्य रस्त्यांना लागुन परवानगी देवु नये. कारण मध्ये आता डिव्हायडर टाकल्यामुळे वाहतुकीची कोंडी होईल. मुख्य रस्त्यांना सोडुन परवानगी द्यावी.

**श्री.महेश चौधरी :-** समोरच्या बाजुला जागा आहे नितीन भाऊ मोठी

**श्री.नितीन लढढा :-** तर काही अडचण नाही ना. वाहतुकीला अडचण होणार नाही फक्त याची काळजी घ्यावी.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई, महापौरताई, महापौरताई, आमचा एक विषय बाकी आहे. जळगांव शहराचे बाकीचे दुध बुथचे जे विषय आलेले आहे ते घेऊन टाकु ना.

**नगरसचिव :-** सर्व आदरणीय सदस्यांना विनंती करतो की, कृपयाकरुन सर्वांनी आपले माईक बंद करावे आवाज येत नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २९३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.राहुल लक्ष्मीनारायण वर्मा यांना गणेश कॉलनी रोड साईबाबा मंदीरा शेजारी विकास दुध केंद्र चालविणेस परवानगी मिळणेबाबत श्री.वि.पां.पाटील, मॅनेजर, जळगांव जिल्हा कृषि औदयोगीक सर्व सेवा सहकारी संस्था मर्यादित (विसनजीनगर) जळगांव यांनी दिलेल्या पत्राचे अनुषंगाने १)श्री.राहुल वर्मा यांनी सुचित केलेल्या जागेत बदल करुन त्यांना इतरत्र जागा देणेस तसेच महापौर यांचेकडेस नागरीकांच्या आलेल्या मागणी अर्जानूसार २) श्री.खेमचंद दिनकर पाटील यांना वर्धमान हाईटस समोरील जागेत, ३) श्री.हेमंत लक्षमण मोरे यांना रामानंद उतरतीवर दत्त मंदीराजवळ, ४) श्री.ज्ञानेश्वर रामचंद्र सोनार यांना कोल्हे नगर शंभर फुटी रोड येथे, ५) श्री.सागर सुनिल पवार यांना वैभव साडी समोर व मनपा जुनी नगरपालिकेच्या जागेवरिल पार्कीगच्या मागील बाजूस तसेच ६) सौ.लताबाई निंबा पाटील (हॅण्डीकॅप) यांना महाबळ रोड मायादेवी मंदीराच्या बाजूला मनपाच्या मोकळया जागेत दुध बुथ केंद्र सुरु करणेस खालील अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे. यापूर्वी दुध विकास केंद्र चालविणेस महासभा ठराव क्रं.२५२ दि.११/०२/२०२० मध्ये नमूद केल्याप्रमाणे अटी-शर्ती सदर दुध बुथ धारकांना सुध्दा लागू राहतील.

**<u>अटी-शर्ती :,</u>**

१) दुध बुथ केंद्रामध्ये दुध व दुधजन्य पदार्थ, बिस्कीट,खारी, टोस्ट व पाणी बोटल विक्रीस ठेवता येतील त्या व्यतिरिक्त तंबाखू, गुटका, सिगारेट तसेच अंमली पदार्थ व इतर पदार्थ आढळल्यास मुदतवाढ रद्द करण्यात येईल.

२) दुध बुथ केंद्रधारकाने दुध बुथ केंद्रापासुन कोणत्याही प्रकारे रहदारीस अडचण निर्माण होणार नाही या बाबतचे प्रमाणपत्र शहर वाहतुक विभागाकडून प्राप्त करुन म.न.पा.कडेस देणे बंधनकारक राहिल.

३) उपरोक्त ६ नमुद विकास दुध बुथ धारकांना ३ वर्षासाठी परवानगी देण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- नेरकर सरिता अनंत**

**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २८)** नैसर्गिक आपत्ती कोविड १९ च्या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील रहिवास क्षेत्राच्या नागरीकांना ५० टक्के घरपट्टी कर माफ होणे बाबत सन्मा.सदस्य,श्री.सचिन भिमराव पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सचिन पाटील :-** जळगांव शहरात कोविड-१९ ची महामारी सुरु असल्यामुळे सर्वत्र सुमारे ४ ते ५ महिन्यापासुन लॉकडाऊन सुरु असल्यामुळे शहरातील सर्व उद्योग धंदे बंद असल्यामुळे नागरीकांच्या उत्पन्नात घट झालेली आहे. करीता महाराष्ट्र शासनाने मालमत्ता करात ५० टक्के सुट द्यावी व त्याबद्दल मनपास अनुदान द्यावे. तसेच प्रशासनाने प्रस्ताव तयार करुन सदर अनुदान प्राप्त झाल्यानंतर मालमत्ता करात सुट देण्याची कार्यवाही करावी. या संबंधीत प्रस्तावा करीता आमचे सन्मा. मित्र शिवसेनेचे नगरसेवक श्री. प्रशांतभाऊ नाईक तसेच समाजातील विविध स्तरावरील संघटना यांनी देखील मागणी केलेली आहे. या सर्व दृष्टीने आपल्या महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पंडीत दिनदयाल उपाध्याय या सर्वांचे जे धोरण होते की समाजातील लहानातला लहान घटकांचे हित जोपासले गेले पाहिजे. त्यांची आर्थिक स्थिती सुधारली गेली पाहिजे. आपण याच्यावर सर्वानुमते निर्णय घ्यावा. याबाबत मी सुचना देत आहे.

**नगरसचिव :-** अनुमोदक कोण आहे ?

**मा.उपमहापौर :-** नवनाथ दारकुंडे, नवनाथ भाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** अश्विनभाऊंनी दिलेल्या महापौरांनी व त्या अनुषंगाने श्री.सचिन पाटीलांनी दिलेल्या सुचना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ऐकु येत नाही विष्णु भाऊ व्यवस्थीत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** उपसुचना म्हणुन एक पत्र दिलेलं आहे महापौर महोदयांना.

**मा.महापौर :-** समजत नाही तुमच बोलणं विष्णु भाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ताई पत्र दिलेलं आहे आपल्याला.

**मा.महापौर :-** हो हो हो.

**श्री.विष्णु भंगाळे :-** तर माझेही त्याच्यात शिवसेनेतर्फे उपसुचना त्याच्यामध्ये ॲड करावी. वरील जे सचिन पाटीलांनी जी भुमिका मांडली. त्यात काही आम्ही एक थोडं मत ॲड करु इच्छितो की, घरपट्टी जी आहे रहिवास क्षेत्रातील नागरीकांना माफ करण्यात यावी असे जे ५०% च सचिन भाऊंनी दिलेलं पत्र आहे. त्या अनुषंगाने आम्ही गरीब व मध्यम वर्गीय नागरीकांना दिलासा देण्यासाठी १०० स्के.फुट पर्यंत संपुर्ण घरपट्टी माफ व १००० स्कु.फुटापुढील वरील क्षेत्रातील श्री.सचिन पाटील यांनी मांडलेल्या सुचनेप्रमाणे उर्वरीत क्षेत्राला ५०% माफ करण्याचा निर्णय घ्यावा. सॉरी ते १००० स्के.फुट वरील क्षेत्राला श्री.सचिन पाटील यांनी मांडलेल्या विषयाप्रमाणे .

**मा.उपमहापौर :-** नितीन भाऊ काय म्हणता आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आणि त्या अनुदानासाठी त्या क्षेत्रातील नागरीकांची स्थिती लक्षात घेता.

**श्री.सचिन पाटील :-** प्रशासनाने आर्थिक तक्ता तयार करून शासनाकडनं

**श्री.विष्णु भंगाळे :-** अश्या वेळेस नागरीकांना भयंकर महामारीच्या वेळेस काही प्रमाणात का होईना. दिलासा मिळेल येत्या महासभेत आर्थिक स्वरुपात सुचना विचारात आपण घेतली .

**मा.महापौर :-** नितीन भाऊ बोला.

**मा.उपमहापौर :-** नितीन भाऊ बोलत आहे का ? नितीन भाऊ बोला नितीन भाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** घरपट्टी कर व त्या सोबत जाहिरात कराच्या माध्यमातुन सुध्दा आपल्या म.न.पा.ला मोठया प्रमाणात होर्डीगच्या माध्यमातुन आपल्याला व्यवसाय देतात. त्यांचाही धंदा या काळामध्ये पुर्णपणे ठप्प झालेला आहे. त्यांना सुध्दा या मागणी मध्ये समाविष्ट करण्यात यावे.असा ठराव केल्यानंतर जे संबंधीत व्यक्ती आहे त्यांनी शासनाकडे पाठविण्याची पुर्तता करावी.

**सन्मा.सदस्य श्री.विष्णु भंगाळे यांनी दि.१२/०८/२०२० रोजी दिलेली लेखी सुचना दिलेली असून ती खालील प्रमाणे.**

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील गरीब व मध्यवर्गीय सर्व सामान्य नागरीकांची गेल्या ४ ते ५ महिन्यापासुन उदरनिर्वाहाचे साधन नसल्याने आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची झालेली आहे. त्या अनुषंगाने नागरीकांना उत्पन्नाचे साधन नसल्याने महानगरपालिकेने आकारलेली घरपट्टी भरण्यास अकार्यक्षम आहेत. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत अधिनियम १३३-अ नुसार रहिवासी क्षेत्राची घरपट्टी माफ करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे.तसेच यापुर्वी १ जानेवारी २०१९ रोजी बृह्ममुंबई महानगरपालिका, मुंबई यांनी त्यांच्या रहिवास क्षेत्रातील नागरीकांची घरपट्टी माफ करण्यात आलेली आहे. त्यानुसार जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील रहिवास क्षेत्राच्या गरीब व मध्यमवर्गीय नागरीकांना दिलासा देण्यासाठी १००० स्के.फुट पर्यंत संपुर्ण घरपट्टी माफ व पुढील १००० स्के.फुट वरील क्षेत्राला श्री.सचिन पाटील यांनी मांडलेल्या सुचनेप्रमाणे उर्वरीत क्षेत्राला ५० टक्के माफी करण्याचा निर्णय घ्यावा ही विनंती.

त्या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी नागरीकांचे हित लक्षात घेता अशा महाभयंकर महामारीच्या वेळेत नागरीकांना काही प्रमाणात का होईना दिलासा मिळेल येत्या महासभेत आमची लेखी उपसुचनांची नोंद विचारात घेवुन निर्णय घ्यावा सदर निर्णयास आमच्या शिवसेना पक्षाचा पाठींबा राहील तसेच या उपसुचने प्रमाणे ठराव पारीत करावा व पुढे संबंधितांनी पाठपुरवठा शासनाकडे करावा ही विनंती व जाहिरात होर्डींग यांना माफ करावी.

**श्री.सचिन पाटील :-** प्रशासनाने ५०% अनुदानाचा प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठवावे व ५०% ची तरतुदीचे अनुदान प्राप्त करावे व नागरीकांना पुढील वर्षाच्या करात रिबीट देण्यात याव ही माझी सुचना आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** मा.महापौरताई, माझी सचिन भाऊ आणि विष्णुभाऊ दोघांना विनंती आहे. मालमत्ता धारक १०० चा असो, १००० स्कु.फुटाचा असो त्यांना प्रशासनाकडुन अनुदान मिळाल्यानंतरच त्यांना माफी देण्यात यावी. सभागृहात आपल्याला विनंती आहे आणि हा माझा प्रस्ताव आहे.

**नगरसचिव :-** नितीन भाऊ आदरणीय नितीन भाऊ, सर्वानुमते आहे का ?

**श्री.नितीन लढढा :-** हो सर्वानुमते आहे परंतु प्रशासनाने फक्त कायद्याच कुठेही उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी आणि राज्य शासनाकडुन अनुदान मिळविण्याच्या दृष्टीकोणातुन सर्वांनी प्रयत्न करावे.

**श्री.भगतराम बालाणी :-** बिल्कुल, बिल्कुल, कायद्याच उल्लंघन होता कामा नये.

**श्री.विष्णु भंगाळे :-** पुढचा विषय घ्या नगरसचिव महोदय.

**मा.उपमहापौर :-** शांत बसा शांत.

**श्री.सुनिल महाजन :-** शांतच आहे आम्ही.

**मा.आयुक्त :-** सन्मा.सदस्यांना विनंती आहे की, कृपया माईक बंद करावे. मा.महापौर हा जो विषय आहे. कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर आपण शहरातील नागरीकांना घरपट्टीच्या माध्यमातुन सवलत देऊ ईच्छितो. याच्या मध्ये जो काही धोरणात्मक निर्णय महासभेमध्ये घेतला जात आहे किंवा घेतला गेला असे आपण म्हणु या. याच्या मध्ये ५०% सवलत देण्यात यावी आणि या सवलतीमुळे जे काही महानगरपालिकेचे उत्पन्न कमी होण्याची शक्यता आहे. याच्या बाबतीमध्ये महानगरपालिकेला राज्य शासनाकडुन अनुदान मिळाव अशी विनंती शासनाला महासभेमार्फत करायची आहे असा धोरणात्मक निर्णय घ्यायचा आहे. परंतु याच्या मध्ये आपल्या महानगरपालिका अधिनियमातली जी तरतुद आहे ती महासभेसमोर मांडणे गरजे आहे अस मला वाटत. आपल्या अधिनियमामध्ये जी तरतुद आहे. ज्या कारणामुळे त्या प्रॉपर्टीवरती धोका उत्पन्न होतो किंवा ती डॅमेज होते. उदा.भुकंप असेल, पुर असेल.

**श्री.भगतराम बालाणी :-** आयुक्त साहेब एक मिनीट, फक्त एक मिनीट सॉरी मी थांबवत आहे तुम्हाला, हे जे काही तुमचे अधिनियम आहे महानगरपालिकेचे या संदर्भात नैसर्गिक आपत्ती संदर्भात हे सर्वांना ज्ञात आहे तो विषय नाही. आम्ही सर्वांनी जी विनंती केली. ती शासनाकडुन अनुदान मिळाल तरच आपण माफी द्यावी. त्यामुळे या नियमांचा असा हा उल्लेख करणं, मला वाटतं काही आवश्यकता नाही. त्यामुळे आमची विनंती आहे की, शासनाकडुन अनुदान मिळावे.

**श्री.सचिन पाटील :-** मा.आयुक्त महोदय अस आपल सांगणं जनतेचे हितांच राहणार नाही. जनतेच्या हिताच्या दृष्टीने आपण सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे. महासभेत सभागृह विषय पारीत करीत आहे आणि आपण जनतेच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घ्यायचे आहे आणि यापुर्वी देखील असे निर्णय शासनाने घेतलेले आहेत.

**श्री.भगतराम बालाणी :-** नाही नाही सचिन भाई.

**मा.आयुक्त :-** आपल्याला फक्त एकच मुद्दा सभागृहात.

**श्री.सचिन पाटील :-** आपल्याला या कोविड-१९ च्या याच्यामध्ये आर्थिक परिस्थितीत हा विषय पारित झालेला आहे सभागृहामध्ये सर्वानुमते सर्व पक्षांच्या संमतीने.

**सौ.शुचिता हाडा :-** सभागृहाने आयुक्त साहेबांना त्यांचा मुद्दा मांडु द्यावा.

**श्री.सचिन पाटील :-** आयुक्त साहेब आपण हा ठराव करून शासनाकडे पाठवावा ही नम्र विनंती.

**सौ.शुचिता हाडा :-** सचिन भाऊ, आयुक्त साहेबांना त्यांचा जो मुद्दा आहे सभागृहापुढे किमान मांडु द्यावा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मी सहमत आहे सचिन पाटीलांनी घेतलेल्या निर्णयाशी.

**श्री.भगतराम बालाणी :-** महापौरताई विनंती आहे महापौरताई

**सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, महापौर महोदया, आयुक्त साहेबांना सभागृहाला जी माहिती द्यायची आहे ती द्यावी अशी मी आपल्याला विनंती करेल. महापौर साहेब ते सभागृहाला काही तरी माहिती देऊ ईच्छित होते. ती माहिती सभागृहाला अवगत होऊ द्या.

**श्री.भगतराम बालाणी :-** द्या माहिती द्या आयुक्त साहेब. द्या माहिती पण माहिती देऊन पॉझिटीव्ह करून शासनाकडे आमचा हा प्रस्ताव पाठवावा.

**मा.आयुक्त :-** धन्यवाद मा.महापौर, याच्या संदर्भामध्ये फक्त सभागृहाला एकच बाजु निर्दशनात आणुन द्यायची आहे की, याच्या मध्ये जी कायद्याची तरतुद आहे. ती काय आहे हे सभागृहाच्या निदर्शनास यावं त्या दृष्टीनेच मी हि माहिती ठेवलेली होती. आपल्या कलम १३३ मधील जी तरतुद आहे ती साथरोग प्रतिबंधक संदर्भामध्ये लागु होत नाही. अशी त्या कायद्यामधील तरतुद दिसत आहे. फक्त अन्य जे नैसर्गिक आपत्त्या असतील. एखाद्या मिळकती वरती त्याच्या उपभोगतेच्या मुल्यावरती त्याचा परिणाम होतो. अश्या बाबतीत मध्ये ती आहे आणि म्हणुन जस आपण म्हणतो आहे की आता, त्याच्या मध्ये सगळयाच नागरिकांवरती एक संकट आलेल आहे म्हणुन त्यांच उत्पन्न कमी झालेलं आहे. परंतु एक कायदेशीर बाजु आपण लक्षात घेतली पाहिजे की, उत्पन्नावरचा टॅक्स नाही हा प्रॉपर्टीवरचा टॅक्स आहे. त्यामुळे प्रॉपर्टीवरच्या टॅक्सला ह्या गोष्टी जश्याच्या तश्या लागु होणं हे थोडे कायदेशीर दृष्टीने अडचणीच आहे. दुसरी बाब आपण त्याच्या मधुन शासनाकडुन अनुदान मागतो आहे हरकत नाही. परंतु या सर्वांमुळे नागरीकांमध्ये थोडी संभ्रम अवस्था निर्माण होण्याची शक्यता वाटते. आता महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. शासनाकडुन अनुदान मिळविण्याचा आता पुढच्या काळामध्ये आपण जे काही आपल्या उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करत आहे किंवा सन्मा.सभापती मॅडमनी जे काही आपल्या बजेट मध्ये म्हटल की, घरपट्टीच उत्पन्न वाढविणार आहोत. याच्यावरती सुध्दा नागरीकांमध्ये काही प्रमाणामध्ये संभ्रम अवस्था निर्माण होऊन आपल्या वसुलीला थोडी अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. या दोन बाबी मला मा.सभागृहाच्या निदर्शनास आणुन द्याची आहे.

**श्री.सचिन पाटील :-** मा.महापौर महोदया, मला एक गोष्ट उपस्थित करायचे आहे की, Government of India, Ministry of Home affairs section no.४०/३४७० MIA दि.२४ मार्च २०२० त्याची ऑर्डर आहे. Where as the national disaster Management NDMA is specifying that country is threatened with the period of Covid-19 epidemic which is already been decleared Pandemic by world Health Organisation and as consider and it needs to take effective major to prevent it to spread across the coundry. And there is a need for consistency in the application and implementation of various majors and while insuring maintainance of essensial services including health infrastructure. म्हणजे हा कोविड-१९ डब्ल्यु.एच.ओ.ने आणि गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या मिनिस्ट्रीने देखील नैसर्गिक आपत्ती आहे. नॅशनल डिझास्टर मॅनेजमेंट ॲथॉरिटीने क्लियर केलेले आहे. तर ते आपल्या ३३ अ मध्ये हे नैसर्गिक आपत्ती महाराष्ट्र अधिनियमात जी तरतुद आहे त्याच अनुषंगाने आहे आणि सभागृहाने हा जो सर्व सभासदांनी सर्वानुमते निर्णय घेतलेला आहे. उपसुचना जी विष्णु भाऊंनी दिलेली आहे. या सर्वांचा आपल्याला शासनाकडे प्रस्ताव पाठवायचा आहे. शासनाकडुन अनुदान प्राप्त झाल्यानंतर आपणास ती सुट द्यावयाची आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** महापौरताईंना विनंती आहे की, पुढचा प्रस्ताव घ्यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २९४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, राज्यासह शहरात कोविड-१९ ची महामारी सुरु असल्यामुळे सर्वत्र सुमारे ४ ते ५ महिन्यापासून लॉकडाऊन सुरु असल्यामुळे शहरातील सर्व उदयोग धंदे बंद असल्यामुळे नागरीकांच्या उत्पन्नात घट झालेली आहे. जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व सामान्य नागरीकांची गेल्या ४ ते ५ महिन्यापासून उदरनिर्वाहाचे साधन नसल्याने आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची झालेली आहे. त्या अनुषंगाने नागरीकांना उत्पन्नाचे साधन नसल्याने महानगरपालिकेने आकारलेली घरपट्टी भरण्यास अकार्यक्षम आहेत. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे १३३ अ नुसार रहिवासी क्षेत्राची (व्यापार व वाणिज्य सोडून) घरपट्टी कमी किंवा पुर्ण माफ करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. तसेच यापुर्वी १ जानेवारी २०१९ रोजी बृहनमुंबई महानगरपालिका, मुंबई यांनी त्यांच्या रहिवास क्षेत्रातील नागरीकांची ५०० च्या आतील चटई क्षेत्रातील घरपट्टी माफ करण्यात आलेली आहे. व ५०१ ते ७०० चटई क्षेत्राची ६० टक्के घरपट्टी माफ करण्याचा निर्णय घेण्यात येवून महाराष्ट्र शासनाने त्यास कॅबिनेट मंडळाची मंजूरी घेण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी नागरीकांचे हित लक्षात घेता अशा महाभयंकर महामारीच्या वेळेत नागरीकांना काही प्रमाणात का होईना दिलासा मिळावा याद्दष्टीने महाराष्ट्र शासनाने जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील रहिवास क्षेत्राच्या नागरीकांना मालमत्ता करात ५० टक्के सुट दयावी व त्याबद्दल महाराष्ट्र शासनाने मनपास अनुदान दयावे व जळगांव मनपा प्रशासनाने तसा अनुदान मिळणेबाबत प्रस्ताव तयार करुन पाठवावा. महाराष्ट्र शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त प्रमाणे नागरीकांना मालमत्ता करात सुट देण्याची कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २९)** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मनपा मालकीची फायनल टि.पी.स्किम २ अंतिम भुखंडक्र.१६७ ब ही जागा विकसित करणेबाबत मा.ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा, सभापती,स्थायी समिती व इतर दोन सदस्यांनी दिलेल्या यादी प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.भगतराम बालाणी :-** सन्मा.महापौरताई, आयुक्त साहेब व उपमहापौर साहेब, मी तहकुब ठेवण्यासाठी प्रस्ताव करीत आहे. हा प्रस्ताव तहकुब ठेवावा. जितु भाऊ अनुमोदन द्या.

**श्री.जितेंद्र मराठे :-** अनुमोदन आहे आमचे या विषयाला.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २९५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील फायनल टि.पी.स्किम २ अंतिम भुखंडक्र.१६७ ब ही जागा विकसित करणेबाबतचा आलेला प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- मराठे जितेंद्र भगवान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३०)** बंद अवस्थेत असलेली मनपा शाळा क्रं.१८ येथे प्रसुतिगृह सुरु करणेसाठी रानानी चॅरिटेबल ट्रस्ट,जळगांव या संस्थेस मिळणेबाबत अध्यक्ष, रानानी चॅरिटेबल ट्रस्ट,जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** हॅलो , हॅलो , हॅलो.

**श्री.सचिन पाटील :-** बोला शेखर भाऊ बोला.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** सदर जागेस शाळेचा आरक्षण असल्यामुळे मा.आयुक्त यांचे खुलाश्यानंतर प्रस्ताव नामंजुर करण्यात यावा.

**श्री.सचिन पाटील :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २९६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेची शाळा क्रं.१८ ही रानानी चॅरिटेबल ट्रस्ट,जळगांव यांनी प्रसुतीगृह चालविणेकामी मागणी केलेली आहे मात्र सदर जागेवर शाळेचे आरक्षण असल्यामुळे सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**अनुमोदक :- पाटील सचिन भिमराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३१)** मनपा शाळा क्र.३६ व ५६ चे नामकरण “मेमन हाजी इब्राहीम रानानी” असे करणे व सदर शाळा रानानी चॅरिटेबल ट्रस्ट,जळगांव या संस्थेस दत्तक स्वरुपात देणेबाबत अध्यक्ष, रानानी चॅरिटेबल ट्रस्ट,जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हलो हलो,

**श्री.सचिन पाटील :-** सदर मनपा शाळा क्र.३६ व ५६ चे नामकरण मेमन हाजी इब्राहीम रानानी असे करणे व सदर मनपा शाळा क्र. ३६ व ५६ शाळा दत्तक स्वरुपात देणेबाबत अध्यक्ष, रानानी चॅरीटेबल ट्रस्ट, जळगांव, ईब्राहिम भाई पहेले मेरा पुरा होने दो बाद मे आप बोलो. तर शाळा क्र.३६ व ५६ चे मनपाचे सर्व अधिकार अबाधीत राहतील या अटीशर्तीवर त्यांना मान्यता द्यावी.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** अनुमोदन आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मा.महापौर महोदया,

**मा.उपमहापौर :-** बोला.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हा विषय तुर्त तहकुब ठेवण्यात यावा. आम्ही ही शाळा १४ वर्षापासुन दत्तक म्हणुन चालवितो आहे आणि कोणीही येईल आणि आपल नाव लावुन घेईन. कोणाच न योगदान असुन सुध्दा. हा विषय तरी तुर्त तहकुब ठेवावा. मामांशी माझ बोलन झालेल आहे मामांनी सुध्दा सांगितलं की ठिक आहे. आणि कैलास अप्पांशीही बोलनं झालं.

**श्री.कैलास सोनवणे :-** मिटींग मध्ये बोलत आहे तुम्ही ईबा भाई.

**श्री.सचिन पाटील :-** मिटींग मध्ये बोलत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** अजेंडा येऊन १५ दिवस झाले ना. काय करत होते ऐवढे १५ दिवस.

**श्री.दिलीप पोकळे :-** ठराव मंजुर झालेला आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** तुर्त हा ठराव तहकुब ठेवा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौर साहेब पुढचा विषय घ्या आणि संपवा.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हा विषय तुर्त तहकुब ठेवा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** राष्ट्रगीत सुरु करा. राष्ट्रगीत.

**सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई मला फक्त एक मिनीट बोलायचे आहे. मला मंजुरी द्यावी.

**श्री.सचिन पाटील :-** महापौर साहेब, राष्ट्रगीत सुरु करावे खुप वेळ झालेला आहे. सकाळी ११.०० पासुन तर आता ६.०० वाजलेले आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** सचिन भाऊ माझ्या वार्डाचा विषय आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** मा.महापौरताई, आजची जी ऑनलाईन सभा आपण आयोजित केलेली होती. मी सर्वप्रथम आपल अभिनंदन करते आणि सगळयात महत्वाच अभिनंदन करायला हव ते श्री.गोराणे साहेब आणि त्यांची टिम, जे टेक्नीकल

सपोर्ट सिस्टीम म्हणुन श्री. अमित मनोरे यांनी काम बघितलेल आहे आणि नगरसचिव विभागातले श्री.फहिम शेख या सगळयांच्या अथक परिश्रमामुळे आजची मला वाटते ही सभा आपली यशस्वीपणे पार पडलेली आहे. तर आपण सगळयांनी नगरसचिव विभागाचे, नगरसचिवांचे आणि त्यांचे टिमचे आभार मानले पाहिजे असे मला वाटते.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर साहेब, शिवसेनेच्या वतीने श्री.सुनिल गोराणे, यांची सर्व टिमच अभिनंदन व फहिम भाई यांनी या ठिकाणी खुप सहकार्य केले त्यांचे ही अभिनंदन.

**श्री.चेतन सनकत :-** राष्ट्रगीत सुरु करावे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभा खुप लांबली पण चांगली झाली.

**नगरसचिव :-** विषय क्र.३१ च्या संदर्भात श्रीमती सुन्नाबी राजु देशमुख, एम.आय.एम. यांनी एक पत्र देऊन आपला विरोध नोंदविलेला आहे आणि मा.महापौर यांना सादर केलेला असुन यांनी मान्य केलेले असुन नगरसचिवांना आदेश केलेले आहे की, हे इतिवृत्तात दाखल करण्यात यावे.

**श्रीमती सुन्नाबी राजु देशमुख, सन्मा.सदस्या एम.आय.एम. यांनी विषय क्र.३१ ला दि.११/०८/२०२० चे पत्रान्वये हरकत घेतलेली असुन पुढील प्रमाणे.**

दि.१२/०८/२०२० रोजी होणाऱ्या महासभेतील विषय सुची अशासकीय प्रस्ताव क्र.३१ ला माझा पुर्ण विरोध आहे. म.न.पा. शाळा क्र.३६ व ५६ चे नामकरण करण्यात येवु नये. छोटी मोठी देणगी देवुन कोणीही अशा प्रकारची मागणी करेल व एक चुकीचा पायंडा शहरात सुरुहोईल. मुळात महानगरपालिकेच्या शाळांचे स्वतंत्र अस्तित्व असावे. एखाद्या व्यक्तीचे नांव देवु नये व महानगरपालिकेने अशा प्रकारचे अस्तित्व टिकवुन ठेवावे.

तसेच सदर शाळा दत्तक द्यावी असे रानानी चॅरीटेबल ट्रस्ट, जळगांव ची मागणी आहे. त्याबाबत ते शाळेच्या इमारतीकरीता शैक्षणिक साहित्याकरीता किंवा शाळेच्या इमारती दुरुस्ती करीता किती खर्च करणार आहे. याबाबत त्यांच्या पत्रात उल्लेख नाही. याबाबत सविस्तर प्रस्ताव व शाळेबाबत काय योजना करणार याची पुर्ण माहिती घेतल्याशिवाय त्यांचा प्रस्ताव महासभेने स्विकारु नये. तसेच ज्यांचे पाल्य सदर शाळेत शिक्षण घेतात त्यांचे पण म्हणणे एकुन घ्यावे व परिसरातील नागरीकांची ना-हरकत घ्यावी, त्यानंतरच निर्णय घ्यावा. सदर विषय तहकुब करण्यात यावा, ही विनंती. अर्जाची नोंद महासभेच्या पटलावर घ्यावी, ही विनंती.

**श्री.प्रशांत नाईक :-** इकडे पाहा, इकडे पहारे पटकन, जिंदगीभर तुम्हाला आठवण राहिन हे. ऑनलाईन सभा काय जिंदगी मध्ये होणार आहे का ? आप्पा इकडे पहा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** होय, तुझा आवाज येत आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** रेकॉर्ड होत ते मला सर्व माहिती आहे.

**सौ.रंजना सपकाळे :-** हॅलो, महापौरताई मला बोलण्याची संधी द्यावी.

**मा.महापौर :-** आता विषय झाल्यानंतर बोला तुम्ही.

**नगरसचिव :-** विषय क्र.३१ जो आहे, नितीन भाऊ आदरणीय नितीन भाऊ, सुनिल भाऊ महाजन, आदरणीय सुनिल भाऊ महाजन, विषय क्र.३१ जो आहे हा सर्वानुमते आहे की, कसा आहे. ईबा भाई, ईबा भाई,

**श्री.नितीन लढढा :-** त्याला तटस्थ म्हणुन शिवसेनेची भुमिका आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, महापौर साहेब.

**मा.उपमहापौर :-** बोला, बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, कोणीतरी महिला भगिनीला बोलायचे आहे. ते मंगलाताई असतील किंवा निताताई असतील. बोला महिला भगिनी बोला.

**मा.महापौर :-** बोला ताई बोला,

**सौ.रंजना सपकाळे :-** हॅलो महापौरताई, माझा आवाज येत आहे ताई.

**मा.महापौर :-** हो येत आहे, बोला.

**सौ.रंजना सपकाळे :-** मला आयुक्त साहेबांना विचारायचे आहे की, मी लेटरहेड वरती ज्या समस्या मांडल्या आहेत. हॅलो , हॅलो .

**मा.महापौर :-** बोला, बोला आवाज येत आहे तुमचा.

**श्री.सुनिल खडके :-** येत आहे आवाज.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई बोला तुम्ही येत आहे आवाज.

**सौ.रंजना सपकाळे :-** मी ज्या समस्या लेटरहेडवर मांडल्या. त्यांच काही निवारण होत आहे की, नाही. हॅलो , हॅलो.

**मा.उपमहापौर :-** बोला, बोला.

**सौ.रंजना सपकाळे :-** लेटरहेडवर आयुक्त साहेबांना मी ज्या समस्या दिल्या आहेत त्यांच निवारण होत आहे की नाही. कोविडची डयुटी करतांना आपले मनपाचे कर्मचारी श्रीधर सोनवणे यांचा मृत्यु झाला आहे. तरी ही आपण काही काळजी घेतलेली नाही. त्याचे कुटुंबाला काय दिलं.

**सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई रंजनाताई सपकाळे यांचा जो प्रश्न आहे. तो मी तुम्हाला सांगु ईच्छिते येथे.

**मा.आयुक्त :-** तुम्ही जे पत्र दिलेल आहे. तर तुमच्या प्रभागामध्ये. त्या पत्रासंदर्भामध्ये ज्या समस्या आपण मांडलेल्या आहे. संबंधीत विभाग आणि आपली एकत्रीत बैठक घेऊ आणि त्याच्या मध्ये त्या समस्यांची सद्यास्थिती काय आहे.त्या सोडविण्याच्या दृष्टीने आपण त्याच्यावर मार्ग काढु.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** महापौर ताई , महापौरताई.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई संपवा हो सभा.

**सरिता नेरकर :-** बोल बोल प्रतिभा तु बोल. आता इतका वेळ त्यांनी एकलं सगळयांच आता तीच ऐका.

**श्री.प्रशांत नाईक :-** सरिताताई संध्याकाळ झाली आता.

**सरिता नेरकर :-** त्यांना बोलु तर द्या. प्रतिभाताई बोलत आहे त्यांना बोलु द्या.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** माझा अमृत योजनेचा विषय होता. मागे मी आयुक्त साहेबांना दोन वेळा भेटली. हॅलो .

**मा.उपमहापौर :-** बोला बोला, बोला.

**सरिता नेरकर :-** बाकीच्यांनी माईक बंद करा. जेव्हा महिला सदस्या बोलत आहे. तुमच्या वेळी आम्ही माईक बंद करून बसले होते इतक्या वेळ. माईक बंद करा बाकीच्या सदस्यांनी.

**नगरसचिव :-** नमस्कार, नमस्कार, आप्पासाहेब, नितीन भाऊ, आदरणीय सुनिल भाऊ. आदरणीय भगतभाई.राष्ट्रगीत सुरु करायचे का ?

**श्री.नितीन लढढा :-** हो हो.

**नगरसचिव :-** सर्वांनी कृपया माईक बंद करा. सर्व सदस्यांचे मी आभार व्यक्त करतो.आणि ऑनलाईन सभेमध्ये आपण ज्या पध्दतीने सहकार्य केल. आणि चांगल्या पध्दतीने ऑनलाईन सभा नाही महासभा एक नाही दोन सभा महाराष्ट्रात एकाच वेळेस दोन महासभा हे जळगांव महापालिकेतच झालेल्या आहेत. तरी मी पुनश्च आपल्या सर्वांचे आभार व्यक्त करतो. खुप खुप धन्यवाद.

**श्री.सुनिल खडके :-** तुमची ही मेहनत आहे गोराणे साहेब तुमचेही अभिनंदन.

**नगरसचिव :-** सर्वांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २९७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अक्सा नगर, मेहरुण परिसरातील महानगरपालिकेची शाळा क्र.३६ व ५६ कार्यरत असून सदर शाळांचे नामकरण “मेमन हाजी इब्राहीम रानानी” असे करणेस व सदर शाळा रानानी चॅरिटेबल ट्रस्ट, जळगांव या संस्थेस दत्तक स्वरुपात देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. परंतू सदर शाळांवर महानगरपालिकेचेच सर्व हक्क राहातील या अटीवर सदर प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे. तसेच सदर संस्था नामकरणाबद्दल जळगांव शहर महानगरपालिकेस देत असलेली देणगी रक्कम रु.५१,०००/- मात्र स्विकृत करणेसही मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर शाळेस यापूर्वी कोणाचे नांव दिले नसल्याबाबत तसेच सदर शाळा दत्तक स्वरुपात दिले नसलेबाबत खात्री करुन घेवून सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ५२ प्रतिकुल मते :- ०१ तटस्थ :- १३**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही /-**

**(सोनवणे भारती कैलास)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**